# लोकलेखा समिती

## (२०१७-२०१८)

**(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)**

**भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१५-२०१६ च्या स्थानिक संस्था अहवालामधील कृषी व पदुम (पशुसंवर्धन) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्रमांक २.१) आणि ग्रामविकास व जलसंधारण (ग्रामविकास) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्रमांक २.२) यावरील**

# पासष्टावा अहवाल

सत्यमेव जयते

(सदर अहवाल, मा. अध्यक्षांचे निदेश क्र. ९ (सातवी आवृत्ती २०१४) आणि मा. सभापती यांचे निदेश क्र. ९ (पाचवी आवृत्ती २०११) अनुसार मा. अध्यक्ष आणि मा. सभापती यांना दिनांक १६ ऑगस्ट २०१९ रोजी सादर करण्यात आला.)

(दिनांक १ डिसेंबर, २०१९ रोजी विधानसभा / विधानपरिषद सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई.
२०१९

# लोकलेखा समिती

## (२०१७-२०१८)

**(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)**

**भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१५-२०१६ च्या स्थानिक संस्था अहवालामधील कृषी व पदुम (पशुसंवर्धन) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्रमांक २.१) आणि ग्रामविकास व जलसंधारण (ग्रामविकास) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्रमांक २.२) यावरील**

## पासष्टावा अहवाल

एचबी १५०५–१

# लोकलेखा समिती

## २०१७-२०१८

**समिती प्रमुख**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(४) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(५) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.

(६) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(७) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

*(८) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(९) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.

**(१०) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

(१०अ) ॲड. पराग अळवणी, वि.स.स.

(११) श्री. संजय केळकर, वि.स.स.

***(१२) श्री. सुरेश ऊर्फ बाळुभाऊ धानोरकर, वि.स.स.

(१३) श्री. अजय चौधरी, वि.स.स.

(१४) श्री. शंभुराज देसाई, वि.स.स.

(१५) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.

(१६) श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स.

(१७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१८) श्री. दिलीप वळसे-पाटील, वि.स.स.

(१९) श्री. जयंत पाटील, वि.स.स.

(२०) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

****(२१) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(२२) श्री. रविंद्र फाटक, वि.प.स.

*****(२३) श्री. हेमंत टकले, वि.प.स.

(२३अ) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

******(२४) श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स.

(२५) श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

*******(२६) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

**निमंत्रित**

********(२७) श्री. प्रसाद लाड, वि.प.स.

*********(२८) श्री. रामदास आंबटकर, वि.प.स.

**सदरहू समिती दिनांक २४ ऑगस्ट २०१७ रोजी विधानसभा व दिनांक ६ सप्टेंबर २०१७ रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठित करण्यात आली.**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. यू. के. चव्हाण, सचिव (EM),

(२) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव,

(३) श्री. अ. चां. कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.,

(४) श्री. सो. न. सानप, अवर सचिव,

(५) श्री. विनोद राठोड, कक्ष अधिकारी,

(६) श्री. रवींद्र म. मेस्त्री, कक्ष अधिकारी.

* **श्री. योगेश सागर, वि.स.स. यांचा दिनांक १६ जून २०१९ रोजी राज्यमंत्री म्हणून मंत्रिमंडळात समावेश झाल्याने सदर जागा रिक्त आहे.**

** **श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स यांनी आपल्या समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवर ॲड. पराग अळवणी, वि.स.स. यांची मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक १४ फेब्रुवारी २०१९ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

*** **श्री. सुरेश *ऊर्फ* बाळू धानोरकर, वि.स.स. यांनी दिनांक २२ मार्च २०१९ रोजी आपल्या सदस्यपदाचा राजीनामा दिल्यामुळे सदर जागा रिक्त आहे.**

**** **श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स यांची दिनांक २७ जुलै २०१८ रोजी विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर मा. सभापती, विधानपरिषद यांनी श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स यांची पुन्हा दिनांक ५ सप्टेंबर २०१८ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

***** **श्री. हेमंत टकले, वि.प.स. यांनी आपल्या समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवर श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक १९ डिसेंबर २०१७ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

****** **श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स. यांची दिनांक २७ जुलै २०१८ रोजी विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे सदर जागा रिक्त झाली.**

******* **श्री. जयंत पाटील, वि.प.स. यांची मा. सभापती, विधानपरिषद यांनी निमंत्रित समिती सदस्य म्हणून दिनांक ६ सप्टेंबर २०१७ रोजी नामनियुक्ती केली होती. दिनांक २७ जुलै २०१८ रोजी विधानपरिषदेच्या सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे त्यांची निमंत्रित समिती सदस्यत्वाची नियुक्ती संपुष्टात आली होती. ते विधानपरिषद सदस्य म्हणून पुन्हा निवडून आल्यामुळे मा. सभापती, विधानपरिषद यांनी श्री. जयंत पाटील, वि.प.स. यांची दिनांक ५ सप्टेंबर २०१८ रोजी समिती सदस्य म्हणून रिक्त जागेवर नामनियुक्ती केली.**

******** **श्री. प्रसाद लाड, वि.प.स. यांची मा. सभापती, विधानपरिषद यांनी दिनांक १ मार्च २०१९ रोजी " विशेष निमंत्रित " समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

********* **श्री. रामदास आंबटकर, वि.प.स. यांची मा. सभापती, विधानपरिषद यांनी दिनांक २ मे २०१९ रोजी " विशेष निमंत्रित " समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

## प्रस्तावना

मी, लोकलेखा समितीचा समिती प्रमुख, समितीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरून भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१५-२०१६ च्या स्थानिक संस्था अहवाल यावर विचार करून लोकलेखा समितीचा पासष्टावा अहवाल सादर करीत आहे.

समितीने दिनांक १० जून २०१९, रोजी प्रधान सचिव, कृषी व पदुम (पशुसंवर्धन) विभाग व प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण (ग्रामविकास) विभाग आणि इतर विभागीय प्रतिनिधी यांची साक्ष विधानभवन, मुंबई येथे घेण्यात आली.

प्रधान महालेखाकार, लेखापरीक्षा-एक महाराष्ट्र, मुंबई हे समितीच्या निमंत्रणावरून बैठकींना उपस्थित होते. त्यांनी समितीला केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांची अत्यंत आभारी आहे.

तसेच प्रधान सचिव, वित्त विभाग (लेखा व कोषागारे) यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला दिलेल्या सहकार्याबद्दल आणि संबंधित विभागाच्या सचिवांनी समितीसमोर साक्ष देऊन समितीला सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांचे देखील आभारी आहे.

समितीच्या बैठकीच्या कामकाजाचे कार्यवृत्त स्वतंत्ररित्या ठेवण्यात आले असून तो अहवालाचा भाग आहे. समितीच्या झालेल्या बैठकांचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्ट “अ” मध्ये देण्यात आलेले आहे.

समितीने दिनांक २३ जुलै २०१९ आणि ६ ऑगस्ट, २०१९ रोजीच्या बैठकीत सन २०१५-१६ वर्षाच्या स्थानिक संस्था अहवालातील कृषी व पदुम (पशुसंवर्धन) विभाग व ग्रामविकास व जलसंधारण (ग्रामविकास) विभागासंदर्भात तयार केलेला प्रारुप अहवाल विचारात घेतला व त्यातील शिफारशींवर सुधारणा सुचवून प्रारुप अहवालाला मान्यता दिली.

**विधान भवन :**
मुंबई/नागपूर
दिनांक : ६ ऑगस्ट, २०१९.

**गोपालदास अग्रवाल,**
समिती प्रमुख,
लोकलेखा समिती.

**अनुक्रमणिका**


| अनुक्रमांक<br>(१) | विभाग व तपशील<br>(२) | पृष्ठ क्रमांक<br>(३) |
|---|---|---|
| | **प्रस्तावना** | (पाच) |
| **१** | **कृषी व पदुम (पशुसंवर्धन) विभाग** | १ |
| | (परिच्छेद क्र. २.१) | १ |
| **२** | **ग्रामविकास व जलसंधारण (ग्रामविकास) विभाग** | ३७ |
| | (परिच्छेद क्र. २.२) | ३७ |

## कृषी व पदुम (पशुसंवर्धन) विभाग

**१.१** भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१५-१६ या वर्षाच्या स्थानिक संस्था अहवालातील परिच्छेद क्र. २.१ "अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना दुभत्या जनावरांचे गट वाटप करणे या योजनेची अंमलबजावणी" यासंदर्भात महालेखाकारांनी खालील अभिप्राय व्यक्त केले :-

| अ.क्र. | बाब | स्पष्टीकरण |
|---|---|---|
| २.१.१ (पृष्ठ क्र. १७) | प्रस्तावना<br>महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागाने विशेष घटक योजना (Special Component Plan-SCP) अंतर्गत अनुसूचित जाती त्याचप्रमाणे आदिवासी क्षेत्र उपयोजना (Tribal Sub Plan-TSP) व आदिवासी क्षेत्राबाहेरील (OTSP) उपयोजनेअंतर्गत अनुसूचित जमातींच्या लाभार्थ्यांना स्वयंरोजगाराव्दारे उत्पन्नाचे साधन उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने दोन दुभत्या जनावरांचे गट (गाई/म्हशी) वाटप करणे या योजनेची सुरुवात केली (नोव्हेंबर २०११). योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, दोन दुभत्या गुरांची किंमत रु.८०,०००/- आणि तीन वर्षाची विमा रक्कम रु.५,०६१/- (एकूण रु.८५,०६१/-) ठरविण्यात आली. शासन ७५ टक्के (रु.६३,७९६) आर्थिक सहाय्य पुरविणार होते आणि उर्वरित २५ टक्के (रु.२१,२६५) लाभार्थ्यांनी द्यावयाचे होते. या योजनेची मोठया प्रमाणात प्रसिध्दी करावयाची होती, जणे करुन निश्चित केलेल्या लाभार्थ्यांची योजनेत योग्य व्याप्ती होऊ शकेल.<br>ही योजना जिल्हास्तरावर जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, | **भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१५-१६ या वर्षाच्या स्थानिक संस्था अहवालावर महाराष्ट्र शासन पदुम विभागाचे अभिप्राय महालेखापाल नागपूर यांना शासनाचे पत्र क्रमांक संकीर्ण- २०१६/ सीआर-२८२/ एडीएफ-४/ मंत्रालय मुंबई-३२ दिनांक २६/४/२०१७ अन्वये सादर करण्यात आलेले आहेत.**<br>**(सुलभ संदर्भासाठी प्रत संलग्न)** |

| | | |
|---|---|---|
| | जिल्हा परिषद आणि गटस्तरावर पशुधन विकास अधिकारी यांनी राबविली होती.<br>लाभार्थ्यांना अनुदानाचे वाटप व वापर आणि योजनेची अंमलबजावणी परिणामकारक झाली असल्याचे निर्धारण करण्यासाठी लेखापरीक्षेने (i) आयुक्त, पशुसंवर्धन, पुणे, (ii) क्षेत्रीय सहआयुक्त, पशुसंवर्धन (RJC), (iii)सहा[१] जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी आणि (iv) बारा[२] पशुधन विकास अधिकारी (प्रत्येक जिल्हयातील दोन) यांच्या २०११-१६ या कालावधीच्या दस्तऐवजांची नमूना तपासणी केली (मार्च ते जून २०१६). निवडलेल्या १२ गटांमध्ये विभागीय कर्मचाऱ्यांसोबत ३६६ लाभार्थ्यांपैकी ६८ लाभार्थ्यांची (१२३ गुरांची) प्रत्यक्ष पडताळणी करण्यात आली. २०११-१६ दरम्यान निवडलेल्या सहा जिल्हयांना रु.११.६९ कोटी निधी आणि २,३७२ लाभार्थ्यांना रु.११.६४ कोटी आर्थिक सहाय्य प्राप्त झाले.<br>(१)भंडारा, चंद्रपूर,गडचिरोली,गोंदिया, नागपूर आणि वर्धा<br>(२)भंडारा,चंद्रपूर,देसाईगंज, गडचिरोली, गोंदिया, हिंगणघाट,कळमेश्वर, लाखनी, नागभीड, रामटेक, तिरोडा आणि वर्धा | |
| २.१.२<br>(पृष्ठ क्र. १८) | लेखापरीक्षा निष्पत्ती | |
| २.१.२.१<br>(पृष्ठ क्र. १८) | **निश्चित केलेल्या लोकांपर्यन्त लाभ पोहोचविण्याचे अपर्याप्त परिमाण.**<br>जिल्हा पशुसंवर्धन अधिकाऱ्यांनी मागील वर्षात प्राप्त झालेल्या निधीनुसार निधीची मागणी केली तदनुसार आदिवासी विकास विभाग आणि समाज कल्याण विभाग यांनी चालू वर्षासाठी अर्थसंकल्पीय तरतूद केली. प्राप्त झालेले | संबंधित जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी निधीची मागणी करतांना योजनेखाली या पूर्वीच्या वर्षांत प्राप्त झालेल्या वैध अर्जांची संख्या विचारात घेऊन त्यानुसार निधीची मागणी करणे हे निश्चित तर्क संगत आहे. अनुसुचित जातीच्या आणि जमातींच्या लाभार्थींना लाभ देण्यासाठी "दुधाळ जनावरांचे गट वाटप" या जिल्हास्तरीय योजनेमध्ये अनुक्रमे सामाजिक न्याय विभाग आणि आदिवासी विकास विभाग यांचेकडून निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. या विभागांकडून त्यांनी निश्चित केलेल्या प्राधान्यक्रमानुसार तसेच जिल्हयाकरिता सर्व विभागांच्या |

अर्ज, मागणी केलेला/मिळालेला निधी, देण्यात आलेले लाभ याबाबतचे तपशील तक्ता २.१.१ मध्ये दिले आहे.

**तक्ता २.१.२ : प्राप्त झालेल्या अर्जाचे आणि दिलेल्या लाभाचे तपशील**

| वर्ष | प्राप्त झालेल्या वैध अर्जांची संख्या | मागणी केलेला निधी (रु. कोटीत) | प्राप्त झालेला निधी (रु. कोटीत) | लाभ देण्यात आलेल्या अर्जदारांची संख्या | लाभ न देण्यात आलेल्या अर्जदारांची संख्या |
|---|---|---|---|---|---|
| २०११-१२ | ८८० | १.२० | १.०५ | २८१ | ५९९ |
| २०१२-१३ | १०५४ | १.७१ | १.५२ | २४२ | ८१२ |
| २०१३-१४ | १८२५ | २.२० | २.१९ | ४२० | १४०५ |
| २०१४-१५ | १८१३ | २.९६ | २.८४ | ५२६ | १२८७ |
| २०१५-१६ | २८८३ | ४.३० | ४.०९ | ९०३ | १९८० |
| **एकूण** | **८४५५** | **१२.३७** | **११.६९** | **२३७२** | **६०८३** |

स्त्रोत : जिल्हा पशुसंवर्धन अधिकाऱ्यांनी दिलेली माहिती

लेखापरीक्षेस असे आढळले की २०११-१६ दरम्यान जरी ८,४५५ वैध अर्ज प्राप्त झाले असले तरी योजनेचा लाभ उपलब्ध निधीच्या अनुषंगाने केवळ २,३७२ अर्जदारांना (२८ टक्के) देण्यात आले. मागील वर्षात प्राप्त झालेल्या वैध अर्जांच्या संख्येचा विचार न करता निधीची मागणी गत वर्षाच्या निधी प्राप्तीनुसार करण्यात आल्यामुळे ६,०८३ अर्जदारांना (म्हणजेच ७२ टक्के ) योजनेचा लाभ देता येऊ शकता नाही.

पात्र लाभार्थ्यांची संख्या (वैध अर्ज) आणि वर्षभरात प्रत्यक्ष देण्यात आलेले लाभ यात मोठी तफावत असल्यामुळे पुढील वर्षी निधीची मागणी वैध अर्जांच्या संख्येवर आधारित असावयास पाहिजे होती, जेणेकरुन पर्याप्त लाभ पुरविता आला असता. वर्ष २०११-१६ दरम्यान मागणी केलेल्या योजनांतील अनुसुचित जाती व जमातींच्या लाभार्थ्यांना लाभ देणेकरिता मंजूर होणाऱ्या निधींची अधिकची मर्यादा (सिलींग लिमीट) विचारात घेऊन निधीची मागणी करणाऱ्या सर्व विभागांना त्याप्रमाणात प्रत्यक्षात निधी मंजूर करण्यात येतो.

दुसरी महत्वाची बाब अशी की, वैध अर्ज असलेल्या अनुसचित जाती व जमातीच्या सर्वच लाभार्थ्यांकडून त्यांच्या हिश्याची रक्कम निश्चित पणे उभारली जाईल याची खात्री देता येत नाही त्यामुळे वैध अर्ज असलेल्या लाभार्थ्यांच्या संख्येनुसार निधीची मागणी करणे प्रसंगी असंयुक्तीक ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही.

लेखापरिक्षण कालावधीच्या पुढील वर्षांत म्हणजेच सन २०१६-१७ व २०१७-१८ मध्ये दुधाळ जनावरांचे गट वाटप योजनेअंतर्गत अनुसुचित जाती व जमातीच्या लाभार्थींसाठी नागपूर विभागातील जिल्हानिहाय मंजूर तरतुदी आणि लाभ देण्यात आलेल्या लाभार्थ्यांची संख्या याचा तपशिल खालील प्रमाणे सादर करणेत येत आहे.

| जिल्हा | वर्ष २०१६-१७ | | | वर्ष २०१७-१८ | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | मंजूर तरतूद (रु.लक्ष) | लाभार्थी संख्या | | मंजूर तरतूद (रु.लक्ष) | लाभार्थी संख्या | |
| | अनुसुचित जाती अनुसुचित जमाती | अनुसुचित जाती अनुसुचित जमाती | | अनुसुचित जाती अनुसुचित जमाती | अनुसुचित जाती अनुसुचित जमाती | |
| | | प्राप्त अर्ज | प्रत्यक्ष लाभ दिलेल्यांची संख्या | | प्राप्त अर्ज | प्रत्यक्ष लाभ दिलेल्यांची संख्या |
| नागपर | ९७.३३ | ४७९ | १५२ | १३३.२० | ८६६ | २०८ |
| भंडारा | ५०.०० | ४१७ | १३१ | ६०.०० | ५७९ | ९३ |
| चंद्रपूर | ३०.०० | १२५ | ४७ | ९२.६२ | ४२९ | १४५ |
| गडचिरोली | ५०.०८ | १२३ | ७८ | ६०.०० | ३७५ | ९४ |
| गोंदीया | १२५.२९ | ५३९ | ३९२ | ११२.९० | ७०७ | २४६ |
| वर्धा | ५५.९१ | २९२ | १७४ | ६७.०४ | ४५० | २२० |
| **एकूण** | **४०९.००** | **२०७५** | **९७४** | **५२५.७०** | **३४०६** | **९३६** |

स्त्रोत : जिल्हा पशुसंवर्धन अधिकाऱ्यांनी दिलेली माहिती

उपरोक्त आकडेवारीवरुन दिसून येते की वर्ष २०११ ते २०१६ या कालावधीत वर्ष निहाय उपलब्ध झालेल्या निधीपैकी वर्ष २०१५-१६ मध्ये प्राप्त झालेल्या रु ४.०९ कोटी एवढा निधी पुढील वर्षात म्हणजेच सन २०१६-१७ मध्ये देखिल प्राप्त झालेला असुन सन सन २०१७-१८

| | | |
|---|---|---|
| | रु.१२.३७ कोटी निधीच्या ऐवजी रु.११.६९ कोटी निधी प्राप्त झाला व ह्या निधीचा वापर करण्यात आला. येथे असेही आढळले की जिल्हा पशुसंवर्धन अधिकाऱ्यांनी २०११-१६ दरम्यान या ७२ टक्के अर्जदारांना लाभ पुरविण्यासाठी कोणत्याही प्रकारची पूरक मागणी केली नव्हती.<br>लेखापरीक्षेस पुढे असेही निदर्शनास आले की चंद्रपूर आणि गडचिरोली, दोन्ही आदिवासी बहुल जिल्ह्यांत, TSP आणि OTSP अंतर्गत २०११-१६ दरम्यान जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, निधीची मागणी करण्यात आणि अर्ज मागविण्यात असफल ठरले. परिणामी, या दोन जिल्ह्यांतील आदिवासी लोक या योजनेच्या विस्तारापासून वंचित राहिले. वर्ष २०११-१३ आणि २०१४-१६ मध्ये भंडारा जिल्ह्यांत आणि वर्ष २०११-१४ मध्ये नागपूर जिल्ह्यात आदिवासी लोकांना योजनेचा लाभ मिळाला नाही कारण संबंधित जिल्हा पशुसंवर्धन अधिकाऱ्यांनी निधीची मागणी केली नव्हती.<br>उत्तरादाखल जिल्हा पशुसंवर्धन अधिकाऱ्यांनी नमूद केले (मार्च आणि एप्रिल २०१६) की निधीच्या उपलब्धतेनुसार लाभार्थ्यांची निवड करण्यात आली. आदिवासी लोकांना लाभ पुरविण्या संबंधी जिल्हा पशुसंवर्धन अधिकाऱ्यांनी TSP आणि OTSP अंतर्गत अनुदान प्राप्त न झाल्याचे नमूद केले.<br>उत्तर मान्य करणे योग्य नाही कारण निधीची मागणी प्राप्त झालेल्या वैध अर्जांची प्रत्यक्ष संख्या विचारात न घेता करण्यात आली होती. याशिवाय, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली आणि नागपूर या जिल्ह्यांच्या जिल्हा पशुसंवर्धन अधिकाऱ्यांनी TSP आणि OTSP अंतर्गत निधीची मागणी केली नव्हती, ज्यामुळे आदिवासी जनता योजनेच्या लाभांपासून वंचित राहिली. | मध्ये त्यात वाढ होऊन रु ५.२५ कोटी इतका निधी प्राप्त झाला. लाभ दिलेल्या लाभार्थ्यांची संख्या देखिल सन २०११ ते २०१६ या कालावधीच्या तुलनेत सन सन २०१६-१७ आणि सन २०१७-१८ मध्ये वाढलेली आहे.<br>या स्थितीमध्ये वैध अर्ज असलेल्या सर्वच अर्जदारांना/ लाभार्थींना तरतूदीच्या प्रत्यक्ष उपलब्धतेनुसार योजनेचा लाभ देता येणे शक्य नव्हते परंतु त्याचा अन्वयार्थ "निधीची मागणी न केल्यामुळे लाभार्थ्यांना लाभापासून वंचित ठेवले गेले" असा काढता येत नाही. |

| | | |
|---|---|---|
| २.१.२.२<br>(पृष्ठ क्र. १९) | **दुभत्या जनावरांचे विलंबाने वाटप**<br>योजनेच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये असे विनिर्दिष्ट होते की, प्रत्येक वर्षी जून-जुलै मध्ये पशुधन विकास अधिकाऱ्याव्दारे लाभार्थ्यांकडून अर्ज मागवावयास पाहिजे होते आणि जिल्हा पशुसंवर्धन अधिकाऱ्याला पाठवावयास पाहिजे होते. जिल्ह्याच्या उप-संचालक, पशुसंवर्धन यांच्या अध्यक्षतेखालील समितीने योजनेच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये विहित असलेल्या मानकांचे उचितपणे पालन करुन सप्टेंबर अखेर पर्यन्त लाभार्थ्यांची निवड करावयास हवी होती.<br>पडताळणीत असे आढळले की प्रत्येक वर्षी जून महिन्यापासून ऑगस्ट महिन्यापर्यंत अर्ज प्राप्त होत होते परंतु अनुदान ऑगस्ट पासून मार्च महिन्यापर्यन्त मिळत होते. त्यानंतर ऑक्टोबर ते मार्च दरम्यान लाभार्थ्यांची निवड प्राप्त झालेल्या अनुदानाच्या आधारवर करण्यात येत होती, परिणामी, जनावरांची खरेदी आणि वाटप करण्यात विलंब होत होता. यामुळे जनावरांचे वाटप जानेवारी (चालू आर्थिक वर्षात) आणि ऑगस्ट (पुढील आर्थिक वर्षात) महिन्या दरम्यानच करता येऊ शकत होते.<br>विविध स्तरांवर वेळापत्रकाचे पालन न करण्यात आल्यामुळे पात्र लाभार्थ्यांना चार ते ११ महिन्यांचा विलंब झाला.<br>उत्तरादाखल जिल्हा पशुसंवर्धन अधिकाऱ्यांनी नमूद केले (एप्रिल २०१६) की प्रशासनिक कारणांमुळे विविध स्तरांवर विलंब झाला. वस्तुस्थिती कायम आहे की प्रशासनिक विलंबामुळे लाभार्थी वांछित लाभांपासून वंचित राहिले, जे टाळता येऊ शकले असते. | पशुसंवर्धन विभागाच्या राज्यस्तरीय नाविन्यपूर्ण योजनाच्या अनुषंगाने लाभार्थ्यांकडून अर्ज मागविणे, पात्र लाभार्थ्यांची अंतिम यादी तयार करणे, जनावरांची प्रत्यक्ष खरेदी इत्यादी बाबींच्या संदर्भात आखलेले वेळापत्रक अन्वयार्थाने सदरच्या जिल्हास्तरीय योजनेसाठी लागू करण्यात आले आहे.<br>शासन सामाजिक न्याय विभागाकडून योजनेच्या निधीचे वितरण आयुक्त पशुसंवर्धन कार्यालयाला झाल्यानंतर तसेच शासन आदिवासी विकास विभागाकडून निधीचे वितरण जिल्हाधिकारी कार्यालयांना करण्यात आल्यानंतर या कार्यालयांकडून अनुक्रमे विशेष घटक योजनेतील निधी आणि जिल्हाधीकारी कार्यालयाकडुन आदिवासी उपयोजना व ओटीएसपी खालील निधी "दुधाळ जनावरांचे गट वाटप" योजनेकरिता अंमलबजावणी अधिकाऱ्यांना बीडीएसवर प्रत्यक्ष वितरित करण्याची कार्यपदधती अंमलात आणलेली आहे. या कार्यपध्दतीमध्ये ज्या महिन्यात शासन स्तरावरुन निधी प्राप्त झाला शक्यतो त्याच महिन्यात सदरचा निधी जिल्हास्तरीय अधिकाऱ्यांना उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न राहिलेला आहे.<br>दुधाळ जनावरांची प्रत्यक्ष खरेदी व वाटप विहित वेळापत्रकानुसार न होता विंलंबाने म्हणजेच संबधित आर्थिक वर्षातील माहे जानेवारी ते पुढील आर्थिक वर्षाच्या ऑगस्ट महिन्यापर्यंत करण्यात आले या आक्षेपित बाबींच्या अनुषंगाने सादर करणेत येत की, निवड झालेल्या लाभार्थीनी त्यांचा २५ टक्के हिस्सा अपेक्षित कालावधीत व जनावरांची खरेदी करणेपूर्वी जमा करणेमध्ये काही प्रकरणांत विलंब झाल्यामुळे जनावरांची प्रत्यक्ष खरेदी व वाटप करण्यात विलंब झाल्याचे दिसून येते.<br>तथापी विहित वेळापत्रकानुसार योजनेची अंमलबजावणी करण्यात यावी या करिता पशुसंवर्धन आयुक्त कार्यालयाने कार्यान्वयन अधिकाऱ्यांना सुचना निर्गमित केलेल्या असून (उदा.वर्ष २०१५-१६ करिता पसं-१३/१३/मा.सु.२०१५-१६/२७५०-५६/२०१५/ पसं-१३ पुणे-७ दिनांक २४/६/२०१५ आणि पशुधन-१/ प्र.क्र.३७६/५८३०/२०१८/ पसं-१३, पुणे-६७ दिनांक २९/१२/२०१६ अन्वये (प्रत संलग्न ) यापुढे जनावरांची खरेदी करण्यामध्ये विलंब होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडे आवश्यक पाठपुरावा करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| २.१.२.३<br>(पृष्ठ क्र. १९) | **जास्त वयाच्या गाईंची खरेदी**<br>इंडियन कौन्सिल ऑफ अग्रिकल्चर रिसर्चच्या अहवालानुसार जर्सी गाईचे वय पहिल्या वासराला जन्म देते वेळी २६-३० महिने असावयास पाहिजे. योजनेच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये असे विनिर्दिष्ट आहे की ज्या जनावरांना दोन ते तीन वेळा वासरु झाले आहे अशीच जनावरे खरेदी करावयास पाहिजे, म्हणजेच खरेदीच्या वेळी जनावराचे इष्टतम वय साडे-तीन वर्षे ते साडे-चार वर्षे (पहिल्या वासरुच्या वेळी -२.५ वर्षे, दुसऱ्या वासरुच्या वेळी - ३.५ वर्षे आणि तीसऱ्या वासरुच्या वेळी -४.५ वर्षे) असावयास पाहिजे.<br>नमूना तपासणी केलेल्या १२ पशुधन विकास अधिकाऱ्यांच्या दस्तावेजांमध्ये असे आढळून आले की २१७ लाभार्थ्यांसाठी २०११-१६ दरम्यान खरेदी केलेल्या ३६४ गाईंपैकी १५८ (४३ टक्के) पाच ते सात वर्षे वयाच्या होत्या. म्हणजेच, ज्यांची दूध देण्याची क्षमता घटत होती अशी जास्त वयाची जनावरे खरेदी करण्यात आलीत.<br>उत्तरादाखल पशुधन विकास अधिकाऱ्यांनी नमूद केले (मार्च ते मे २०१६) की जनावरे लाभार्थ्यांच्या निवडीनुसार खरेदी करण्यात आले. उत्तर मान्य करणे योग्य नाही कारण खरेदी समितीने जनावरांची खरेदी करते वेळी योजनेच्या मार्गदर्शक सूचनांचे पालन करावयास हवे होते. | "लाभार्थींना वयस्कर/ कमी दुग्धोत्पादन क्षमतेच्या गाई पुरवठा केल्या" या आक्षेपाच्या अनुषांगाने सादर करणेत येते की, संकरित दुधाळ गाईंच्या एकूण दुग्धोत्पादन देण्याच्या वयामध्ये जास्तीत जास्त आठ वेत होतील असे गृहीत धरल्यास दुसऱ्या व तिसऱ्या वेतामधील दुग्धोत्पादन सर्वात जास्त प्रमाणात (Peak production ) असते. त्यानंतरच्या चवथ्या ते सहाव्या वेतातील दुग्धोत्पादन हे Peak production पेक्षा थोडे कमी परंतू सातत्यपूर्वक उच्च पातळीवरील राहते. सातव्या वेतापासून पुढील वेतामधील दुग्धोत्पादन मात्र हळू हळू कमी होते. अर्थात या बाबीं बरोबरच प्रत्येक दुधाळ गाईची दुग्धोत्पादन क्षमता, व्यवस्थापन पध्दती, देण्यात येणारे खादय, (खादयाचे प्रमाण व गुणवत्ता ), रोगराईपासून संरक्षण, विहित कालावधीतच उपलब्ध करून देण्यात आलेल्या पैदाशीच्या सुविधा आणि स्थानिक वातावरण (वातावरणातील तापमान व आर्द्रता), या सर्व बाबींचाही दुग्धोत्पादनावर निश्चित मोठा परिणाम होतो. त्याचप्रमाणे लेखाआक्षेपात नमूद केल्यानुसार दुधाळ जनावराचे पहिल्या वासराच्या जन्माचे वेळचे वय अडीच वर्षे व त्यानंतर दरवर्षी एक वासरू जन्मास येणे अशी स्थिती फक्त Ideal Condition मध्येच शक्य आहे. लक्षांकीत लाभार्थ्यांच्या घरी याप्रमाणे व्यवस्था उपलब्ध होणे जिकिरीचे आहे.<br>क्षेत्रियस्तरावर/ शेतक-यांच्या दारात भौगोलिक परिस्थितीनुसार गाई/ म्हशी २४-३० महिन्यामध्ये वयात येतात म्हणजे अंदाजे ३.५ वर्षात प्रथम वेत मिळते व त्यानंतर १.५ ते २.० वर्षांनी दुसरे वेत म्हणजे ४.५ ते ५ वर्षात २ रे वेत मिळते तसेच जास्त दुध देणाऱ्या गाई दुधात असतांना त्या आटवून त्यांचे पासून एका वर्षात वेत घेण्याची मानसिकता पशुपालकांमध्ये क्षेत्रिय स्तरावर दिसून येत नाही. त्याचप्रमाणे चांगले दुग्धोत्पादन व प्रजनन क्षमता असलेल्या गाईंची विक्री करण्यास मालक सहसा तयार होत नाहीत वा रु ४०,००० किंमतीमध्ये विक्री करण्यास उत्सुक नसतात, हा देखिल अनुभव आहे.<br>यानुसार काही प्रकरणामध्ये पाच ते सात वर्षे वयाच्या संकरित गाईंचा पुरवठा केल्यामुळे कमी दुग्धोत्पादन मिळून लाभार्थ्यांचे नुकसान झाले, अशी वस्तुस्थिती नाही.<br>दुसरी बाब अशी की, या योजनेपध्ये दुधाळ जनावरांची खरेदी लाभार्थ्यांच्या पसंतीने करणे अभिप्रेत तथा आवश्यक असल्यामुळे लाभार्थींनी निवड केलेल्या गाईंना वयाच्या कारणास्तव नाकारणे खरेदी समितीला संयुक्तीक वाटले नव्हते. |

| | | |
|---|---|---|
| २.१.२.४<br>(पृष्ठ क्र. २०) | **विनिर्दिष्ट अंतर न राखता जनावरांचे वाटप**<br>योजनेच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये विनिर्दिष्ट आहे की सुरुवातील एका लाभार्थ्यास एक दुभते जनावर दयावयास पाहिजे आणि नंतर सहा महिन्यांच्या कालावधीनंतर किंवा पहिल्या दुभत्या जनावराने दूध देणे बंद केल्यानंतर, यापैकी जे आधी घडेल ते, दुसरे जनावर दयावयास पाहिजे, जेणे करुन दुधाचे उत्पादन सातत्याने होत असल्याची खात्री करता येईल आणि लाभार्थ्यांसाठी सातत्याने उत्पन्नाचे साधन उपलब्ध होईल.<br>पडताळणीत असे निदर्शसनास आले (मार्च ते मे २०१६) की पाच[3] पशुधन विकास कार्यालयांमध्ये ७६ लाभार्थ्यांना एकाच वेळी दोन जनावरे देण्यात अली, तर आठ[4] पशुधन विकास कार्यालयांमध्ये १६३ लाभार्थ्यांना पहिले जनावर दिल्यानंतर दुसरे जनावर १० ते १३ महिन्यांच्या अंतराने देण्यात आले.<br>उत्तरादाखल पशुधन विकास अधिकारी, गडचिरोली आणि देसाईगंज ने नमूद केले (एप्रिल आणि मे २०१६ ) की दोन्ही जनावरे एकाच वेळी देण्यात आले कारण लाभार्थी दुसऱ्या जनावरासाठी पुनः वाहतूक खर्च अदा करण्यास तयार नव्हते. लाखनी, रामटेक आणि कळमेश्वर पशुधन विकास अधिकारी यांनी नमूद केले (मार्च आणि मे २०१६ ) की दोन जनावरे एकाच वेळी देण्यात आली कारण विनिर्दिष्ट अंतराने दुसऱ्या जनावरासाठी पर्याप्त निधी मिळण्याबाबत साशंकता होती. १० ते १३ महिन्यांच्या अंतराबाबत संबंधित पशुधन विकास अधिकाऱ्याने सांगितले (मार्च ते मे २०१६ ) की निधी मिळाल्यावर खरेदी प्रक्रिया अवलंबविण्यात आली.<br>उत्तर मान्य करणे योग्य नाही कारण लाभार्थी तयार नसतील अशा प्रकरणांत प्रतिक्षा सूचीच्या (Waitlisted) | ज्या प्रकरणामध्ये लाभार्थ्याला दोन दुधाळ जनावरे खरेदी करुन पुरवठा करण्यात आली त्या प्रकरणामध्ये खालील प्रमाणे वस्तुस्थितीजन्य कारणे असल्याचे निदर्शनास आले आहे.<br>➢ खरेदीच्या ठिकाणापासून लाभार्थीच्या घरापर्यंत /गावापर्यंत जनावरांच्या वाहतूकीसाठी लाभार्थ्याने खर्च करणे आवश्यक व अभिप्रेत होते. हा वाहतुकीचा खर्च दोनदा करण्यास लाभार्थ्यांची अनुत्सुकता व वाहतुक खर्चामध्ये बचत होणेसाठी एकाच वेळी दोन दुधाळ जनावरे खरेदी करणेबाबत काही लाभार्थ्यांची मागणी, अशा लाभार्थ्यांची आर्थीक स्थिती विचारात त्यांना दोन दुधाळ जनावरे एकाच वेळी खरेदी करुन पुरविण्यात आली.<br>➢ . पहिले दुधाळ जनावर पुरवठा केल्यानंतर दुसरे दुधाळ जनावर पुरवठा करणेसाठी १० ते १३ महिन्यांचा कालावधी लागल्याच्या आक्षेपित बाबींच्या अनुषंगाने सादर करणेत येते की, या प्रकरणी लाभार्थीनी दुसरे दुधाळ जनावर खरेदी करणेसाठी आवश्यक असलेली लाभार्थी हिश्याची रक्कम लवकर जमा न केल्यामुळे दुसऱ्या दुधाळ जनावराची खरेदी त्यांच्या हिश्याची रक्कम प्राप्त झाल्यानंतरच करणे क्रमप्राप्त होते. यामध्ये काही प्रकरणांत १० ते १३ महिन्यांचा कालावधी लागला परंतु येथे सादर करणे आवश्यक आहे की,एक दुधाळ जनावर पुरविलेल्या लाभार्थ्याला दुसरे दुधाळ जनावर पुरविणे आवश्यक तथा क्रमप्राप्त होते. अशा लाभार्थीनी दुसऱ्या दुधाळ जनावराप्रित्यर्थ लाभार्थी हिश्याची रक्कम लवकर जमा केली नाही म्हणून त्यांचे ऐवजी प्रतिक्षाधिन लाभार्थी निवडून त्यांना दुधाळ जनावरे पुरविणे सयुक्तीक नव्हते.<br>असे असले तरीही योजनेच्या मंजूर स्वरुपानुसार निवड केलेल्या लाभार्थ्यांना दोन दुधाळ जनावरे सहा महिन्यांचा अंतराने पुरवठा करणेबाबत योग्य ती दक्षता घेणेसाठी आयुक्त पशुसंवर्धन कार्यालयाने जावक क्र.पशुधन-१/ प्र.क्र.३७६/५८३०/२०१८/ पसं-१३, पुणे-०७ दिनांक २९/१२/२०१६ अन्वये सुचना निर्गमित केल्या आहेत (प्रत संलग्न) |

| | | |
|---|---|---|
| | लाभार्थ्यांची निवड करावयास पाहिजे होती. तसेच, जिल्हा पशुसंवर्धन अधिकाऱ्यांकडून मागणी केल्याप्रमाणे निधी मिळाला होता आणि म्हणूनच निधीच्या प्राप्तीबाबत कोणत्याही प्रकारची साशंकता नव्हती. लाभार्थ्यांना सातत्याने दूध उत्पादन आणि नियमित उत्पन्नाचे साधन पुरविण्याचा लाभ देण्यात आला नाही.<br>----------------------------------------------------<br>([३]) देसाईगंज, गडचिरोली, कळमेश्वर, लाखनी आणि रामटेक<br>([४]) भंडारा, चंद्रपूर, गोंदिया, हिंगणघाट, लाखनी, नागभीड, तिरोडा आणि वर्धा | |
| २.१.२.५<br>(पृष्ठ क्र. २१) | **लाभार्थ्यांव्दारे जनावरांची विक्री**<br>योजनेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार, लाभार्थ्याने खरेदी तारखेपासून तीन वर्षापर्यन्त जनावरांना ठेवावयास पाहिजे. जनावरांना तीन वर्षे ठेवण्यात आले नसल्या प्रकरणांत, लाभार्थ्याकडून शासन सहाय्य निधी व्याजासहित एक रकमी वसूल करावयास पाहिजे.<br>नमूना तपासणी केलेल्या १२ पशुधन विकास अधिकाऱ्यांपैकी पाच[५] पशुधन विकास अधिकाऱ्यांकडे विक्री केलेल्या जनावरांचे प्रत्यक्ष पडताळणी अहवाल होते. या अहवालावरुन असे निदर्शनास आले की २०११-१६ दरम्यान ९५५ पैकी ७३ लाभार्थ्यांनी रु.४२.८० लाख किंमतीची १०७ जनावरे खरेदीच्या तारखेपासून तीन वर्षांच्या आत विकली आणि या प्रकरणात कोणतीही वसुली करण्यात आली नव्हती.<br>लेखापरीक्षेव्दारे करण्यात आलेल्या लाभार्थ्यांच्या संयुक्त प्रत्यक्ष पाहणीत (एप्रिल आणि मे २०१६ ) असे निदर्शनास आले की वरील प्रकरणांच्या व्यतिरिक्त दोन पशुधन विकास अधिकाऱ्यांच्या (चंद्रपूर आणि लाखनी ) सहा लाभार्थ्यांनी रु. चार लाख किंमतीची १० जनावरे खरेदी पासून तीन | बाजारातून लाभार्थीच्या पसंतीने दुधाळ जनावर खरेदी केल्यानंतर सदर जनावर लाभार्थींच्या स्वाधीन करण्यात आलेले होते. बहुतांश लाभार्थी हे दारिद्रयरेषेखालील असून काही लाभार्थी हे भूमिहीन सुदधा होते. त्यांना वैरण व पशुखादयाचा वाढीव खर्च व उत्पन्नाचा मेळ न बसल्यामूळे पशुधन विक्री केली असल्याची शक्यता नाकारता येत नाही.<br>दुधाळ जनावरे वाटप करण्यात आलेले लाभार्थी प्रामुख्याने दारिद्ररेषेखालील आणि मागासवर्गीय (अनुसुचित जाती वा जमातींचे ), असून त्यांची कमकुवत आर्थिक स्थिती पाहता अनुदानाच्या वसूली बाबत विचार हाणे आवश्यक वाटते. तथापी अशा लाभार्थ्यांनी जनावरे विकली असल्यास त्यांचेकडून महसुली पदधतीने अनुदानाची रक्कम वसूल करण्याच्या सुचना शासन निर्णयात आहेत. त्यासंबधी तहसिलदार तसेच जिल्हयाधिकारी यांच्याकडे संबधित कार्यप्रणाली राबवून पाठपुरावा करण्यात येईल.<br>जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद गडचिरोली, यांनी कळविले आहे की, गडचिरोली जिल्हयात लेखापरिक्षण कालावधीत विशेष घटक योजनेअंतर्गत वाटप करण्यात आलेल्या जनावरांची लाभार्थ्यांनी ३ वर्षाच्या आत विक्री केल्याचे एकही प्रकरण निदर्शनास आले नाही. |

| | | |
|---|---|---|
| | वर्षांच्या आत विकली, परंतु त्यांचेकडून कोणतीही वसुली करण्यात आली नाही. पाच[६] पशुधन विकास अधिकाऱ्यांच्या १२ लाभार्थ्यांकडे २३ जनावरे होते, परंतु संयुक्त प्रत्यक्ष पाहणीत १८ जनावरे आढळली नाही आणि त्यांच्याबाबत ती जनावरे चारा चरण्यासाठी सोडण्यात आले असल्याचे सांगण्यात आले. म्हणून या प्रकरणांत, या जनावरांच्या अस्तित्वाबाबत लेखापरीक्षेस पडताळणी करता आली नाही.<br>विचारणा केल्यावर लाभार्थ्यांनी जनावरांच्या विक्रीसाठी पुरेसा चारा उपलब्ध नसणे, जनावराचे कमजोर आरोग्य, कमी दूध उत्पादन, जनावरांमध्ये वंध्यत्व, गाई हाताळण्यात येणाऱ्या अडचणी इत्यादि कारणे दिली. या प्रकरणांत, वसुलीचे स्पष्ट प्रावधान असल्यानंतरही जिल्हा पशुसंवर्धन अधिकाऱ्यांनी कसूर करणाऱ्या लाभार्थ्यांकडून वसुली केली नव्हती.<br>उत्तरादाखल जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, भंडारा, गडचिरोली, गोंदिया, आणि नागपूर यांनी वसुलीची कारवाई करण्यात येईल, असे नमूद केले (जुलै २०१६). RJC नागपूर यांनी वसुली न करण्याबाबतची वस्तुस्थिती मान्य करुन नमूद केले (मे २०१६) की क्षेत्रीय कार्यालयांना, ज्या लाभार्थ्यांनी तीन वर्षांच्या आत जनावरे विकली होती, त्यांच्याकडून वसुली करण्याची कारवाई करण्यासंबंधी सूचना जारी केल्या आहेत (मे २०१६).<br>(५) भंडारा, देसाईगंज, गडचिरोली, कळमेश्वर, आणि तिरोडा<br>(६) चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया, हिंगणघाट, आणि कळमेश्वर. | |

<table>
<tr>
<td>२.१.२.६<br>(पृष्ठ क्र. २२)</td>
<td>दुभत्या जनावरांची नियम बाह्य खरेदी<br>योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जनावरांची खरेदी एका खरेदी समितीद्वारे ज्यात पशुधन विकास अधिकारी, पशुवैद्यकिय इस्पितळाचे मुख्य, ग्राम दुग्ध सहकारी संस्था सदस्य, बॅंक प्रतिनिधी आणि लाभार्थी असावयास पाहिजे होती. लेखापरिक्षेस असे निदर्शनास आले की गडचिरोली पशुधन विकास कार्यालयामध्ये रु.११.२० लाख किंमतीची सर्व २४ जनावरे पशुधन विकास अधिकाऱ्याने २०१२-१५ दरम्यान खरेदी समिती गठीत न करता खरेदी केली. RJC नागपूर यांनी नमुद केले (मे २०१६) की संबंधित जिल्हा पशुसंवर्धन अधिकाऱ्यांला कारवाई करण्याचे निर्देश देण्यात येतील.</td>
<td>जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद गडचिरोली यांनी प्रमाणीत करुन कळविले आहे की, गडचिरोली जिल्हयात एकाही विमा कंपनीचे कार्यालय नसल्यामुळे व विम्याची प्रक्रीया नजिकच्या चंद्रपूर जिल्हयात जावून पुर्ण करावी लागत असल्यामुळे गडचिरोली जिल्हयात जनावरांची खरेदी करतेवेळी खरेदी समितीमधील विमा प्रतिनिधी उपलब्ध होत नाही. ही बाब विचारात घेऊन खरेदी समितीमधील पशुधन विकास अधिकारी (विस्तार), लाभार्थी ज्या पशुवैद्यकीय दवाखाण्याच्या कार्यक्षेत्रात वास्तव्यास आहे त्या दवाखान्याचा संस्था प्रमुख, लाभार्थी या तिघांच्या उपस्थितीमध्ये जनावरांची खरेदी करण्यात आलेली आहे. गडचिरोली हा दुर्गम नक्षलग्रस्त आदिवासी जिल्हा असल्यामुळे वरील स्थितीत खरेदीबाबतची कार्यवाही विशेष बाब म्हणून क्षमापित करण्यात यावी.</td>
</tr>
<tr>
<td>२.१.२.७<br>(पृष्ठ क्र. २२)</td>
<td>जनावरांची महाराष्ट्र एनिमल आयडेंटिफिकेशन ॲंड रेकॉर्डिंग ऑथॉरिटी यांचेकडे नोंदणी न करणे.<br>महाराष्ट्र पशुधन विकास बोर्ड यांनी जनावरांना टॅग्स लावणे (Implant tags) आणि त्यांची नोंदणी करणे यासाठी महाराष्ट्र एनिमल आयडेंटिफिकेशन ॲंड रेकॉर्डिंग ऑथॉरिटी (MAIRA) ची स्थापना केली. जनावरांचे आणि त्यांच्या परिसराची ऑनलाईन नोंदणी दस्तावेज राखण्यासाठी सुद्धा MAIRA जबाबदार होते.<br>योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जनावरांच्या स्थानांची माहिती मिळवणे आणि जनावरांचा ऑनलाईन डेटा योजनेअंतर्गत राखण्यासाठी सर्व जनावरांची MAIRA कडे नोंदणी करणे अनिवार्य होते. नमुना तपासणी केलेल्या १२ पशुधन विकास कार्यालयामध्ये योजनेंतर्गत २०११-१६ दरम्यान खरेदी करण्यात आलेल्या ६२७ जनावरांची MAIRA मध्ये नोंदणी आली नव्हती.<br>सर्व पशुधन विकास अधिकाऱ्यांनी नमुद केले (मार्च ते मे</td>
<td>योजनेच्या मार्गदर्शक सूचनानुसार दुधाळ जनावरांच्या स्थानांची माहिती मिळविणे आणि जनावरांचा ऑनलाईन डेटा योजनेंतर्गत राखण्यासाठी सर्व जनावरांची (MAIRA) कडे नोंदणी करणे अनिवार्य होते. परंतू त्याकालावधीत सदर प्रणाली नविन होती. त्यानंतर कालांतराने केंद्र शासनाने ( INAPH ) या संगणक प्रणालीमध्ये दुधाळ जनावरांची नोंदणी करणे बंधनकारक केले. त्यानुसार प्रत्येक जिल्हयात जनावरे नोंदणीचे काम सुरु आहे. त्याची दिनांक ५/२/२०१९ अखेरची संदर्भाकीत जिल्हयातील आकडेवारी खालील प्रमाणे
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>जिल्हाचे नाव</th><th>नोंदणी करण्यात आलेल्या जनावरांची संख्या</th></tr>
<tr><td>१</td><td>नागपूर</td><td>३२८९१</td></tr>
<tr><td>२</td><td>वर्धा</td><td>२३८८९</td></tr>
<tr><td>३</td><td>भंडारा</td><td>२०४९८</td></tr>
<tr><td>४</td><td>गोंदीया</td><td>२१०४४</td></tr>
<tr><td>५</td><td>चंद्रपूर</td><td>२२२३१</td></tr>
<tr><td>६</td><td>गडचिरोली</td><td>२०१७१</td></tr>
</table>
</td>
</tr>
</table>

| | | |
|---|---|---|
| | २०१६) की MAIRA अंतर्गत जनावरांची नोंदणी करण्याबाबत कोणत्याही सूचना नव्हत्या.<br>उत्तर मान्य करणे योग्य नाही कारण योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार योजनेंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या सर्व जनावरांची MAIRA कडे नोंदणी करणे अनिवार्य होते. | |
| २.१.२.८ (पृष्ठ क्र. २२) | **दुभत्या जनावरांचा विमा उतरविण्यातील विलंब**<br>या योजनेखाली वाटप करण्यात आलेल्या दुभत्या जनावरांचा लाभार्थी व संबंधित जिल्हयातील पशुसंवर्धन अधिकारी यांच्या नावे ३ वर्षासाठी विमा उतरविण्यात आला पाहिजे होता. लेखापरिक्षेस असे निदर्शनास आले की विमा लाभार्थी आणि जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी ऐवजी संबंधित पशुधन विकास अधिकाऱ्यांच्या नावे उतरविण्यात आला होता. तसेच, जनावरांच्या खरेदीच्या वेळी पशुधन विकास अधिकारी विमा हप्त्यासाठी निधी काढू न शकल्यामुळे, ६२७ पैकी ६२० जनावरांचा विमा उतरविण्यात १२६ दिवसांपर्यंतचा विलंब झाला.<br>संबंधित पशुधन विकास अधिकारी यांनी प्रशासनिक कारणांमुळे विलंब झाल्याचे नमुद केले (मार्च ते मे २०१६) उत्तर मान्य करणे योग्य नाही कारण संबंधित BDOs नी अशा प्रकारचा प्रशासनिक विलंब टाळावयास हवा होता. | दुधाळ जनावरांचा विमा, लाभार्थी आणि जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांचे नावे उतरविण्या बाबत निर्देश असतांना या प्रकरणी लाभार्थी आणि पशुधन विकास अधिकारी यांच्या नावे विमा उतरविणे हि बाब क्षेत्रिय स्तरावरील गरज आणि विमा दावे मंजूर होण्याच्या प्रक्रियेतील लागणारा विलंब काही प्रमाणात टाळता येणेसाठी जरी अवलंब केली असली तरी विमा उतरविण्यामध्ये चार महिन्यांपर्यंत कालावधीचा विलंब झाला परंतू दुधाळ जनावरांचा विमा निश्चित उतरविण्यात आला हि वस्तुस्थिती आहे. याबाबत विहित कार्यपदधती न बदलणेसाठी आयुक्त पशुसंवर्धन कार्यालयाने पशुधन-१/ प्र.क्र.३७६/५८३०/२०१८/ पसं-१३, पुणे-६७ दिनांक २९/१२/२०१६ अन्वये सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. (प्रत संलग्न) तसेच यापुढें अशा स्वरुपाचा विलंब होणार नाही यांची दक्षता घेणेबाबत क्षेत्रिय अधिकाऱ्यांकडे पाठपुरवा करण्यात येईल. |
| २.१.२.९ (पृष्ठ क्र. २३) | **लाभार्थ्यांचे प्रशिक्षण**<br>योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रत्येक लाभार्थ्यास पशुपालन विषयक प्रशिक्षण देणे क्रमप्राप्त होते. लेखापरिक्षेस असे निदर्शनास आले की, पाच जिल्हा पशुसंवर्धन कार्यालयांमधील १,४९२ लाभार्थ्यांपैकी २७३ (१८ टक्के) लाभार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले, तर गोंदिया मधील सर्व ८८० लाभार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले होते. | योजनेच्या मार्गदर्शक सूचनानुसार प्रत्येक लाभार्थ्यास पशुपालन विषयक प्रशिक्षण देणे क्रमप्राप्त होते. परंतू गोंदीया जिल्हा वगळता इतर जिल्हयात प्रशिक्षणाकरीता निधी उपलब्ध नसल्याने प्रशिक्षण देण्यात आले नव्हते. मात्र जनावरांचे वाटप झाल्यानंतर संबधित पशुपालाकांना पशुवैद्यकीय संस्थेत तसेच तांत्रिक शिबिराच्या माध्यमातून प्रशिक्षीत करण्यात आले होते. सन २०१६-१७ पासून संबधित लाभार्थी यांना प्रशिक्षण देण्याबाबत प्रशिक्षणाचा नियमित कार्यक्रम राबविण्यात आलेला आहे. (सुलभ संदर्भाकरिता प्रत संलग्न) तसेच ASCAD योजनेंतर्गत तालुकास्तरावर तांत्रिक चर्चासत्राचे आयोजन करण्यात येते. त्या |

| | | |
|---|---|---|
| | पाच जिल्हा पशुसंवर्धन अधिकाऱ्यांनी नमुद केले (मार्च ते एप्रिल २०१६) की अर्थसंकल्पीय तरतुद नसल्यामुळे प्रशिक्षण देण्यात आले नाही. ही वस्तूस्थिती कायम आहे की पाचही जिल्हा पशुसंवर्धन अधिकाऱ्यांनी लाभार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी आयुक्त यांचेकडे निधीची मागणी केली नव्हती.<br>(७) भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, नागपूर आणि वर्धा | माध्यमातून सुदधा पशुपालकांना प्रशिक्षित करण्यात येते. ज्या जिल्हयांना जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत विशेष घटक योजनेंतर्गत तरतूद उपलब्ध होती त्यांचे नियमित प्रशिक्षण घेण्यात आले आहे. |
| २.१.२.१० (पृष्ठ क्र. २३) | **योजनेबद्दल जनजागृती करण्याचा अभाव**<br>योजनेच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये विनिर्दिष्ट होते की, योजनेंतर्गत लाभ मिळण्यासाठी योजनेची व्यापक प्रसिद्धी देऊन लाभार्थ्यांकडून अर्ज मागवावयास हवे होते. भंडारा वगळता, इतर जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी आणि **BDO** स्तरावर प्रसिद्धी देण्यात आली नव्हती. परिणामी, सहा जिल्हयांमध्ये प्राप्त झालेल्या एकूण ८,६७३ अर्जापैकी ३,३९३ अर्ज (३९ टक्के) एकटया भंडारा जिल्हयाचे होते.<br>उर्वरित पाच(८) जिल्हा पशुसंवर्धन अधिकाऱ्यांनी उत्तर दिले की प्रसिध्दीसाठी निधीची तरतूद नसल्यामुळे प्रसिध्दी देण्यात आली नाही.<br>उत्तर मान्य करणे योग्य नाही कारण प्रसिद्धी ही या योजनेचा एक अविभाज्य भाग आहे आणि संबंधित प्राधिकाऱ्यांनी निधीची मागणी करतेवेळी याबाबत मागणी करावयास हवी होती.<br>(८) गोंदिया, गडचिरोली, नागपूर, चंद्रपूर आणि वर्धा. | योजनेचा शासन निर्णय तसेच मार्गदर्शक सुचनामध्ये योजनेच्या प्रसिदधीसाठी स्वतंत्र आर्थिक तरतूद दर्शविण्यात आलेली नाही. त्यामुळे ग्रामपंचायत स्तरावर असलेल्या सुचना फलकांवर जाहिरात करणे, पंचायत समिती आणि पशुवैदयकीय दवाखान्यांच्या स्तरावर योजनेची माहिती व अर्ज करण्याच्या कार्यपदधतीची माहिती प्रदर्शित करणे, ग्रामसेवकांची बैठक घेऊन त्यांना ग्रामसभांमध्ये/ ग्रामस्तरांवर योजनेस प्रसिदधी देणे अपेक्षित आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात येते. |
| २.१.३ (पृष्ठ क्र. २३) | **संनियंत्रण आणि मूल्यांकन** | |
| २.१.३.१ (पृष्ठ क्र. २३) | **अपर्याप्त संनियंत्रण**<br>योजनेच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये असे विनिर्दिष्ट होते की योजनेंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या सर्व जनावरांचे | योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार दर ३ महिन्यांनी योजनेंतर्गत खरेदी केलेल्या जनावरांचा पाठपूरावा करणे अपेक्षित होते त्याप्रमाणे पाठपुरावा करण्यात आलेला आहे (सुलभ संदर्भाकरीता प्रत संलग्न) |

| | | |
|---|---|---|
| | गावातील पशुवैद्यकिय इस्पितळांद्वारे (VHs) तिमाही प्रत्यक्ष पडताळणी करावी. पशुधन विकास अधिकारी आणि जिल्हा पशुसंवर्धन अधिकाऱ्यांनी खरेदी करण्यात आलेल्या जनावरांची अनुक्रमे वार्षिक २५ टक्के आणि १० टक्के पडताळणी करावी.पडताळणी संबंधात दस्तावेज ठेवावयास पाहिजे होते आणि वरिष्ठ प्राधिकाऱ्यांकडे, म्हणजेच VH ने पशुधन विकास अधिकाऱ्याकडे, पशुधन विकास अधिकाऱ्याने जिल्हा पशुसंवर्धन अधिकाऱ्याकडे आणि जिल्हा पशुसंवर्धन अधिकाऱ्याने RJC कडे सादर करावयास पाहिजे होते. VH ने जनावरांना आरोग्य विषयक आणि कृत्रिम रेतनाच्या सुविधा दयाव्या. VHs ने जनावरासंदर्भात स्वतंत्र नोदवहीमध्ये माज दाखविल्याचा दिनांक, कृत्रिम रेतनाचा दिनांक, गर्भ तपासणीचा दिनांक व निष्कर्ष, गाय/म्हैस प्रसुती दिनांक, नर/मादी वासरु, जन्मतः वासराचे वजन, जनावरापासून मिळालेले वेतातील दुध उत्पादन, इत्यादीची नोंद ठेवावयास हवी होती. नमुना तपासणी केलेल्या पशुधन विकास अधिकाऱ्यांच्या दस्तावेजांच्या पडताळणीत असे आढळले की:<br>▪ १२ पशुधन विकास अधिकाऱ्यांतर्गत असलेल्या ११७ VHs पैकी फक्त पशुधन विकास अधिकारी, चंद्रपूर आणि नागभीडच्या २२ VHs नी प्रत्यक्ष पडताळणी केली आणि २०११-१६ या कालावधीचे अहवाल पशुधन विकास अधिकाऱ्यांकडे सादर केले.<br>▪ १२ पशुधन विकास अधिकाऱ्यांतर्गत असलेल्या ११७ VHs जनावरांच्या तपशीलाच्या नोंदी ठेवण्यासाठी स्वतंत्र नोंदवही ठेवली नव्हती. | सन २०१५-१६ पासुन काही जिल्हयात नियमित तालुका स्तरावर सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन यांचे मार्फत विविध योजनेंतर्गत वाटप केलेल्या जनावरांचे Asset Verification करण्यात आलेले आहे. नागपूर, भंडारा, चंद्रपूर जिल्हयामध्ये लाभार्थींचा व दुधाळ जनावरांचा पाठपूरावा केल्याचे अहवाल प्राप्त आहेत. (सुलभ संदर्भाकरीता प्रत संलग्न)<br>आता संबधित संस्थेच्या कार्यक्षेत्रात वाटप करण्यात आलेल्या जनावरांचा पाठपुरवा नोंदवही ठेवण्यात येत असून त्यात जनावरांच्या आरोग्याविषयी तसेच दुध उत्पादनाविषयी सुदधा नोंदी घेण्यात येतात. पशुपालकांना वाटप करण्यात आलेल्या पशुधनापासुन आर्थिक फायदा झालेला असून त्यांच्या आर्थिक उत्पन्नात वाढ झाल्याचे निदर्शनास येते. |

| | | |
|---|---|---|
| | ■ १२ पशुधन विकास अधिकाऱ्यांपैकी सहा- पशुधन विकास अधिकारी भंडारा, देसाईगंज, गडचिरोली, गोंदिया, लाखनी आणि तिरोडा यांनी २०११-१६ या कालावधीत जनावरांची प्रत्यक्ष पडताळणी केली नव्हती तर नागपूर आणि रामटेक मध्ये २०११-१३ या कालावधीत पडताळणी करण्यात आली नव्हती.<br>■ सहा पैकी कोणत्याही जिल्हा पशुसंवर्धन अधिकाऱ्याने RJC ला प्रत्यक्ष पडताळणी अहवाल सादर केला नव्हता.<br>वरील स्थिती RJC नागपूर आणि आयुक्त यांच्या निदर्शनास आणण्यात आली. लेखापरिक्षा अभिक्षण मान्य करतांना आयुक्त यांनी क्षैत्रिय कार्यालयांना अहवाल सादर करण्याचे निर्देश देण्यात आले आहे, असे उत्तर दिले (जुलै २०१६) | |
| २.१.३.२<br>(पृष्ठ क्र. २४) | **योजनेचे मूल्यांकन न करणे**<br>लाभार्थ्यांना उत्पन्नाचे साधन उपलब्ध करुन देणे हे या योजनेचे उद्दिष्ट होते. तथापि, विभागाजवळ या योजनेच्या माध्यमातून निर्माण झालेल्या उत्पन्नाचे मूल्यांकन करण्यासाठी कोणतेही कार्यतंत्र नव्हते. म्हणून लेखापरीक्षेस या योजनेतून प्राप्त झालेल्या लाभांचे निर्धारण करता आले नाही.<br>याशिवाय, आर्थिक वर्ष संपल्यानंतर दर सहा महिन्यांनी प्रत्येक विभागासाठी RJC , पशुसंवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून या योजनेचे मूल्यांकन सदर समितीव्दारे करण्यासाठी आयुक्त जबाबदार होते आणि त्यांच्या अभिप्रायासह सदर योजनेचा मूल्यांकन अहवाल शासनास सादर करावयास हवी होता. | योजनेचे मुल्यांकन करणेसाठी प्रत्येक विभागाच्या प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन, यांच्या अध्यक्षतेखाली मुल्यमापण समिती नियुक्त केल्याबाबत आयुक्त पशुसंवर्धन कार्यालयाने मार्गदर्शक सुचनामध्ये स्पष्ट निर्देश दिलेले आहेत (संदर्भ आयुक्तालयाचे पत्र क्र पशुधन-३ /जी ०२/ दुजगायो/मासु/८२२१-८२९६/२०११, पसं-१३ पुणे- दिनांक ७/१२/२०११ आणि त्यानंतर दरवर्षी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सुचनानुसार )<br>तथापी, प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, नागपूर यांनी संबधित वर्षामध्ये राबविलेल्या सदरच्या योजनेचे वर्ष संपल्यानंतर पुढील सहा महिन्यात मुल्यमापन केले नाही . याबाबत प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, नागपूर यांनी कोणताही समाधानकारक खुलासा दिलेला नाही. तरी या त्रुटीसाठी संबधितास जबाबदार धरण्यात येत असून त्यांचेवर पुढील प्रशासकीय कारवाई करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | आयुक्त व RJC नागपूर यांच्या दस्तावेजांच्या पडताळणीत असे निदर्शनास आले (फेब्रुवारी आणि मे २०१६ ) की आयुक्तांनी योजनेचे मूल्यांकन करण्यासाठी नागपूर विभागामध्ये २०११-१६ या कालावधीत अशाप्रकारची कुठलीही समिती स्थापित केली नव्हती आणि म्हणूनच येथे योजनेचे मूल्यांकन झाले नव्हते.<br>उत्तरादाखल आयुक्तांनी नमूद केले (जुलै २०१६) की मूल्यांकन अहवाल क्षेत्रीय प्रमुखांजवळ उपलब्ध होते. उत्तर मान्य करणे योग्य नाही कारण RJC नागपूर यांनी आधीच उत्तर दिले होते (मे २०१६) की लेखापरीक्षा कालावधीत अशा प्रकारचे मूल्यांकन करण्यात आले नव्हते आणि पुढे भविष्यात मूल्यांकन करण्यात येईल. | |
| २.१.४<br>(पृष्ठ क्र. २५) | **निष्कर्ष**<br>महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागाने विशेष घटक योजना (Special Component Plan-SCP) त्याचप्रमाणे आदिवासी क्षेत्र उपयोजना (Tribal Sub Plan-TSP)) व आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजने अंतर्गत 'अनुसूचित जाती आणि जमातींच्या लाभार्थ्यांना स्वयंरोजगाराव्दारे उत्पन्नाचे साधन उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने दोन दुभत्या जनावरांचे गट (गाई/म्हशी) वाटप करणे' या योजनेची सुरुवात केली (नोव्हेंबर २०११). लाभार्थ्यांची निवड करण्याची पध्दत, निधीचे वाटप व वापर आणि लाभार्थ्यांव्दारे प्राप्त करण्यात आलेले लाभ यांचे मूल्यांकन करण्यासाठी लेखापरीक्षण करण्यात आले. लेखापरीक्षेस असे आढळले की निश्चित केलेल्या जास्तीत जास्त लाभार्थ्यांना योजनेत समाविष्ट करुन देण्यासाठी पर्याप्त निधीची मागणी करण्यात आली नव्हती, | लेखापरिक्षणात आढळून आलेल्या बाबींचा गोषवारा देण्यात आलेला असून त्यामध्ये नमूद केलेल्या बाबींपैकी अपूऱ्या निधीची मागणी याचे अनुषंगाने या आधी सादर केलेल्या उत्तराचे संदर्भात पुढे असे सादर करण्यात येते की, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद गडचिरोली यांनी लेखी कळविल्यानुसार गडचिरोली जिल्हयात आदिवासी लाभार्थींची दुधाळ जनावरे पाळून त्याचे दुध काढणे व विक्री करणे ही बाब सामाजिक व धार्मीक रितीरिवाजानुसार मान्य नाही त्यामुळे त्यांचा दुधाळ जनावरे पाळण्यासाठी प्रतिसाद मिळत नाही. त्याच प्रमाणे मंजूर योजनेखाली २५ टक्के लाभार्थी हिस्सा देखील भरणे आदिवासी लाभार्थींना शक्य होत नाही हि वस्तुस्थिती असल्यामुळे गडचिरोली जिल्हयात निधीची मागणी करण्यात आली नाही.<br><br>जनावरांची खरेदी आणि वाटप करण्याच्या प्रक्रियेत ४ ते १९ महीन्यांचा विलंब होण्याच्या संदर्भात पूर्वी सादर केल्यानुसार लाभार्थ्यांनी त्यांच्या हिश्शाची रक्कम जमा करेपर्यंत दुधाळ जनावरांची खरेदी करता आली नाही, हि बाब प्रामुख्याने कारणीभूत आहे. जास्त वयाच्या जनावरांची खरेदी करण्यात आल्याच्या आक्षेपाच्या अनुषंगाने या आधी सादर केल्यानुसार |

| | | |
|---|---|---|
| | घेण्यासाठी पर्याप्त निधीची मागणी करण्यात आली नव्हती, ज्यामुळे ७२ टक्के वैध अर्जदार योजनेच्या लाभापासून वंचित राहिले. जिल्हा प्राधिकाऱ्यांनी योजना राबविण्यासाठी निधीची मागणी न केल्यामुळे गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यांत (आदिवासी बहुल) योजनेच्या व्याप्तीपासून आदिवासी लोकांना दूर ठेवण्यात आले. प्रशासकीय प्रक्रियेच्या कामात विलंब झाल्यामुळे जनावरांची खरेदी आणि वाटप यात चार ते ११ महिन्यांचा विलंब झाला. जास्त वय झालेल्या जनावरांची खरेदी करण्यात आली आणि लाभार्थ्यांव्दारे जनावरांची विक्री केली असल्याच्या घटनाही निदर्शनास आल्या. सर्वस्तरावर संनियंत्रण अपर्याप्त होते. योजनेपासून पुरविण्यात येणाऱ्या लाभांचे मूल्यांकन करण्यासाठी कोणतेही प्रयत्न करण्यात आले नाही.<br>वरील उणीवांमुळे असे निदर्शित होते की योजनेची अंमलबजावणी प्रभावी नव्हती आणि म्हणूनच शासनाने योजनेच्या अंमलबजावणी आणि संनियंत्रण पध्दतीचे मूल्यांकन करण्याची आवश्यकता आहे.<br>जुलै २०१६ मध्ये ही बाब शासनास कळविण्यात आली, फेब्रुवारी २०१७ पर्यन्त त्यांचे उत्तर प्रतिक्षित होते. | दुधाळ गाईंचे पहिल्या वासराच्या जन्माच्या वेळचे सरासरी वय व त्यानुसार पुढील किमान १.५ वर्षांनंतर जन्मास येणारे वासरु हा सरासरी कालावधी विचारात घेतात. दुसऱ्या/ तीसऱ्या वासराच्या जन्माच्या वेळचे वय अनुक्रमे ३.५ वर्षे व ४.५ वर्षे या पेक्षा जास्त असणे हि वस्तुस्थिती विचारात घेणे आवश्यक आहे. दुधाळ गाईंची विक्री केल्यानंतर अनुदानाची रक्कम वसुल करण्यामध्ये जरी ठोस कार्यवाही झालेली नसली तरी योजनेचा लाभ मिळालेल्या मागसवर्गीय लाभार्थ्यांची कमकुवत आर्थिक स्थिती विचारात घ्यावी. अशी मा.समितीला विनंती करण्यात येत आहे.<br>लेखापरिक्षणामध्ये नमूद केलेल्या आक्षेपांचा गांभिर्याने विचार करुन यापुढे योजनेच्या अंमलबजावणी मध्ये अशा स्वरुपाच्या त्रुटी राहणार नाहीत याची दक्षता घेण्यात येईल, हि बाब मा.समितीला विनंतीपूर्वक सादर करण्यात येत आहे.<br>लेखापरिक्षणाने नमुद केलेल्या आक्षेपांवर शासनाचे पत्र (इंग्रजी) क्र.संकीर्ण-२०१६/सीआर २८२/एडीएफ-४/ मुंबई दिनांक २६/४/२०१७ अन्वये बाब निहाय अभिप्राय इंग्रजीतून मा.महालेखापाल नागपूर यांना सादर करण्यात आले आहेत. (प्रत संलग्न) |

**साक्ष :——**

**२.१** भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१५-१६ च्या स्थानिक संस्था अहवालातील **परिच्छेद क्रमांक २.१ " अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना दुभत्या जनावरांचे गट वाटप करणे या योजनेची अंमलबजावणी "** या परिच्छेदासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी कृषी व पदुम (पशुसंवर्धन) विभागाचे प्रधान सचिव तसेच विभागीय प्रतिनिधींची दिनांक १० जून, २०१९ रोजी समितीने साक्ष घेतली.

**परिच्छेद क्रमांक २.१.२.१ निश्चित केलेल्या लोकांपर्यंत लाभ पोहोचविण्याचे अपर्याप्त परिमाण :——**

विभागाच्या अधिका-यांना या परिच्छेदाबाबत अधिक माहिती सांगावयाची आहे काय ? अशी विचारणा साक्षीच्या वेळी समितीने केली असता, दुग्धविकास विभागामध्ये नागपूर विभाग मागासलेला असल्यामुळे त्या ठिकाणी डिमांड प्रोग्राम इम्प्लिमेंटेशन योग्य प्रकारे होत नाही. जिल्हा नियोजन समिती मार्फत उद्दिष्ट दिलेले असते. लाभार्थी निवडीची प्रक्रिया स्थानिक स्वराज्य संस्थांकडून म्हणजेच जिल्हा परिषद आणि पंचायत समिती स्तरावरून होत असते. तसेच या प्रक्रियेसाठी अधिक कालावधी लागत असतो. मुख्य म्हणजे या योजनेमध्ये लाभार्थी म्हणून पात्र होण्यासाठी २५ टक्के अग्रिम भरावे लागते. त्यामुळे त्या भागातील जो मागासवर्गीय समाज आहे त्यांची आर्थिक स्थिती २५ टक्के रक्कम भरण्याची नसते. कारण त्या ठिकाणी असलेल्या लाभार्थ्यांना शेती व्यवसायामधून पाहिजे तितके उत्पन्न मिळत नाही. त्याचप्रमाणे त्या ठिकाणी मोनो कल्चर असल्यामुळे अनुकूल वातावरण तयार होत नाही. त्यामुळे अनेक लोक मजुरीवर काम करीत असतात. गोंदिया, भंडारा जिल्ह्यामध्ये मनरेगा योजनेत मजुरीचा उच्चांक गाठला जातो. त्यामुळे दुभत्या जनावरांचा व्यवसाय करणारे उद्यमशील लोक त्यांच्या आर्थिक स्थितीमुळे २५ टक्के रक्कम भरू शकत नाहीत. फार कमी लोक अशा प्रकारची रक्कम भरत असतात. त्यामुळे या प्रक्रियेसाठी ८ ते ९ महिन्यांच्या कालावधी लागत असतो. अनेक वेळा दिलेल्या खर्चाचे उद्दिष्ट गाठले जात नाही. तसेच ज्यावेळी डी.पी.सी. (जिल्हा नियोजन समिती) पुर्ननियोजन करीत असते त्यावेळी आर्थिक ॲलोकेशन कमी केले जात असते. त्याचप्रमाणे पदुम विभागाला टीएसपी (आदिवासी क्षेत्र उपयोजना) आणि एससीपी (आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना) अंतर्गत पाहिजे तेवढे प्राधान्य दिले जात नाही. याचे मुख्य कारण असे आहे की, गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये मोठ्या प्रमाणात रिक्त पदे आहेत. गोंदिया जिल्ह्यामध्ये जवळपास ४५ टक्के पदे रिक्त आहेत. गडचिरोली जिल्ह्यामध्ये देखील ४० ते ४५ टक्के पदे रिक्त आहेत. त्यामुळे पंचायत समितीमध्ये अनेक एनजीओ नसतात. त्यामुळे कामासाठी विलंब होत असतो. लोकांपर्यंत लाभ पोहोचविण्यासाठी ज्या प्रमाणात कृती व्हावयास पाहिजे होती, त्याप्रमाणे झालेली नाही. तसेच योजनेच्या डिझाईनमध्ये २५ टक्के रक्कम आगाऊ भरावी लागते. जर अशाप्रकारची रक्कम लाभार्थ्यांनी न भरता त्यांना योजनेचा लाभ दिला तर ते त्यांची दुधाळ जनावरे विकू शकतात. त्यामुळे २५ टक्के रकमेची जी अट ठेवण्यात आलेली आहे ती अनुचित आहे, असे म्हणता येणार नाही. असे विभागीय सचिवांनी समितीला विदित केले.

विभागीय प्रतिनिधींनी जी वस्तुस्थिती विशद केलेली आहे ती समितीला मान्य आहे. तथापि, या योजनेसाठी ८ हजार लाभार्थ्यांची निवड केली आणि त्यापैकी केवळ २,३०० लाभार्थ्यांना पैसे दिले. त्यामुळे लाभार्थ्यांची निवड प्रक्रिया रद्द करण्याचे कारण असे सांगितले आहे की, विभागाकडे आवश्यक तेवढे पैसे उपलब्ध नाहीत. परंतु समितीचे असे मत आहे की, जो पर्यंत आवश्यक असलेल्या पैशांची मागणी होत नाही तो पर्यंत पैसे मिळत नाहीत. जिल्हा पशुवैद्यकीय अधिकारी ह्या सर्व योजना राबवित असतात. अनेक लाभार्थ्यांकडून याबाबतची मागणी होत असते. परंतु विभागाला लाभार्थ्यांची मागणी पूर्ण करता येत नाही. त्याचप्रमाणे यामध्ये लाभार्थ्यांची निवड करीत असताना त्यामध्ये भेदभाव केले जातात. कारण लाभार्थ्यांची निवड करण्याचा अधिकार हा स्थानिक स्वराज्य संस्थेला आहे. यामुळे इतर लाभार्थी त्या योजनेपासून वंचित राहतात. ही वस्तुस्थिती आहे. शासनाकडून या योजनेसाठी निधी मिळावयास पाहिजे होता. परंतु मुळात जिल्हा परिषदेने या योजनेसाठी मागणी केली होती काय ? ८,४५५ लाभार्थ्यांचे अर्ज होते. त्यापैकी केवळ २३०० लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळालेला आहे. जिल्हा परिषदेने याबाबत मागणी करावयास हवी होती. डीपीडीसीमध्ये (जिल्हा नियोजन समिती) आदिवासी भागासाठी मोठ्या प्रमाणात निधी वितरित केला जातो. त्याचप्रमाणे एससीपीमध्ये (विशेष घटक योजना) सामाजिक न्याय विभागाकडून देण्यात येणारा निधी देखील समर्पित केला जातो. या दोन्ही योजनेंतर्गत जर अशाप्रकारचा लाभ लाभार्थ्यांना द्यावयाचा असेल तर त्यासाठी निधीची कमतरता हे कारण जर विभागाकडून सांगण्यात येत असेल तर ते समितीला मान्य नाही. कारण आदिवासी विकास विभाग आणि सामाजिक न्याय कल्याण विभागामध्ये वर्षाच्या अखेरीस निधी खर्च होत नसल्यामुळे तो समर्पित करावा लागतो किंवा तो इतर खरेदीसाठी वापरला जातो. त्यामुळे समितीचे असे मत आहे की, या योजनेचे योग्य प्रकारे मूल्यमापन करण्यात आलेले नाही. दुसरे असे की, चंद्रपूर गडचिरोली आणि भंडारा हे आदिवासी जिल्हे आहेत. त्याचप्रमाणे गोंदिया जिल्ह्यातील चार ते पाच तालुके हे आदिवासीबहूल आहेत. त्या ठिकाणीदेखील टीएसपी, (आदिवासी क्षेत्र उपयोजना) ओटीएसपी (आदिवासी क्षेत्रा बाहेरील उपयोजना) अंतर्गत निधी मिळू शकतो. परंतु विभागाच्या अधिका-यांनी निधीची मागणी केलेली नाही, अशी पृच्छा समितीने केली असता, गोंदिया, नागपूर, भंडारा या भागामध्ये खासगी दूध संघाकडून दूध संकलन चांगल्याप्रकारे होते आहे. त्या ठिकाणी या योजनेची अंमलबजावणी

करण्यासाठी चांगल्या प्रकारे प्रतिसाद मिळत आहे. Because it is based on various kinds of incentives. त्याचप्रमाणे तेथे मिल्क रुट आहे. गडचिरोली जिल्हा हा दूध उद्योगापासून पूर्णपणे वंचित राहिलेला आहे. गडचिरोलीमधील सहा ते आठ आदिवासी तालुक्यांच्या पट्ट्यामध्ये दूध मिल्क ॲनिमल बद्दल आवड नाही. कारण त्यांच्या संस्कृतीमध्ये जनावरांचे दूध काढले जात नाही. केवळ उत्तर आणि पूर्व गडचिरोली जिल्ह्यामध्ये दुधाळ जनावरांचे आकर्षण आहे. समितीने म्हटल्याप्रमाणे विभागाकडून याबाबत ज्याप्रमाणे कार्यवाही व्हावयास पाहिजे होती तशी ती झालेली नाही, असे विभागीय सचिवांनी समितीला विदित केले.

जिल्हा अधिका-याच्या पूर्वी जिल्हा पशुसंवर्धन अधिका-यांनी मागणी केलेली आहे काय ? अशी समितीने विचारणा केली असता, डीपीसीमध्ये (जिल्हा नियोजन समिती) खर्चाचा आढावा घेतला जातो. या विभागाकडून मोठ्या प्रमाणात खर्च होत नाही, असा अनेकांचा पूर्वग्रह आहे. त्यामुळे पुर्नविलोकनामध्ये इतर विभागाला अधिक निधी दिला जातो, असे विभागीय सचिवांनी विदित केले.

खर्च होत नाही, हा मुद्दा नाही. मुळात विभागाकडून मागणी केली जात नाही, असे मत समितीने व्यक्त केले असता, मागणी नसण्याचे मुख्य कारण असे आहे की, लाभार्थ्यांचे अर्ज मागविल्यानंतर २५ टक्के रक्कम लाभार्थ्यांनी भरावयाची असते, असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

जे लोक अर्ज करतात त्यांना योजनेची व २५ टक्के रक्कम भरण्याची माहिती असते. परंतु ज्या लोकांना योजनेची माहिती नाही, असे लोक अर्ज कशा प्रकारे करू शकतील ? त्याचप्रमाणे पुढील परिच्छेदामध्ये असे नमूद करण्यात आलेले आहे की, एक जनावराची २५ टक्के रक्कम प्राप्त झाली. परंतु दुस-या जनावराची २५ टक्के रक्कम प्राप्त न झाल्यामुळे दुसरे जनावर देण्यासाठी विलंब झालेला आहे. त्यामुळे दोन्ही जनावरांसाठी पैसे पाहिजेच अशी अट नाही. त्यानंतरच लाभार्थी मंजूर होतील, अशाप्रकारची स्थिती नसते. प्रत्येक लाभार्थी २५ टक्के रक्कम भरण्यासाठी लेखी अर्ज देतो. त्यामुळे २५ टक्के रक्कम लाभार्थी भरू शकत नाहीत, ही वस्तुस्थिती नाही. विभागाकडे निधी नसल्यामुळे आणि मुळात विभागाने निधीची मागणी केली नसल्यामुळे अनेक लाभार्थ्यांना योजनेचा लाभ घेता आला नाही, हा मूळ मुद्दा आहे. प्राप्त झालेल्या निधीपैकी किती निधी व्यपगत झालेला आहे ? एकही रुपया व्यपगत झालेला नाही. याचाच अर्थ प्रत्येक रुपया खर्च करण्यात आलेला आहे. जोपर्यंत २५ टक्के रक्कम भरण्यात येत नाही तो पर्यंत अर्ज करण्यात येऊ नये, असे विभागाने सांगितले नव्हते, ही बाब समितीने निदर्शनास आणली असता, पंचायत समिती सदस्य, जिल्हा परिषद सदस्य लाभार्थ्यांचे अर्ज आणून देतात. जिल्हा परिषद व पंचायत समितीमध्ये हे अर्ज गोळा केले जातात. या योजनेचे उद्दिष्ट आणि योजनेचा संपूर्ण तपशील लाभार्थ्यांना दिलेला आहे किंवा नाही याची खात्री नाही. कारण यासाठी एक्स्टेंशन नाही, असे विभागीय सचिवांनी विदित केले.

विभागाने ८,४५५ अर्ज वैध केलेले आहेत. याचाच अर्थ सदरहू लाभार्थी २५ टक्के रक्कम भरण्यासाठी तयार आहेत. अन्यथा विभागाने ते अर्ज स्वीकारले नसते. समितीचा एक आक्षेप आहे. विभागाच्या सचिवांनी असे सांगितले की, डीपीसी वेळेवर कट लावत असते. ज्या योजना जिल्हा परिषद चालवते त्या योजनांना राज्य शासनाने कट लावला तरच त्या योजनेचा निधी कमी होतो. एससीपी (विशेष घटक योजना) आणि टीएसपी (आदिवासी क्षेत्र उपयोजना) यामध्ये कट लागत नाही. जनरलमध्ये मागील पाच वर्षांमध्ये कट लागल्याचे समितीच्या निदर्शनास आले नाही. तसेच हा निधी दोन वर्षापर्यंत खर्च करण्याचा अधिकार आहे. दिनांक २४ मे २०१९ पासून लोकसभेची आचारसंहिता समाप्त झालेली आहे. त्यानंतर लाभार्थ्यांचे अर्ज मागविण्याची प्रक्रिया जिल्हा परिषदेने सुरू केली आहे काय ? तसेच अर्जांच्या संख्येनुसार निधीची मागणी केलेली नाही. जर अर्ज मागविले असतील आणि निधी नसेल तर यासाठी जबाबदार कोण आहे ? डीपीसीचा (जिल्हा नियोजन समिती) निधी जिल्हा परिषदेच्या खात्यामध्ये जमा होत असतो. जिल्हा परिषदेच्या ३६ सदस्यांपैकी २१ सदस्य डी.पी.सी.मध्ये आहेत. जिल्हा परिषदेचा निधी डी.पी.सी. सदस्यांच्या मान्यतेशिवाय कमी होऊ शकत नाही, असे मत समितीने व्यक्त केले असता, पशुसंवर्धन विभागाचा काही भाग स्थानिक स्वराज्य संस्थांकडे देण्यात आला आहे आणि स्थानिक स्वराज्य संस्था ह्या ग्रामविकास विभागाच्या अंतर्गत येत असतात. त्याचप्रमाणे डीएचओ हे जिल्हा परिषदेचे अधिकारी आहेत. राज्य स्तरावर त्यांचा या विभागाकडून आढावा घेतला जात नाही. त्याचप्रमाणे आयुक्तांकडून देखील हवे त्याप्रमाणे पालन होत नाही. कारण यामध्ये विभागीय आयुक्त, विकास शाखा आणि ग्रामविकास विभाग ही वेगळी साखळी आहे. जिल्हा परिषदांना ज्या योजना वर्ग करण्यात आलेल्या आहेत त्यांच्या कार्यपद्धतीमध्ये जर काही अडचणी असतील तर त्या विभागाने दुरुस्त करावयास पाहिजेत. तसेच त्या योजनांच्या राज्य स्तरीय अंमलबजावणीमध्ये पशुसंवर्धन विभागाची भुमिका कमी प्रमाणात असते. तसेच पदे रिक्त राहता कामा नयेत, असे विभागीय सचिवांनी समितीस विदित केले.

यामध्ये रिक्त पदांचा विषय येत नाही, असे समितीने विभागीय सचिवांच्या निदर्शनास आणले. विभागाला मूळ विषयाची कल्पना आलेली नाही. या योजनेची सर्व प्रक्रिया विभागाने पार पाडलेली आहे. परंतु डीपीडीसीने निधी दिला नसल्यामुळे विभागाला योजनेची अंमलबजावणी करता आली नाही. त्याचप्रमाणे एचसीपीकडूनही निधी मिळालेला नाही. समितीचे असे मत आहे की, विभागाने निधीची मागणी केली होती

काय? जर मागणी केली असेल आणि निधी प्राप्त झाला नसेल तर यामध्ये विभाग दोषी राहणार नाही. सन २०११-१२ पासून सन २०१५-१६ पर्यंत सातत्याने निधी वाढवून प्राप्त झाला आहे. विभागाचे प्रधान सचिव यांनी सांगितले की, विभागाच्या निधीला कट लावण्यात येतो. उप सचिव सांगत आहेत की, विभागास प्रति वर्षी सातत्याने निधी वाढवून प्राप्त होत आहे. विभागाचे प्रधान सचिव व उप सचिव यांचे उत्तर परस्पर विरोधी आहे. गोंदिया जिल्हयामध्ये (आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना) २ हजार अर्ज योजनेच्या लाभासाठी प्राप्त झाली. त्यामध्ये टीएसपी (आदिवासी क्षेत्र उपयोजना) व ओटीएसपी अंतर्गत प्राप्त अर्जांची विभागणी करून निधीची मागणी करण्यात येते का, अथवा जेवढे अर्ज आले त्या लाभार्थींची निवड करण्यात येते का ? एका वर्षाची बाब असेल तर समिती समजू शकते. परंतु ज्या पात्र लाभार्थींना त्या वर्षामध्ये लाभ देण्यात आला नाही त्यांना पुढील वर्षामध्ये समाविष्ट केले पाहिजे. जिल्हा परिषदेला २ वर्षांच्या कालावधीमध्ये निधी खर्च करण्याची मुभा आहे. समितीचे म्हणणे आहे की, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी अर्ज मागविले त्यास वैधता मिळाल्यानंतर डीपीडीसीकडे निधीची मागणी केली नाही. त्यामुळे योजनेची व्याप्ती वाढली नाही. मागासलेल्या व मोठ्या प्रमाणात दुष्काळ असलेल्या क्षेत्रामधील गरीब लोकांना जोड धंदे मिळाले तर त्यांना आपली उपजीविका भागवता येईल. उक्त योजना या दृष्टीकोनातून शासनाने सुरू केली आहे. लाभार्थीला २५ टक्के रक्कम भरून ७५ टक्के अनुदान प्राप्त करून घेता येते व त्यामाध्यमातून योजनेचा लाभ घेऊन आपली उपजीविका भागविणे शक्य होते. हाच दृष्टीकोन ठेवून लाभार्थींना योजनेच्या उपलब्धतेनुसार फायदा देऊन वाटप करण्यात आले व हा विषय संपविण्याचा प्रयत्न केला गेला आहे. डीपीडीसीकडे टीएसपी (आदिवासी क्षेत्र उपयोजना) व (आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजना) ओटीएसपी अंतर्गत पात्र लाभार्थींना योजनेचा लाभ देण्यासाठी निधीची मागणी केली तर त्याचा नक्की विचार करता येणे शक्य आहे. परंतु निधीची मागणीच करण्यात येत नाही, असे मत समितीने व्यक्त केले असता, जिल्हा परिषदेच्या संरचनेमध्ये कृषी व पशुसंवर्धन या दोन्हींसाठी एकच समिती गठीत करण्यात आलेली असते. केंद्र शासनाने सद्यःस्थितीमध्ये पशुसंवर्धन, दुग्ध व मत्स्य व्यवसाय विकास विभागासाठी स्वतंत्र मंत्रालय केले आहे. विभागाचे मत आहे की, सदरहू विभागास कृषी विभागासोबत जोडण्यात आल्यामुळे अधिकाधिक लक्ष कृषि विभागाकडे केंद्रीत करण्यात येते, असे विभागीय सचिवांनी विदीत केले.

समितीला पशु वैद्यकीय दवाखान्याबद्दल खूप आस्था आहे. माणसांप्रमाणेच पशुसंवर्धन व त्यांचे आरोग्य व्यवस्थित राहिले पाहिजे. गोंदिया जिल्ह्यात पशुसंवर्धन विभागातील ९० टक्के पदे भरण्यात आलेली होती त्यामधील काही पदे बदलीने रिक्त आहेत. ज्याप्रमाणे माणसांच्या दवाखान्यांची काळजी घेण्यात येते त्याप्रमाणे जनावरांच्या दवाखान्याची काळजी घेतली जाते. गोंदिया जिल्ह्यातील एका तालुक्यामध्ये १८ पशु वैद्यकीय रुग्णालय असून तेथे वर्ग १ चे अधिकारी कार्यरत होते. पशु वैद्यकीय दवाखाने जोड धंद्यासाठी आवश्यक आहेत. सदरहू प्रकरणी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांचेकडून चूक झालेली आहे, त्यांनी निधीची मागणी केली नाही, ही बाब विभागास मान्य करावीच लागेल. सदरहू बाब शासनाच्या नजरेस आणून न दिल्यामुळे केवळ २,३०० लोकांना लाभ मिळू शकला म्हणजे केवळ २८ टक्के लोकांना योजनेचा लाभ मिळाला आहे. सदरहू अधिकारी पशुसंवर्धन विभागाच्या अखत्यारीत आहेत, हि बाब समितीने निदर्शनास आणली व सदरहू योजना कोणत्या विभागाची आहे ? अशी पृच्छा समितीने केली असता, स्थानिकस्तरावर जिल्हा परिषदेच्या माध्यमातून योजना राबविण्यात येते, असे विभागीय सचिवांनी विदीत केले.

परंतु सदरहू योजना पशुसंवर्धन विभागाची आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, उक्त योजना ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून राबविण्यात येणारी योजना आहे, असे विभागीय सचिवांनी विदीत केले.

जिल्हा परिषदेच्या माध्यमातून शिक्षणाची व्यवस्था राबविण्यात येते, उक्त कारण देऊन शिक्षण विभाग आपली जबाबदारी झटकू शकत नाही. त्याच प्रमाणे पशुसंवर्धन विभाग आपली जबाबदारी झटकू शकत नाही. सर्व पशुवैद्यकीय अधिकारी यांचेवर पशुसंवर्धन विभागाचे, संचालक, सहसंचालक यांचे नियंत्रण आहे. त्यांनी योजनेच्या संदर्भात निधीची मागणी केली पाहिजे, ही त्यांची जबाबदारी आहे. पशुसंवर्धनकरिता डीपीडीसीमध्ये तरतूद आहे. परंतु पशुसंवर्धन अधिकारी यांनी डीपीडीसीकडे निधीची मागणी केल्याची बाब समितीच्या नजरेस अद्यापपर्यंत आली नाही. त्यामुळे दरवर्षी १० टक्के निधी वाढवून मिळत आहे. परंतु विभागाने मागणी करणे आवश्यक आहे. सदरहू प्रकरणी दोषी अधिका-यांची चौकशी करण्याबाबत समितीने शिफारस करावी, तसेच लोकांच्या मागणीनुसार डीपीडीसीकडे निधी प्राप्त करून घेण्याकरिता प्रस्ताव सादर केला पाहिजे. जेणे करून अधिकाधिक लोकांना योजनेचा लाभ मिळू शकेल. सदरहू प्रकरणी ६,०८३ अर्जदारांना लाभ मिळू शकलेला नसल्याने संबंधित अधिकारी यांचेवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी. ज्या अधिका-यांनी अर्जदारांना लाभ मिळवून देण्यासाठी निधीची मागणी केली नाही, त्या जबाबदार अधिका-यांचा अहवाल समितीला एक महिन्याच्या आत सादर करण्यात यावा, अशी सूचना समितीने केली असता, जिल्हा परिषदेकडून एक महिन्याच्या आत वेळेवर अहवाल प्राप्त होण्याकरिता ग्रामविकास विभागासही सूचित करण्यात यावे, अशी विनंती विभागीय सचिवांनी केले.

जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी कृषि व पदुम (पशुसंवर्धन) विभागाच्या अंतर्गत येतात, हि बाब समितीने निदर्शनास आणली असता, I am establishment officer for him but he is functioning in Zilha Parishad, and therefore, the Chief Executive Officer is Controlling Officer for him. अनेक विभाग राज्यस्तरीय व जिल्हा परिषद स्तरीय आहेत. सदरहू योजना स्थानिक स्तरावर ७३ व्या घटना दुरुस्तीन्वये वर्ग करण्यात आली आहे. त्यामुळे त्यावर राज्यस्तरीय विभागाकडून संनियंत्रण होत नाही. I will write to Secretary, Rural Development Department. असे विभागीय सचिवांनी विदीत केले.

पशुसंवर्धन विभागाचे विभागीय सचिव जबाबदारी टाळण्याचा प्रयत्न करीत आहेत. समितीने ग्रामविकास विभागाच्या सचिव महोदयांना याप्रकरणी साक्षीसाठी बोलवावयास पाहिजे होते. हा विषय ग्राम विकास विभागाशी संबंधित नसल्याने महालेखाकार कार्यालयाने पशुसंवर्धन विभागावर लेखा आक्षेप काढला आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, अंमलबजावणीकरिता येणारी अडचण निदर्शनास आणून देत आहे, असे विभागीय सचिवांनी विदीत केले.

The fund is being distributed through your head. जिल्हा परिषद स्तरावर पशुसंवर्धन विभागाचे अधिकारी कार्यरत आहेत, त्यांच्याकडून राबविण्यात येणा-या योजनांवर पशुसंवर्धन विभागाचे नियंत्रण नाही, अशी सबब विभागाच्या सचिवांनी देऊ नये. सदरहू अधिकारी यांच्या बदलीची प्रकरणे पशुसंवर्धन विभागाच्या माध्यमातून हाताळण्यात येतात. सदरहू योजना पशुसंवर्धन विभागाच्या निधीतून राबविण्यात येते. त्यामुळे पशुसंवर्धन विभागाच्या सचिवांची साक्ष लावण्यात आली आहे. या विषयाचा संबंध इतर विभागाशी असता तर त्या संबंधित जिल्हा परिषदेतील अधिकारी किंवा विभागाच्या सचिवांना साक्षीसाठी बोलावण्यात आले असते. परंतु सदरहू आक्षेपाशी संबंधित योजना पशुसंवर्धन विभागाशी संबंधित आहे. ग्रामविकास विभागाकडून जिल्हा परिषदेच्या माध्यमातून योजनेची अंमलबजावणी करण्यात येते. परंतु सदरहू योजना पशुसंवर्धन विभागाची असून तेथे त्यांनीच अधिकारी नियुक्त केले आहेत. You should give directions to CEO. असे समितीने विभागीय सचिवांना निर्देश दिले, त्यास विभागीय सचिवांनी सहमती दर्शविली.

**परिच्छेद क्रमांक २.१.२.२ दुभत्या जनावरांचे विलंबाने वाटप :—**

सदरहू योजना राबविण्यासाठी निधीची मागणी केली नाही, त्यास जबाबदार कोण आहे ? सदरहू लेखा आक्षेप याअगोदरच्या लेखा आक्षेपाप्रमाणेच असल्याने त्या प्रकरणीच्या चौकशीमध्ये या लेखा आक्षेपातील मुद्याचा समावेश करण्यात यावा. याबाबतीत कोण जबाबदार आहे, त्या अहवालासह याप्रकरणीचा अहवाल सादर करण्यात यावा, असे समितीने सूचित केले असता विभागीय सचिवांनी ही बाब मान्य केली.

**परिच्छेद क्रमांक २.१.२.३ जास्त वयाच्या गाईंची खरेदी :——**

या परिच्छेदाबाबत माहिती देताना सदरहू प्रकरणीची बाब तांत्रिक आहे. ज्या गाईंची खरेदी करण्यात आली होती त्यांची दुग्ध उत्पादन क्षमता फार कमी झाली होती. क्षेत्रीय स्तरावर भौगोलिक स्तरानुसार गाई/म्हशी २४-३० महिन्यांमध्ये वयात वेतावर येतात. ३.५ वर्षात प्रथम वेत व त्यानंतर दीड ते दोन वर्षांनी दुसरे वेत म्हणजेच ५ वर्षांत दुसरे वेत मिळते. दुस-या अथवा तिस-या वेतानंतर पीक प्रॉडक्शनवर येतात, असे विभागीय प्रतिनिधीनी विदीत केले.

गाई/म्हशी खरेदीचे कार्य समितीच्या माध्यमातून होते. शासनाच्या गाईडलाईननुसार समिती कार्य करते, त्याचे पालन समितीने केले पाहिजे. महालेखाकार कार्यालयाने लेखा आक्षेपामध्ये नमूद केले आहे की, ३६४ गाईंची खरेदी करण्यात आली होती त्यापैकी १५८ गाई ५ ते ७ वर्षांच्या खरेदी केल्या होत्या. गाई खरेदी करताना त्यांचे वय ३ ते ३.५ वर्षांच्या आत असणे आवश्यक आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, विभागाने सदरहू प्रकरणी पूर्ण अभ्यास करून स्पष्टीकरण सादर केले आहे. गाईंचे वय ५ वर्षे असल्याने त्यांचे उत्पादन कमी झाले आहे, अशी बाब नाही. दुसरे वेत झाल्यानंतर ते पीक प्रॉडक्शन वर असतात, असे विभागीय सचिवांनी विदीत केले.

५ वर्षे पूर्ण झाल्यानंतर ती गाय तिस-या वेतावर येते का, असे असेल तर शासनाने मागदर्शक तत्व (गाईडलाईन) बदलाव्यात, असे समितीने सूचित केले असता, शास्त्रीयदृष्ट्या अडीचव्या वर्षी पहिली वेत दिली पाहिजे असे असले तरी वासराचे संगोपन तेवढ्या शास्त्रीयदृष्ट्या होत नाही. शास्त्र सांगते की, १५ महिन्यांच्या वासराचे वजन २०० किलो असावे व त्यावेळी ते गाभण राहिले पाहिजे त्यानंतर त्याची वेत ९ महिन्यांनी होईल. परंतु वासरांची शास्त्रीय पद्धतीने संगोपन होत नाही, त्यांची आबाळ होते. त्यांना गाई/म्हशीचे दूध पाजले जात नाही. त्यामुळे त्यांची वाढ ब-यापैकी खुंटलेली असते. ५ वर्षांच्या गाईचे वाटप केले असले तरी २ -या किंवा ३ -या वेताची दिलेली आहे. तिचे वय अधिक असले तरी तिच्यापासून अधिक वेत मिळू शकतात, असे विभागीय प्रतिनिधीनी विदीत केले.

गाईंचे वय पाहण्यात येत नाही. समजा; गोंदिया जिल्ह्यामध्ये गायींचे वाटप करावयाचे असेल तर दुस-या जिल्ह्यातील गायी विकत आणाव्यात, अशी खात्याची गाईडलाईन होती. जेणे करून त्या जिल्ह्यामध्ये दुधाचे उत्पादन वाढले पाहिजे. अमरावती जिल्ह्यात गाईंचे वाटप करावयाचे असेल तर इतर जिल्ह्यातून त्या खरेदी कराव्यात. कोणताही शेतकरी चांगल्या प्रमाणात दुध देणा-या गाई विकत नाही. कमी दूध देणा-या व

अधिक वय असणा-या गाई शेतकरी विकतात. त्यामुळे महालेखाकार यांचा मुद्दा एवढा संयुक्तिक नाही. बाजारात उपलब्ध असलेल्या गाईमधून विकत घेऊन त्या वाटप कराव्या लागतात, असे समितीने सूचित केले असता, शास्त्रोक्त पद्धतीने वासरांचे संगोपन केले तर अडीचव्या वर्षी पहिले वेत निश्चितपणे मिळेल. परंतु शास्त्रोक्त पद्धतीने संगोपन करणे शक्य होत नाही, असे विभागीय प्रतिनिधीनी विदीत केले.

मागदर्शक तत्वाचे पालन करण्यात प्रत्यक्षात अडचण होत असेल तर त्यामध्ये बदल करण्यात यावा, अशी सूचना समितीने केली असता, स्थानिक परिस्थितीनुसार बदल करण्यास स्थानिक समितीला मुभा दिली पाहिजे, असे विभागीय सचिवांनी विदीत केले.

गाईंची विक्री त्या अधिक दूध देत असतील तर करण्यात येत नाही. ज्या गाई अधिक दूध देत नाहीत त्यांची विक्री करण्यात येते. त्याच गाई शेतक-यांना वाटप करण्यासाठी खरेदी कराव्या लागतात, असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले.

**परिच्छेद क्रमांक २.१.२.४ विनिर्दिष्ट अंतर न राखता जनावरांचे वाटप :—**

एक ऐवजी दोन गाई वाटप केल्या तर काही हरकत नाही. दुसरी गाय विलंबाने वाटप करण्यात आली. दोन्हीही जनावरे एकाच वेळी वाटप करावयास पाहिजे होते. याप्रकरणी काही लोकांना एकाच वेळी व काहींना विलंबाने गाईंचे वाटप करण्यात आले आहे. ६ महिने किंवा पहिली गाय दूध देणे बंद करेल त्यावेळी वाटप केले पाहिजे, अशी तरतूद नियमात आहे. पहिले जनावर वाटप केल्यानंतर दुसरे जनावर वाटप करण्यास खूप मोठा विलंब झाला आहे. ही बाब चुकीची आहे, अशी मत समितीने व्यक्त असता, काही प्रकरणी लाभार्थी दुस-या जनावराच्या वाहतुकीसाठी पैसे देण्यात तयार नव्हते. दुस-या जनावरासाठी २५ टक्के प्रकरणातील लाभार्थींनी रक्कम भरणा केली नाही. त्यांनी रक्कम भरणा केल्यानंतर त्यांना जनावराचा पुरवठा करण्यात आला आहे विभागामध्ये अनेक पदे रिक्त आहेत. याप्रकरणी लाभार्थींचा खूप पाठपुरावा करावा लागतो, त्यासाठी रिक्त पदांमुळे यंत्रणा कमी पडते यात काही शंका नाही, असे विभागीय सचिवांनी विदीत केले.

**परिच्छेद क्रमांक २.१.२.५ लाभार्थ्यांद्वारे जनावरांची विक्री :—**

लाभार्थी यांनी जनावरांची विक्री केल्यासंदर्भातील हा लेखा आक्षेप आहे. सदरहू बाब निदर्शनास आल्यानंतरही कारवाई करण्यात आली नाही, ही बाब गंभीर आहे. उक्त बाब निदर्शनास आल्यानंतर संबंधितांविरुद्ध एफआयआर दाखल करण्यात आले का ? नसेल तर का नाही ? असे मत समितीने व्यक्त केले असता, सदरहू लाभार्थ्यांपैकी बहुतांश लाभार्थी दारिद्र्य रेषेखालील व मागासवर्गीय होते. त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्याची मानसिकता जिल्हा परिषद यंत्रणांची नव्हती, असे विभागीय सचिवांनी विदीत केले.

उक्त प्रकरणी कारवाई करावयाची नसेल तर लाभार्थींना जनावरे विक्री करता यावी याकरिता शासन निर्णयामध्ये सुधारणा करण्यात यावी. विभागाने दिलेले उत्तर समर्पक नाही. लाभार्थींना जनावरे विक्री करता येऊ नये यासाठी त्यांच्यावर दबाव निर्माण करणे गरजेचे आहे. पंचायत समिती किंवा जिल्हा परिषद स्तरावरुन दुधाळ जनावरे, बक-या किंवा कोंबडी वाटप प्रकरणीचे लाभ मिळविण्याकरिता लाभार्थ्यांची एक विशिष्ट जमात तयार झालेली आहे त्यांनाच योजनेचा लाभ होतो व ख-या लाभार्थीला लाभ मिळत नाही. पंचायत समितीच्या अधिका-यांपासून ते पदाधिका-यांपर्यंत त्यांची साखळी तयार होते. अमरावती जिल्ह्याच्या डीपीडीसी बैठकीमध्ये मागील महिन्याच्या दिनांक ३१ रोजी ठराव घेतला आहे की, ज्या लाभार्थींना जनावरे वाटप केली आहेत त्यांच्याकडे ती आढळली नाही तर त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात यावेत. एकच लाभार्थी जनावरे विक्री करून योजनेचा दुबार लाभ घेत राहतो. त्यामुळे इतर पात्र लाभार्थींना योजनेचा लाभ मिळत नाही, त्यांच्यावर अन्याय होतो, असे मत समितीने व्यक्त केले असता, आयआरडीपी (Integrated Rural Development Programme) योजनेंतर्गत अशी प्रकरणे पूर्वी खूप घडत होती, असे विभागीय सचिवांनी विदीत केले.

स्थानिक पातळीवरील सत्य समितीला माहिती आहे असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणून दिले. एका व्यक्तीला योजनेचा दुबार लाभ देता येत नाही, सदरहू लाभार्थी त्याची पत्नी किंवा मुलाच्या नावाने योजनेचा लाभ घेतात, असे मत समितीने व्यक्त केले असता, सदरहू बाब जिल्हा परिषदेच्या कार्यावर अवलंबून आहे, असे विभागीय सचिवांनी विदीत केले.

अमरावती जिल्ह्यातील डीपीडीसीने लाभार्थीकडे जनावरे आढळून न आल्यास त्याच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करण्याचा प्रस्ताव पारित केला आहे. एका बाजूला विभागाच्या सचिवांनी सांगितले की, उक्त प्रकरणी कारवाई करणे योग्य नाही. स्पष्टीकरणामध्ये नमूद करण्यात आले आहे की, वसूली करण्यात येते व ५-६ जिल्ह्यांची नावे नमूद केली आहेत. सदरहू जिल्ह्यांमध्ये सन २०१६ मध्ये वसुलीचे आदेश देण्यात आले असून आतापर्यंत किती वसुली झाली आहे ? अशी पृच्छा समितीने केली असता, सदरहू प्रकरणी वसुली झाली नाही कारण ते आरआरसीमध्ये जातात. तहसीलदार यांचेमार्फत आरआरसी अंमल करण्यात येतो असे विभागीय सचिवांनी विदीत केले.

समितीचे मत एवढेच आहे की, लाभार्थींवर काही तरी दबाव असला पाहिजे की जनावरे विक्री केल्यास त्यांच्यावर काही तरी कारवाई होऊ शकते. त्यादृष्टीकोनातून नोटिशीच्या माध्यमातून किंवा इतर माध्यमातून काही तरी कारवाई करणे आवश्यक आहे. आदिवासी व अनुसूचित

जाती संवर्गासाठीच्या योजना दलालांमुळे त्यांच्यापर्यंत पोहोचतच नाहीत. सदरहू योजनेचा लाभ मिळवून देण्यासाठी दलाल पात्र लाभार्थीस थोडी फार रक्कम देऊन योजनेचा लाभ मंजूर करून घेतात. त्यानंतर तो दलाल गाई/म्हशी विक्री करून मोकळे होतात. ज्याच्या नावाने योजनेचा लाभ घेतला आहे तो मूळ लाभार्थी १०-२० हजार रुपयांमध्ये समाधानी होतो. ब-याच वेळा दलाल पात्र लाभार्थीच्या परिस्थितीचा फायदा घेतात. अशा पद्धतीने महात्मा फुले विकास महामंडळाच्या अनेक योजनांचा लाभ दलाल घेतात. ज्याच्या नावाने योजनेचा लाभ घेतला आहे त्या लाभार्थीला त्याबाबत काही माहिती नसते. सदरहू योजनेच्या जनावरांची तपासणी दरवर्षी करण्यात यावी. पहिल्या वर्षी लाभार्थीकडे जनावर आढळून आले नाही तर त्याने ते खरेदी केले नाही असा निष्कर्ष निघेल. दुस-या वर्षी आढळून आले नाही तर त्याने पाणी किंवा चारा किंवा इतर अडचणीमुळे जनावर विक्री केले. अशी समितीने शिफारस केली असता, केंद्र शासनाने इन्फोर्स केलेले आहे. याबाबत राज्यात अंमलबजावणी सुरू आहे. It is called INAPH. INAPH means tagging. या योजनेअंतर्गत सर्व जनावरांना टॅगींग बंधनकारक झालेली आहे. इनाफ टॅगींग प्रत्येक जनावराला बंधनकारक करण्यात आलेले आहे. त्यामध्ये युनीक कोड असतो. त्यामुळे त्या कोडला बदलणे कठीण आहे, असे विभागीय सचिवांनी विदीत केले जनावरांचे कान कापून टाकतात. याबाबत विभागाची भिती निर्माण झाली पाहिजे, भिती निर्माण झाली तर अपहार कमी होतील आणि योग्य लाभार्थ्यांकडे यामुळे लाभ पोहोचेल, असे समितीने विभागास सूचित केले.

**परिच्छेद क्रमांक २.१.२.६ दुभत्या जनावरांची नियम बाहय खरेदी -**

गडचिरोली हा दुर्गम नक्षलग्रस्त आदिवासी जिल्हा असल्यामुळे खरेदीबाबतची कार्यवाही विशेष बाब म्हणून क्षमापित करण्यात यावी असे विभागाने स्पष्टीकरणात म्हटले आहे, खरेदी समितीशिवाय ही खरेदी करण्यात आलेली आहे याबाबत काही कार्यवाही केली आहे काय ? अशी पृच्छा समितीने केली असता, आर.जे.सी. नागपूर यांनी त्याबाबत चौकशी केली आहे. संबंधित जिल्हा पशुसंवर्धन अधिका-यावर कारवाई करण्याचे निर्देशही देण्यात आलेले आहेत. एक अडचण आहे की, विमा उतरविण्याकरीता गडचिरोली जिल्ह्यात एकही विमा कंपनीचे कार्यालय नाही. ही प्रक्रिया लगतच्या चंद्रपूर जिल्ह्यात जाऊन पूर्ण करावी लागते. जनावरांची खरेदी करतेवेळी समितीला विमा प्रतिनिधी न मिळाल्यामुळे समितीला जिल्ह्याबाहेर जाऊन खरेदी करावी लागली असा नियमभंग झालेला आहे. गडचिरोली जिल्ह्यातील मागास परिस्थिती आहे, असे विभागीय सचिवांनी विदीत केले.

जिल्ह्याबाहेर खरेदी केल्याचा मुद्दा नाही. समितीने खरेदी केली नाही असा मुद्दा आहे, अशी पृच्छा समितीने केली असता, समितीच्या सर्व सदस्यांना घेऊन जाऊन खरेदी करायला पाहिजे होती, असे विभागीय सचिवांनी विदीत केले.

विभागाने जो विमा कंपनीचा विषय सांगितला आहे त्याला वगळावे. पण समिती सदस्यांना विश्वासात न घेता परस्पर खरेदी करून घेतली, ती नियमबाहय खरेदी आहे, असे मत समितीने व्यक्त केले असता, याबाबत संबंधित जिल्हा पशुसंवर्धन अधिका-यावर कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, असे विभागीय सचिवांनी विदीत केले.

यास तीन वर्षे झाली आहेत, यानंतर कोणी विचारणारही नाही. संबंधितांवर कारवाई करून यायला पाहिजे होते. ज्या लोकांनी नियमबाह्य खरेदी केली त्यांच्यावर शासनाकडून कडक कारवाई झालीच पाहिजे, असे समितीने सूचित केले.

**परिच्छेद क्रमांक २.१.२.७ जनावरांची महाराष्ट्र एनिमल आयडेंटिफिकेशन अँड रेकॉर्डींग ॲथॉरीटी यांचेकडे नोंदणी न करणे :—**

विभागाच्या रेकॉर्डप्रमाणे व इनाफच्या रेकॉर्डप्रमाणे एकूण किती जनावरे आहेत ? अशी पृच्छा समितीने केली असता, लाईवस्टॉक सेन्सस आता संपन्न झाली आहे. काही दिवसांनी त्याचे आकडे प्रसिद्ध होतील. तेव्हा सन २०१८-२०१९ ची अद्ययावत परिस्थिती समोर येईल. विभागाने २२ लाख टॅग इश्यु केले होते. १४ लाखाची टॅगिंग यापूर्वी झालेली आहे. चारा छावण्यामध्ये असलेल्या जनावरांची १०० टक्के टॅगिंग झालेली आहे. ४६.०८ टक्के सध्या अंमलबजावणी झालेली आहे. याबाबत सातत्याने पशुसंवर्धन आयुक्त पाठपुरावा करीत आहेत. ही प्रक्रिया ३-४ महिन्यात पूर्ण होईल. पशुवैद्यकीय अधिकारी ही प्रक्रिया स्वतः करीत आहेत. हे काम एजन्सीला दिलेले नाही, असे विभागीय सचिवांनी विदीत केले.

जनावरांच्या लसीची खरेदी फेब्रुवारीपर्यंत झालेली नव्हती. ग्रामीण भागात लसीचा मोठया प्रमाणावर तुटवडा होता. विदर्भात व विशेषतः अमरावती विभागात मोठया प्रमाणावर तुटवडा होता. या वर्षी स्ट्रीमलाईन करावे. जनावराच्या लसीकरणासाठी डीपीसीमार्फत निधी दिला जातो. ही खरेदी विभाग केंद्रीय पद्धतीने का करण्यात येते ? डीपीसीचा अधिकार आहे तेथल्या तेथे खरेदी करण्याचा. तसेच तो जिल्हा परिषदेचा अधिकार आहे. पण ही सर्व खरेदी विभाग राज्यस्तरावरुन करण्यात येते, त्यामुळे जिल्हा परिषद स्तरावर लसीचा तुटवडा झाल्यास ओरड होते, हि बाब समितीने निदर्शनास आणली असता, स्थानिक स्तरावर प्रोक्युअरमेंट ब-याच कारणामुळे शक्य होत नाही. राष्ट्रीय स्तरावरुन टेंडर काढले जाणे आवश्यक असते. आता राष्ट्रीय स्तरावर याकरीता यंत्रणा उभी राहिली आहे, ती यंत्रणा लस निर्माण करीत आहे. तुलनात्मक

टेंडर असल्यामुळे राष्ट्रीय स्तरावरील संस्था हे सर्व करतात. त्यामुळे केंद्रीकरण केल्याशिवाय उपाय नाही. त्याचे आर.सी. केले जाते. यानंतर स्थानिक संस्था त्याच्या ऑर्डर देतात व पुरवठा करतात, असे विभागीय सचिवांनी विदीत केले.

तो घटनात्मक मुद्दा आहे, तो डीपीसीमध्ये चॅलेंजही होईल. मुक्या जनावरांच्या लसीकरणामध्ये सुद्धा विलंब होत असेल, वर्षानुवर्षे लस उपलब्ध होत नसेल, औषधे उपलब्ध होत नसतील तर तेथील पशुधन पर्यवेक्षकावर जनतेचे किती प्रेशर असेल, त्यांना किती त्रास होत असेल ? अशी समितीने विचारणा केली असता, हा मागील वर्षीचा प्रश्न होता. या वर्षी अशी कोणतीही अडचण नाही. आचारसंहितेपूर्वी लस खरेदीची प्रक्रिया पूर्ण झालेली आहे, जनावरांची लस आणि औषध पुरवठा नियमित करण्यात येईल, असे विभागीय सचिवांनी विदीत केले.

**परिच्छेद क्रमांक २.१.२.८ दुभत्या जनावरांचा विमा उतरविण्यातील विलंब :—**

**सदर परिच्छेदावर चर्चा झाली नाही.**

**परिच्छेद क्रमांक २.१.२.९ - लाभार्थ्याचे प्रशिक्षण :—**

पाच जिल्ह्यामध्ये १८ टक्के प्रशिक्षण झालेले आहे, पशुपालकांचे प्रशिक्षण झालेच पाहिजे. विभागाकडे याचे नियोजन असले पाहिजे. विभागाच्या भविष्यकालीन योजना काय आहेत ? अशी विचारणा समितीने केली असता, जे जिल्हे व्हीएमडीडीपी प्रोजेक्टमध्ये आलेले आहेत तेथे प्रशिक्षणाबाबत मोठ्या प्रमाणावर कार्यवाही सुरू आहे. मात्र गोंदीया व भंडारा येथे आग्रह असूनसुद्धा तेथे खाजगी मील जास्त असल्यामुळे एनडीडीबीने नकार दिला आहे. विदर्भ मराठवाडा दुग्धविकास प्रकल्पासारखा एनडीडीबी संचलित प्रशिक्षण कार्यक्रम राबविला जात नाही. समितीच्या सुचनेप्रमाणे जास्तीत जास्त पदे भरण्याचा विभाग प्रयत्न करण्यात येत आहे. काही नवीन क्वॉलिफाईड पशुवैद्यकीय अधिकारी येत आहेत. प्रत्येक तालुका स्तरावर प्रशिक्षण राबवून प्रशिक्षणाशिवाय कोणतेही अधिकारी शिल्लक राहणार नाहीत हे सुनिश्चित करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी विदीत केले.

विभाग जे काही सांगत आहे ते सर्व भविष्यकालीन योजनेबाबत सांगत आहे. कार्यवाही करण्याकरीता सर्व नियम व कायदे अस्तित्वात आहेत, त्यांच्यावर कोठेतरी जबाबदारी निश्चित केली पाहिजे. महालेखाकारांचे परिच्छेद पुढील वर्षाचे नाहीत, मागे जे काही चुकीचे घडले आहेत त्यासाठी हे आक्षेप आलेले आहेत. या सर्व विषयावर कोठेतरी विभागाकडून डायरेक्टीव्ह इश्यु झाले पाहिजेत. नेहमी डिफॉल्टर असणा-यावर विभागाने कारवाई केली पाहिजे. भविष्यात कार्यपद्धती बदलणार असे सांगून समाधान होणार नाही, असे मत समितीने व्यक्त केले असता, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद यांना डायरेक्ट अर्धशासकीय पत्र देऊन त्यांचा अहवाल घेण्यात येईल. विविध व्हायटल योजना तसेच पोल्ट्रीसारखी स्वयं योजना असेल, असा यामध्ये त्यांचा मोठा वाटा आहे. त्यांचेशी सरळ पत्रव्यवहार करण्यास विभागाने सुरुवात केली आहे, असे विभागीय सचिवांनी विदीत केले.

What about past faults? जी अनियमितता झाली आहे, त्या अधिका-यांवर जुन्या नियमाखाली कारवाई होते. ज्यामध्ये समितीचे समाधान होत नाही, त्या विषयावर विभागाने दोषींवर कारवाईकरीता शेरा मारला पाहिजे. You should issue directions to Zilha Parishads according to the suggestions of the Public Account Committee. असे निदेश समितीने दिले.

**परिच्छेद क्रमांक २.१.२.१० - योजनेबद्दल जनजागृती करण्याचा अभाव :—**

**सदर परिच्छेदावर चर्चा झाली नाही.**

**परिच्छेद क्रमांक २.१.३.१ - अपर्याप्त संनियंत्रण :—**

**सदर परिच्छेदावर चर्चा झाली नाही.**

**परिच्छेद क्रमांक २.१.३.२ योजनेचे मुल्यांकन न करणे :—**

महालेखाकारांचे मत आहे की, सहआयुक्त, पशुसंवर्धन, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली मूल्यमापन समिती नियुक्त केल्याबाबत आयुक्त पशुसंवर्धन कार्यालयाने मार्गदर्शक सुचनांमध्ये स्पष्ट निर्देश दिलेले आहेत. पण त्यांनी तसे केलेले नाही, अशी याबाबत समितीने पृच्छा केली असता, विभागाने त्याबाबत तपास केला आहे, डॉ.सावकारे म्हणून नागपूर येथील सहआयुक्त होते, ते यास जबाबदार आहेत. त्यांचा खुलासासुद्धा समाधानकारक नाही. ते २०१७ मध्ये सेवानिवृत्त झालेले आहेत. त्यांच्यावर चार वर्षाच्या आत कारवाई करता येते. समितीच्या निर्देशानुसार त्यांच्यावर एक महिन्यात कारवाई करण्यात येईल, असे विभागीय सचिवांनी विदीत केले.

लाभार्थ्यांच्या हिश्श्याबद्दल २५ टक्केची अट आहे. बीपीएल खाली अनुसूचित जाती व जमातीकरीता ही मूळ योजना आहे. शासन अनेक योजना राबविताना या जाती जमातीकडून २५ टक्के रक्कम घेत नाही. खुल्या संवर्गातील लोकांकडून २५ टक्के रक्कम घेतली जाते. अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीकरीता १० टक्के रक्कम घेण्याबाबत समिती शिफारस करणार आहे. कारण शासन अनेक योजनेमध्ये त्यांच्याकडून

५ टक्के रक्कम घेते. २५ टक्के रक्कम खूप जास्त होते. कारण ते भूमिहीन आहेत, तसेच बीपीएलमध्येही आहे. अनुसूचित जाती व जमातीकरीता विभाग अनेक कल्याणकारी योजना राबवितो, बाकीचे सर्व नियम व कायदे कडक करावेत. जनावरांचे व्हेरीफिकेशन केवळ तीन वर्षांनंतर नको तर दरवर्षी करण्यात यावे. एक वर्षात जनावर विकले असेल तर ताबडतोब एफआयआर करण्यात यावा. २ किंवा ३ वर्षांचा कालखंड समिती समजू शकते. जनावर एका वर्षाच्या आत विकून टाकले असेल तर लाभार्थ्याकडे जनावर गेले नाही. हे विषय गांभीर्याने घ्यावेत. एखाद्या लाभार्थ्याने लाभ घेण्याऐवजी जनावर विकले असेल तर त्याला पुढील पाच वर्ष काही लाभ देण्यात येऊ नयेत, असे निर्देश समितीने दिले असता, योजनेच्या मार्गदर्शक तत्वांमध्ये सुधारण्याची कार्यवाही विभाग करेल असे विभागीय सचिवांनी विदीत केले.

समितीने दिलेल्या सूचनांचे विभागाने पालन करावे, अधिका-यावर कारवाई करावी. समितीची अपेक्षा आहे की, सुधारणा झाल्या पाहिजेत. You cannot run away from the responsibility of your department by pointing towards Zilla Parishad. The scheme is belongs to your department only. रिडेव्हलपमेंट सेंटर जाहिर केलेले आहेत ते काम पूर्ण करण्यात यावे. कारण तो फार महत्वाचा विषय आहे. ही योजना राबविली गेली पाहिजे असे मत समितीने मांडले असता, सदर काम. एनजीओ करणार आहे, एक महिन्यात अंमलबजावणी होईल असे विभागीय सचिवांनी विदीत केले.

**परिच्छेद क्रमांक २.१.४ - निष्कर्ष :—**

**सदर परिच्छेदावर चर्चा झाली नाही.**

**अभिप्राय व शिफारशी :—**

**परिच्छेद क्रमांक २.१ “ अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना दुभत्या जनावरांचे गट वाटप करणे या योजनेची अंमलबजावणी ”**

**परिच्छेद क्रमांक २.१.२ “ लेखापरीक्षा निष्पत्ती ”**

**परिच्छेद क्रमांक२.१.२.१ “ निश्चित केलेल्या लोकांपर्यन्त लाभ पोहोचविण्याचे अपर्याप्त परिमाण ”**

**अभिप्राय :—**

**३.१** जिल्हा पशुसंवर्धन अधिका-यांनी मागील वर्षात प्राप्त झालेल्या निधीनुसार निधीची मागणी केली. तदनुसार आदिवासी विकास विभाग आणि समाज कल्याण विभाग यांनी चालू वर्षासाठी अर्थसंकल्पीय तरतूद केली. प्राप्त झालेले अर्ज, मागणी केलेला/मिळालेला निधी, देण्यात आलेले लाभ याचा तपशील पाहता सन २०११-१६ दरम्यान जरी ८४५५ वैध अर्ज प्राप्त झाले असले तरी योजनेचा लाभ उपलब्ध निधीच्या अनुषंगाने केवळ २३७२ अर्जदारांना (२८ टक्के) देण्यात आले. मागील वर्षात प्राप्त झालेल्या वैध अर्जांच्या संख्येचा विचार न करता निधीची मागणी गतवर्षाच्या निधीप्राप्तीनुसार करण्यात आल्यामुळे ६०८३ अर्जदारांना (म्हणजेच ७२ टक्के) योजनेचा लाभ देता येऊ शकत नाही.

पात्र लाभार्थ्यांची संख्या (वैध अर्ज) आणि वर्षभरात प्रत्यक्ष देण्यात आलेले लाभ यात मोठी तफावत असल्यामुळे पुढील वर्षी निधीची मागणी वैध अर्जांच्या संख्येवर आधारित असावयास पाहीजे होती. जेणेकरून पर्याप्त लाभ पुरविता आला असता. वर्ष २०११-१६ दरम्यान मागणी केलेल्या रु.१२.३७ कोटी निधीच्या ऐवजी रु.११.६९ कोटी निधी प्राप्त झाला व या निधिचा वापर करण्यात आला. परंतु जिल्हा पशुसंवर्धन अधिका-यांनी २०११-१६ दरम्यान या ७२ टक्के अर्जदारांना लाभ पुरविण्यासाठी कोणत्याही प्रकारची पुरक मागणी केली नव्हती.

तसेच चंद्रपूर आणि गडचिरोली दोन्ही आदिवासी बहुल जिल्ह्यात TSP आणि OTSP अंतर्गत २०११-१६ दरम्यान जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी निधीची मागणी करण्यात आणि अर्ज मागविण्यात अयशस्वी ठरले. परिणामी या दोन जिल्ह्यातील आदिवासी लोक या योजनेच्या विस्तारापासून वंचित राहीले. वर्ष २०११-१३ आणि २०१४-१६ मध्ये भंडारा जिल्ह्यात आणि वर्ष २०११-१४ मध्ये नागपूर जिल्ह्यात आदिवासी लोकांना योजनेचा लाभ मिळाला नाही कारण संबंधित जिल्हा पशुसंवर्धन अधिका-याने निधीची मागणी केली नव्हती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

यासंदर्भात विभागाने नमूद केले की, निधीच्या उपलब्धतेनुसार लाभार्थ्यांची निवड करण्यात आली. आदिवासी लोकांना लाभ पुरविण्यासंबंधी जिल्हा पशुसंवर्धन अधिका-यांनी TSP आणि OTSP अंतर्गत अनुदान प्राप्त न झाल्याचे नमूद केले. मात्र याचेशी महालेखाकारांनी असहमती दर्शविली. कारण निधीची मागणी प्राप्त झालेल्या वैध अर्जांची प्रत्यक्ष संख्या विचारात न घेता करण्यात आली होती. याशिवाय, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली आणि नागपूर या जिल्ह्यांच्या जिल्हा पशुसंवर्धन अधिका-यांनी TSP आणि OTSP अंतर्गत निधीची मागणी केली नव्हती, ज्यामुळे आदिवासी जनता योजनेच्या लाभांपासून वंचित राहिली.

वास्तविक संबंधित जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी निधीची मागणी करताना योजनेखाली या पूर्वीच्या वर्षात प्राप्त झालेल्या वैध अर्जांची संख्या विचारात घेऊन त्यानुसार निधीची मागणी करणे हे निश्चितच तर्कसंगत होते. अनुसूचित जातीच्या आणि जमातींच्या लाभार्थींना लाभ देण्यासाठी “ दुधाळ जनावरांचे गट वाटप ” या जिल्हास्तरीय योजनेमध्ये अनुक्रमे सामाजिक न्याय विभाग आणि आदिवासी विकास विभाग यांचेकडून निधी उपलब्ध करून देण्यात येतो. या विभागांकडून त्यांनी निश्चित केलेल्या प्राधान्यक्रमानुसार तसेच जिल्ह्याकरिता सर्व विभागांच्या योजनांतील अनुसुचित जाती व जमातींच्या लाभार्थ्यांना लाभ देणेकरिता मंजूर होणा-या निधींची अधिकची मर्यादा (सिलींग लिमिट) विचारात घेऊन निधीची मागणी करणा-या सर्व विभागांना त्याप्रमाणात प्रत्यक्षात निधी मंजूर करण्यात येतो. त्याचप्रमाणे वैध अर्ज असलेल्या अनुसूचित जाती व जमातीच्या सर्वच लाभार्थ्यांकडून त्यांच्या हिश्याची रक्कम निश्चितपणे उभारली जाईल याची खात्री देता येत नाही त्यामुळे वैध अर्ज असलेल्या लाभार्थ्यांच्या संख्येनुसार निधीची मागणी करणे प्रसंगी असंयुक्तिक ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच या योजनेंतर्गत नागपूर विभागातील जिल्हानिहाय मंजूर तरतूदी आणि लाभ देण्यात आलेल्या लाभार्थ्यांची संख्या याचा तपशील पाहता वर्ष सन २०११ ते २०१६ या कालावधीत वर्ष निहाय उपलब्ध झालेल्या निधीपैकी सन २०१५-१६ मध्ये प्राप्त झालेल्या रु.४.०९ कोटी एवढा निधी पुढील वर्षात म्हणजेच सन २०१६-१७ मध्ये देखील प्राप्त झालेला असुन सन २०१७-१८ मध्ये त्यात वाढ होऊन रु.५.२५ कोटी इतका निधी प्राप्त झाला. लाभ दिलेल्या लाभार्थ्यांची संख्या देखील सन २०११ ते २०१६ या कालावधीच्या तुलनेत सन २०१६-१७ आणि सन २०१७-१८ मध्ये वाढलेली आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

शिफारस :—

३.२ सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीच्या लाभार्थ्यांना दुभत्या जनावरांचे गट वाटप करणे या योजनेच्या अंमलबजावणीअंतर्गत निश्चित केलेल्या लोकांपर्यंत लाभ पोहोचविण्याचे अपर्याप्त परिमाण यासंदर्भात आक्षेप नोंदविलेले आहेत. महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागाने विशेष घटक योजना (Special Component Plan-SCP) अंतर्गत अनुसूचित जाती त्याचप्रमाणे आदिवासी क्षेत्र उपयोजना (Tribal Sub Plan-TSP) व आदिवासी क्षेत्राबाहेरील (OTSP) उपयोजनेअंतर्गत अनुसूचित जमातींच्या लाभार्थ्यांना स्वयंरोजगाराव्दारे उत्पन्नाचे साधन उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने दोन दुभत्या जनावरांचे गट (गाई/म्हशी) वाटप करणे या योजनेची सुरुवात केली (नोव्हेंबर २०११). योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, दोन दुभत्या गुरांची किंमत रु. ८०,००० आणि तीन वर्षांची विमा रक्कम रु. ५,०६१ (एकूण रु. ८५,०६१) ठरविण्यात आली. शासन ७५ टक्के (रु. ६३,७९६) आर्थिक सहाय्य पुरविणार होते आणि उर्वरित २५ टक्के (रु. २१,२६५) लाभार्थ्यांनी दयावयाचे होते. या योजनेची मोठया प्रमाणात प्रसिद्धी करावयाची होती, जेणेकरून निश्चित केलेल्या लाभार्थ्यांची योजनेत योग्य व्याप्ती होऊ शकेल. ही योजना जिल्हास्तरावर जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद आणि गटस्तरावर पशुधन विकास अधिकारी यांनी राबविली होती.

सदरहू योजनेंतर्गत लाभार्थी निवडीची प्रक्रिया स्थानिक स्वराज्य संस्थांकडून करण्यात येत होती. मात्र निश्चित केलेल्या लोकांपर्यंत योजनेचे लाभ पोहोचू शकले नाहीत. यामागील कारणमिमांसा समितीने तपासली असता या योजनेंतर्गत २५ टक्के हिश्श्याची रक्कम लाभार्थ्यांनी भरणे आवश्यक असताना ती न भरल्यामुळे निश्चित केलेल्या लोकांपर्यंत लाभ पोहोचण्यास विलंब झाला. त्यातही गडचिरोली, गोंदिया, चंद्रपूर या जिल्ह्यांमध्ये रिक्त पदांची संख्या मोठ्या प्रमाणावर असल्यामुळे योजनेच्या अंमलबजावणीत अडथळा निर्माण झाला असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले. या योजनेसाठी प्राप्त झालेल्या वैध अर्जांची संख्या ही ८४५५ इतकी असून त्यापैकी केवळ २३७२ लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देण्यात आला. ६०८३ लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ न देणे मागील कारणमिमांसा समितीने विचारली असता विभागाकडे आवश्यक तो निधी उपलब्ध नसल्यामुळे उर्वरित लाभार्थ्यांना पैसे देता आले नाहीत असे समितीस सांगण्यात आले. या प्रकरणी समितीने अधिक सखोलरित्या चौकशी केली असता असे निदर्शनास आले की, विभागाने लागणा-या अतिरिक्त निधीची मागणी देखील शासनाकडे केली नव्हती. वैध लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देणेसाठी आवश्यक अतिरिक्त निधीची जर मागणीच शासनाकडे करण्यात आली नाही तर यासंदर्भात अन्य कोणतीही कारणे वा स्पष्टीकरण विभागाने देणे योग्य नाही. जर पशुसंवर्धन अधिका-यांनी पर्याप्त निधीची मागणी केली असती व ती प्राप्त न झाल्यामुळे ही लाभार्थी संख्या प्रलंबित राहिली असती तर समितीला अन्य कारणे ग्राह्य धरणे शक्य होते. त्यातही उपलब्ध निधीमध्ये लाभार्थी निवडण्यासाठी अवलंबिण्यात आलेल्या कार्यपद्धतीबाबतही निश्चितच साशंकता निर्माण होते. हा अतिरिक्त निधी जिल्हापरिषदेने मागणी करावयास हवा होता. इतकेच नव्हेतर जिल्हा नियोजन समिती, सामाजिक न्याय विभाग व आदिवासी विकास विभाग यांचेकडून हा निधी प्राप्त करून घेणे शक्य असताना यासाठी निश्चित प्रयत्न करण्यात आले नाहीत. या विभागांकडून दरवर्षी मोठ्या प्रमाणात निधी समर्पित करण्यात येतो. अशा परिस्थितीत त्या निधीचा लाभ घेवून सदरहू योजनेंतर्गत उर्वरित लाभार्थ्यांना लाभ देणे शक्य असताना अतिरिक्त निधीसाठी कोणतेही प्रयत्न करण्यात आले नाहीत. जर जिल्हापरिषदेने निधीची मागणीच केली नाही तर निधीअभावी सर्व लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देता आला नाही असे म्हणणेच निरर्थक ठरते. विशेष घटक योजना व आदिवासी क्षेत्र उपयोजना अंतर्गत प्राप्त निधीमध्ये कपात करण्यात येत नाही तसेच हा निधी दोन वर्षापर्यंत खर्च करण्याची मुभा असते. असे असतानाही निधीचा सदुपयोग विभागाला करता आला नाही. पशुसंवर्धन विभागाचा काही भाग स्थानिक संस्थांकडे देण्यात आला असून स्थानिक संस्था या ग्रामविकास विभागाच्या अंतर्गत कार्यरत असल्यामुळे या प्रकरणी जे काही निर्णय घेतले जातात ते जिल्हा परिषदेकडून व पर्यायी ग्रामविकास विभागाकडून घेण्यात येतात. पशुसंवर्धन विभागाची जबाबदारी व भूमिका केवळ योजनांच्या राज्यस्तरीय अंमलबजावणी संदर्भात असते. योजनेच्या अंमलबजावणीत निर्णय घेताना पशुसंवर्धन विभागाशी कोणताही विचार विनिमय केला जात नाही. ही योजना ग्रामविकास विभाग व जिल्हापरिषदेच्या माध्यमातून राबविण्यात येते. यावरदेखील समितीने आक्षेप नोंदवित अशाप्रकारे पशुसंवर्धन विभाग आपली जबाबदारी झटकू शकत नाही. असे मत व्यक्त केले. पशुसंवर्धनकरिता जिल्हा नियोजन समितीमध्ये देखील तरतूद असते व जिल्हापरिषदेचे सदस्य जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत उपस्थित असताना देखील या निधीची तरतूद करून घेता आली नाही. ही बाब निश्चितच गंभीर आहे. यात अधिक गंभीर बाब म्हणजे चालू वर्षात जर लाभार्थ्यांना योजनेचा लाभ निधीअभावी देता आला नाही तर मागील वर्षातील प्रलंबित उर्वरित लाभार्थ्यांची नावे पुढील वर्षीच्या यादीत घेवून त्यासाठी अतिरिक्त निधीची मागणी करण्याची

**मुभा उपलब्ध असताना पुढील वर्षाच्या यादीतदेखील ही नावे व वाढीव निधीची तरतूद करण्यात न येणे ही देखील गंभीर बाब आहे. पशुसंवर्धन अधिका-यांनी अतिरिक्त निधीची मागणी न केल्यामुळे ८४५५ पैकी केवळ २३७२ लाभार्थ्यांना योजनेचा लाभ मिळू शकला. या प्रकरणी संबंधित अधिका-यांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी व यासंबंधीची माहिती समितीस १ महिन्यात सादर करण्यात यावी असे निदेश समितीने दिले असता यास विभागीय प्रतिनिधींनी मान्यता दिली. मात्र अद्यापही ही आश्वासित माहिती अप्राप्त आहे. योजनेची अंमलबजावणी व निधीचे नियोजन ही जबाबदारी ग्रामविकास विभागाची किंवा पशुसंवर्धन विभागाची एकत्रितरित्या आहे. ही बाब विभागांतर्गत योग्य समन्वय ठेवून आवश्यक ते नियोजन करणे आवश्यक होते. या योजना पशुसंवर्धन विभागाच्या निधीतून राबविण्यात येतात मात्र योजनेची अंमलबजावणी ही जिल्हा परिषद व ग्रामविकास विभागाच्या माध्यमातून करण्यात येत असताना कोणताही विभाग यासंदर्भात आपली जबाबदारी टाळू शकत नाही. अतः या प्रकरणी दोषी अधिका-यांवर कारवाई करण्यात यावी तसेच लाभार्थ्यांची निश्चिती करताना त्या प्रमाणात निधी उपलब्ध नसल्यास अतिरिक्त निधीची मागणी करून या योजनेचा लाभ देण्यात यावा किंवा पुढील आर्थिक वर्षासाठी उर्वरित नावांचा व आवश्यक त्या निधीची तरतूद करुनच योजनेची अंमलबजावणी करावी व अशाप्रकारच्या बाबींची पुनरावृत्ती भविष्यात टाळावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक २.१.२.२ " दुभत्या जनावरांचे विलंबाने वाटप "**

**अभिप्राय**

**३.३** योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रत्येक वर्षी जून-जुलै मध्ये पशुधन विकास अधिका-याव्दारे लाभार्थ्यांकडून अर्ज मागावून जिल्हा पशुसंवर्धन अधिका-याकडे पाठवावयास पाहिजे होते. जिल्ह्याच्या उप संचालक, पशुसंवर्धन यांच्या अध्यक्षतेखालील समितीने योजनेच्या मार्गदर्शक सूचनांमध्ये विहित असलेल्या मानकांचे उचितपणे पालन करून सप्टेंबर अखेर पर्यन्त लाभार्थ्यांची निवड करावयास हवी होती.

परंतु प्रत्येक वर्षी जून महिन्यापासून ऑगस्ट महिन्यापर्यंत अर्ज प्राप्त होत होते परंतु अनुदान ऑगस्ट पासून मार्च महिन्यापर्यन्त मिळत होते. त्यानंतर ऑक्टोबर ते मार्च दरम्यान लाभार्थ्यांची निवड प्राप्त झालेल्या अनुदानाच्या आधारावर करण्यात येत होती, परिणामी, जनावरांची खरेदी आणि वाटप करण्यात विलंब होत होता. यामुळे जनावरांचे वाटप जानेवारी (चालू आर्थिक वर्षात) आणि ऑगस्ट (पुढील आर्थिक वर्षात) महिन्यादरम्यानच करता येऊ शकत होते. विविध स्तरांवर वेळापत्रकाचे पालन न करण्यात आल्यामुळे पात्र लाभार्थ्यांना लाभ मिळण्यास ४ ते ११ महिन्यांचा विलंब झाला. प्रशासनिक विलंबामुळे लाभार्थी वांछित लाभांपासून वंचित राहिले, जे टाळता येऊ शकले असते असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

यासंदर्भात विभागाने सादर केले की, निवड झालेल्या लाभार्थींनी त्यांचा २५ टक्के हिस्सा अपेक्षित कालावधीत व जनावरांची खरेदी करणेपूर्वी जमा करणेमध्ये काही प्रकरणांत विलंब झाल्यामुळे जनावरांची प्रत्यक्ष खरेदी व वाटप करण्यात विलंब झाल्याचे दिसून येते. तथापि, विहित वेळापत्रकानुसार योजनेची अंमलबजावणी करण्यात यावी याकरिता पशुसंवर्धन आयुक्त कार्यालयाने कार्यान्वयन अधिका-यांना सूचना निर्गमित केलेल्या असून यापुढे जनावरांची खरेदी करण्यामध्ये विलंब होणार नाही याची दक्षता घेण्याबाबत क्षेत्रिय अधिका-यांकडे आवश्यक पाठपुरावा करण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

**शिफारस**

**३.४ सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी दुभत्या जनावरांचे विलंबाने वाटप यासंदर्भात आक्षेप नोंदविलेले आहेत. योजनेच्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे अर्ज मागविण्याची प्रक्रिया विहित कालमर्यादेत पार पाडून जनावरांचे वाटप करणे अधिका-यांवर बंधनकारक असताना या प्रक्रियेला अमर्याद विलंब झाल्यामुळे व विविध स्तरावर वेळापत्रकाचे पालन न केल्यामुळे जनावरांचे वाटप विहित वेळेत लाभार्थ्यांना करता आले नाही. यात जर लाभार्थ्यांनी २५ टक्के न भरल्यामुळे वाटपास विलंब झाला असेल तर ही बाब समिती ग्राह्य धरु शकते. मात्र संबंधित अधिका-यांनी केवळ निधीची मागणी शासनाकडे न केल्यामुळे किंवा अन्य कोणत्याही कारणास्तव झालेला हा विलंब क्षमापित करण्यासारखा नाही. अतः या प्रकरणी लाभार्थ्यांनी २५ टक्के हिश्श्याची रक्कम न भरणे या व्यतिरिक्त झालेल्या विलंबाबाबत जबाबदार अधिकारी/कर्मचा-यांवर कारवाई करण्यात यावी तसेच दुभत्या जनावरांचे वाटप विलंबाने होऊ नये. यासंदर्भात दक्षता घेण्यात यावी तसेच अशा आक्षेपांची भविष्यात पुनरावृत्ती टाळण्याच्यादृष्टीने आवश्यक ती उपाययोजना करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक २.१.२.३ " जास्त वयाच्या गाईंची खरेदी "**

**अभिप्राय**

**३.५** इंडियन कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चर रिसर्चच्या अहवालानुसार जर्सी गाईचे वय पहिल्या वासराला जन्म देते वेळी २६-३० महिने असावयास पाहिजे. योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार ज्या जनावरांना दोन ते तीन वेळा वासरु झाले आहे अशीच जनावरे खरेदी करावयास पाहिजे, म्हणजेच खरेदीच्या वेळी जनावराचे इष्टतम वय साडे-तीन वर्षे ते साडे-चार वर्षे असावयास पाहिजे. परंतु २१७ लाभार्थ्यांसाठी २०११-१६ दरम्यान खरेदी केलेल्या ३६४ गाईंपैकी १५८ (४३ टक्के) पाच ते सात वर्षे वयाच्या होत्या. म्हणजेच, ज्यांची दूध देण्याची क्षमता घटत होती अशी जास्त वयाची जनावरे खरेदी करण्यात आलीत असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

यासंदर्भात विभागाने सादर केले की, संकरित दुधाळ गाईंच्या एकूण दुग्धोत्पादन देण्याच्या वयामध्ये जास्तीत जास्त आठ वेत होतील असे गृहीत धरल्यास दुस-या व तिस-या वेतामधील दुग्धोत्पादन सर्वात जास्त प्रमाणात (Peak production) असते. त्यानंतरच्या चवथ्या ते सहाव्या वेतातील दुग्धोत्पादन हे Peak production पेक्षा थोडे कमी परंतु सातत्यपूर्वक उच्च पातळीवरील राहते. सातव्या वेतापासून पुढील वेतामधील दुग्धोत्पादन मात्र हळू हळू कमी होते. अर्थात या बाबीं बरोबरच प्रत्येक दुधाळ गाईची दुग्धोत्पादन क्षमता, व्यवस्थापन पद्धती, देण्यात येणारे खाद्य, (खाद्याचे प्रमाण व गुणवत्ता), रोगराईपासून संरक्षण, विहित कालावधीतच उपलब्ध करून देण्यात आलेल्या पैदाशीच्या सुविधा आणि स्थानिक वातावरण (वातावरणातील तापमान व आर्द्रता), या सर्व बाबींचाही दुग्धोत्पादनावर निश्चित मोठा परिणाम होतो. त्याचप्रमाणे लेखाआक्षेपात नमूद केल्यानुसार दुधाळ जनावराचे पहिल्या वासराच्या जन्माचे वेळचे वय अडीच वर्षे व त्यानंतर दरवर्षी एक वासरू जन्मास येणे अशी स्थिती फक्त आदर्श स्थिती (Ideal Condition) मध्येच शक्य आहे. लक्षांकीत लाभार्थ्यांच्या घरी याप्रमाणे व्यवस्था उपलब्ध होणे जिकिरीचे आहे.

वास्तवात मात्र भौगोलिक परिस्थितीनुसार गाई/ म्हशी २४-३० महिन्यामध्ये वयात येतात म्हणजे अंदाजे ३.५ वर्षात प्रथम वेत मिळते व त्यानंतर १.५ ते २.० वर्षांनी दुसरे वेत म्हणजे ४.५ ते ५ वर्षात दुसरे वेत मिळते तसेच जास्त दुध देणा-या गाई दुधात असतांना त्या आटवून त्यांचे पासून एका वर्षात वेत घेण्याची मानसिकता पशुपालकांमध्ये क्षेत्रिय स्तरावर दिसून येत नाही. त्याचप्रमाणे चांगले दुग्धोत्पादन व प्रजनन क्षमता असलेल्या गाईंची विक्री करण्यास मालक सहसा तयार होत नाहीत वा रु. ४०,००० इतक्या कमी किंमतीमध्ये विक्री करण्यास उत्सुक नसतात. तसेच या योजनेमध्ये दुधाळ जनावरांची खरेदी लाभार्थ्यांच्या पसंतीने करणे अभिप्रेत तथा आवश्यक असल्यामुळे लाभार्थीनी निवड केलेल्या गाईंची खरेदी करण्यात येत होती असेही विभागीय प्रतिनिधींनी नमूद केले.

**शिफारस**

**३.६ सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी जास्त वयाच्या गाईंची खरेदी केल्यासंदर्भात आक्षेप नोंदविलेले आहेत. ज्या गाईंची खरेदी करण्यात आली होती त्यांची दुध उत्पादन क्षमता कमी होती. इंडियन कौन्सिल ऑफ ॲग्रीकल्चर रिसर्चच्या अहवालानुसार तसेच योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार दुभत्या गाईंसाठी विहित केलेले निकष व सध्या व्यावहारीकदृष्ट्या अस्तित्वात असलेले निकष यात निश्चितच तफावत असून क्षेत्रीय स्तरावर भौगोलिक स्तरानुसार तसेच गाईंच्या खाण्या-पिण्यावर व एकंदर संगोपनाच्या गुणवत्तेवर या निकषाची अंमलबजावणी अवलंबून आहे. परंतु विहित निकष निश्चितच पुर्ण करणे अवघड असल्याचेही समितीस सांगण्यात आले. समितीने यावर आक्षेप नोंदवित विहित निकष व मार्गदर्शक तत्वे शास्त्रीय व तांत्रिकदृष्ट्या अशक्य वा अडचणीचे असतील तर विभागाला हे निकष बदलण्याची पुर्ण मुभा आहे. परंतु हे निकष व मार्गदर्शक तत्वे बदलण्यात आलेले नाहीत अशा परिस्थितीत त्याची अंमलबजावणी करणे विभागावर बंधनकारकच ठरते व त्यात कोणतीही शिथिलता वा सूट विहित निकष अस्तित्वात असताना विभागाने घेणे शक्य व योग्य नाही. वास्तविकदृष्ट्या कोणताही शेतकरी चांगल्या व भरपूर प्रमाणात दुध देणा-या गाईंची विक्री करीत नाही. ज्या गाई विक्रीसाठी बाजारात उपलब्ध असतील त्याच विकत घेवून वाटप कराव्या लागतात. अशा परिस्थितीत स्थानिक पातळीवरील परिस्थितीनुसार मार्गदर्शक तत्वांमध्ये बदल करण्याचे वा सुट देण्याचे अधिकाराचे विकेंद्रीकरण अथवा मार्गदर्शक तत्वांमध्ये बदल करणे असेही पर्याय विभागाकडे खुले राहतात. त्याचा सखोल अभ्यास करून शासनाने यासंदर्भातील योग्य तो निर्णय कालबद्ध पद्धतीने घ्यावा व ज्या उद्देशाने ही योजना सुरू झाली आहे व शेतक-यांना अतिरिक्त उत्पादनाचे साधन म्हणून दुभत्या गाईंचे वाटप करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे तो उद्देश कुठेही विफल होवू नये वा त्यातून पळवाट काढून अन्य कोणीही व्यक्ती त्यातून फायदे घेवू नये अशी परिपूर्ण व्यवस्था विभागाने निर्माण करण्याची दक्षता घ्यावी व लाभार्थी शेतक-यांना दुभत्या गाईंचे वाटप करताना त्यांची उपयोगिता निश्चित करुनच खरेदी करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक २.१.२.४ " विनिर्दिष्ट अंतर न राखता जनावरांचे वाटप "**

**अभिप्राय**

**३.७** योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार सुरुवातीला एका लाभार्थ्यास एक दुभते जनावर दयावयास पाहिजे आणि नंतर सहा महिन्यांच्या कालावधीनंतर किंवा पहिल्या दुभत्या जनावराने दूध देणे बंद केल्यानंतर, यापैकी जे आधी घडेल ते, दुसरे जनावर दयावयास पाहिजे, जेणेकरून दुधाचे उत्पादन सातत्याने होत असल्याची खात्री करता येईल आणि लाभार्थ्यांसाठी सातत्याने उत्पन्नाचे साधन उपलब्ध होईल. परंतु, पाच पशुधन विकास कार्यालयांमध्ये ७६ लाभार्थ्यांना एकाच वेळी दोन जनावरे देण्यात आली, तर १६३ लाभार्थ्यांना पहिले जनावर दिल्यानंतर दुसरे जनावर १० ते १३ महिन्यांच्या अंतराने देण्यात आले असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

यासंदर्भात विभागाकडून खुलासा करण्यात आला की, दोन्ही जनावरे एकाच वेळी देण्यात आली कारण लाभार्थी दुस-या जनावरासाठी पुनः वाहतूक खर्च अदा करण्यास तयार नव्हते. त्याचप्रमाणे विनिर्दिष्ट अंतराने दुस-या जनावरासाठी पर्याप्त निधी मिळण्याबाबत साशंकता होती. तसेच, दुधाळ जनावरे खरेदी करण्यासाठी आवश्यक असणारी २५ टक्के हिश्याची रक्कम लाभार्थ्यांनी न भरल्यामुळे तसेच निधी मिळाल्यावर खरेदी प्रक्रिया अवलंबविण्यात आली त्यामुळे हा विलंब झालेला आहे.

मात्र हा खुलासा महालेखाकारांनी मान्य केला नाही. कारण लाभार्थी तयार नसतील अशा प्रकरणांत प्रतिक्षा सूचीच्या (Waitlisted) लाभार्थ्यांची निवड करावयास पाहिजे होती. तसेच मागणी केल्याप्रमाणे निधी मिळाला होता आणि म्हणूनच निधीच्या प्राप्तीबाबत कोणत्याही प्रकारची साशंकता नव्हती. परिणामी लाभार्थ्यांना सातत्याने दूध उत्पादन आणि नियमित उत्पन्नाचे साधन पुरविण्याचा लाभ देण्यात आला नाही असे महालेखाकारांनी नमूद केले.

एक दुधाळ जनावर पुरविलेल्या लाभार्थ्याला दुसरे दुधाळ जनावर पुरविणे आवश्यक तथा क्रमप्राप्त होते. अशा लाभार्थींनी दुस-या दुधाळ जनावराप्रित्यर्थ लाभार्थी हिश्याची रक्कम लवकर जमा केली नाही म्हणून त्यांचे ऐवजी प्रतिक्षाधिन लाभार्थी निवडून त्यांना दुधाळ जनावरे पुरविणे संयुक्तिक नव्हते. असे असले तरीही योजनेच्या मंजूर स्वरुपानुसार निवड केलेल्या लाभार्थ्यांना दोन दुधाळ जनावरे सहा महिन्यांचा अंतराने पुरवठा करणेबाबत योग्य ती दक्षता घेणेबाबत सुचना निर्गमित केल्या असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

**शिफारस**

**३.८ सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी विनिर्दिष्ट अंतर न राखता जनावरांचे वाटप करणे यासंदर्भात आक्षेप नोंदविलेले असून योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार एक दुभते जनावर लाभार्थ्यास दिल्यानंतर ६ महिन्यांच्या कालावधीनंतर किंवा पहिल्या दुभत्या जनावराने दुध देणे बंद केल्यानंतर यापैकी जे आधी घडेल ते दुसरे जनावर द्यावयास पाहिजे. जेणेकरून दुधाचे उत्पादन सातत्याने होत असल्याची खात्री करता येईल व लाभार्थ्यांना अतिरिक्त उत्पन्नाचे साधन उपलब्ध होईल. मात्र दुस-या जनावराचे वाटप करण्यास १० ते १३ महिन्यांचा विलंब झालेला आहे. यामागे विभागाने दिलेली कारणे ही जनावरांच्या वाहतूकीचा खर्च दोनदा करण्यास लाभार्थ्यांची अनुत्सुकता, वाहतूक खर्चाची बचत, दुसरे जनावर खरेदी करण्यास आवश्यक असलेली लाभार्थी हिश्याची २५ टक्के रक्कम लवकर जमा न करणे, तसेच विनिर्दीष्ट अंतराने दुस-या जनावरासाठी पर्याप्त निधीची कमतरता अशी अनेक कारणे विभागाने समितीस सांगितली. लाभार्थी हिश्याची २५ टक्के रक्कम न भरल्यामुळे झालेला विलंब या व्यतिरिक्त झालेला वाहतूक खर्च व निधीची कमतरता ही कारणे मात्र समिती मान्य करू शकत नाही. योजनेची अंमलबजावणी विहित निकष व मार्गदर्शक तत्वाप्रमाणे करणे विभागावर बंधनकारकच आहे. आवश्यक त्या अतिरिक्त निधीची मागणी विभागाने वेळेत करणे आवश्यक होते. मात्र विभागाने अशी अतिरिक्त निधीची मागणीच केली नाही व प्रकरणाचा योग्यरित्या पाठपुरावा देखील केला नाही. इतकेच नव्हेतर विभागांतर्गत अनेक पदे रिक्त असल्यामुळे देखील योजनेची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यात यंत्रणा कमी पडली. परंतु, ही सर्व कारणे प्रशासकीय स्वरुपाची असून त्याचे निराकरण करून योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याची जबाबदारी ही निश्चितच विभागाची होती. त्यामुळे अशी कारणे विभागाने सांगणे व योजनेच्या अंमलबजावणीत विलंब करणे हे निश्चितच उचित नाही. यासंदर्भात संबंधितांवर कारवाई करण्यात यावी तसेच अशा बाबींची भविष्यात पुनरावृत्ती टाळण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना विभागाच्या स्तरावरुन तात्काळ करण्यात यावी. निधीची कमतरता व रिक्त पदे अशा दोन्ही अडचणी विभागाने कालबद्ध पद्धतीने दुर कराव्यात व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक २.१.२.५ " लाभार्थ्यांव्दारे जनावरांची विक्री "**

**अभिप्राय**

**३.९** योजनेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार, लाभार्थ्याने खरेदी तारखेपासून तीन वर्षापर्यन्त जनावरांना ठेवावयास पाहिजे. जनावरांना तीन वर्षे ठेवण्यात आले नसल्या प्रकरणांत, लाभार्थ्याकडून शासन सहाय्य निधी व्याजासहित एक रकमी वसूल करावयास पाहिजे. परंतु २०११-१६ दरम्यान १५५ पैकी ७३ लाभार्थ्यांनी रु.४२.८० लाख किंमतीची १०७ जनावरे खरेदीच्या तारखेपासून तीन वर्षांच्या आत विकली आणि या प्रकरणात कोणतीही वसुली करण्यात आली नव्हती. तसेच, चंद्रपूर आणि लाखनी येथे सहा लाभार्थ्यांनी रु. ४ लाख किंमतीची १० जनावरे खरेदी पासून तीन वर्षांच्या आत विकली, परंतु त्यांचेकडून कोणतीही वसुली करण्यात आली नाही. पाच पशुधन विकास अधिका-यांच्या १२ लाभार्थ्यांकडे २३ जनावरे होती. परंतु, संयुक्त प्रत्यक्ष पाहणीत १८ जनावरे आढळली नाहीत आणि त्यांच्याबाबत ती जनावरे चारा चरण्यासाठी सोडण्यात आले असल्याचे सांगण्यात आले. म्हणून या प्रकरणांत, या जनावरांच्या अस्तित्वाबाबत लेखापरीक्षेस पडताळणी करता आली नाही असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

लाभार्थ्यांनी जनावरांसाठी पुरेसा चारा उपलब्ध नसणे, जनावराचे कमजोर आरोग्य, कमी दूध उत्पादन, जनावरांमध्ये वंध्यत्व, गाई हाताळण्यात येणा-या अडचणी इत्यादी कारणे जनावरांच्या विक्रीमागे दिली. या प्रकरणांत, वसुलीचे स्पष्ट प्रावधान असल्यानंतरही जिल्हा पशुसंवर्धन अधिका-यांनी कसूर करणा-या लाभार्थ्यांकडून वसुली केली नव्हती व या प्रकरणी ज्या लाभार्थ्यांनी तीन वर्षांच्या आत जनावरे विकली होती, त्यांच्याकडून वसुली करण्याची कारवाई करण्यात येईल असेही समितीस सांगितले.

दुधाळ जनावरे वाटप करण्यात आलेले लाभार्थी प्रामुख्याने दारिद्र्यरेषेखालील आणि मागासवर्गीय (अनुसुचित जाती वा जमातींचे ), असून त्यांची कमकुवत आर्थिक स्थिती पाहता अनुदानाच्या वसुलीसंदर्भात सहानुभूतीपूर्वक वसुली करणे आवश्यक आहे. तथापि, अशा लाभार्थ्यांनी जनावरे विकली असल्यास त्यांचेकडून महसुली पद्धतीने अनुदानाची रक्कम वसूल करण्याच्या सुचना शासन निर्णयात आहेत. त्यासंबधी तहसिलदार तसेच जिल्हाधिकारी यांच्याकडे संबंधित कार्यप्रणाली राबवून पाठपुरावा करण्यात येईल असे विभागीय प्रतिधिनींनी समितीस सांगितले.

**शिफारस**

**३.१०** सदरहू **परिच्छेदात महालेखाकारांनी लाभार्थ्यांद्वारे जनावरांची विक्री करणे असे गंभीर आक्षेप नोंदविलेले आहेत. योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार लाभार्थ्यांने खरेदी तारखेपासून ३ वर्षापर्यंत जनावरांना ठेवावयास पाहिजे व असे न केल्यास लाभार्थ्यांकडून शासन सहाय्य निधी व्याजासहीत एक रकमी वसुल करावयास पाहिजे. अशी सुस्पष्ट तरतूद असताना अनेक प्रकरणी याचे उल्लंघन झालेले असताना व ३ वर्षाच्या आत या जनावरांची विक्री झालेली असताना कोणतीही वसुली लाभार्थ्यांकडून करण्यात आलेली नाही. वसुलीची स्पष्ट तरतूद असताना त्याची अंमलबजावणी अधिका-यांकडून झालेली नाही. परिणामी योजनेचा मुळ उद्देशच विफल झाला. किंबहुना त्याचा गैरवापरच जास्त झाल्याचे स्पष्टपणे दिसून येते. शेतक-यांना अतिरिक्त उत्पन्नाचे साधन मिळण्याच्या सद्हेतूने दोन दुभती जनावरे लाभार्थ्यांना या योजनेंतर्गत दिलेली असताना त्याचा लाभार्थ्यांनी लाभ न घेता ती विकणे याचाच अर्थ लाभार्थ्यांनी केवळ योजनेचा फायदा घेणे असाच दिसून येतो व त्या लाभार्थ्यांना दुभत्या जनावरांची कोणतीही आवश्यकता नसल्याचे स्पष्ट होते. सदरहू लाभार्थ्यांपैकी बहुतांश लाभार्थी दारिद्र्यरेषेखालील व मागासवर्गीय होते. त्यामुळे उपरोक्त उल्लंघनाप्रती त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्याची मानसिकता जिल्हापरिषद यंत्रणेची नव्हती असे विभागाने दिलेले स्पष्टीकरण अत्यंत आक्षेपार्ह आहे. लाभार्थी निवडणे व पात्र व गरजू लाभार्थ्यांना योजनेचा लाभ देणे व योजनेची प्रभावी अंमलबजावणी नियम व निकषानुसार करण्याची पुर्णपणे जबाबदारी ही अधिकारी/कर्मचा-यांची असताना या योजनेचा लाभ दिलेल्या लाभार्थ्यांनी त्याचा किती वर्षे लाभ घेतलेला आहे. याचे नियंत्रण, छाननी, तपासणी करून योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीचा नियमित पाठपुरावा करण्याची जबाबदारी ही विभागाचीच असताना त्यांनी ती पार न पाडल्यामुळे विभागाचे योजनेवर कोणतेही संनियंत्रण राहिले नाही. किंबहुना अनेक प्रकरणी याचा निश्चितच गैरवापर झालेला आहे. कित्येक ठिकाणी लाभार्थ्यांच्या गरीबीचा, मागासवर्गीय असण्याचा, अज्ञानाचा फायदा मध्यस्थी वा दलाल लोकांकडून घेवून व त्यांच्या नावाचा गैरवापर करून अपरोक्ष या योजनेचे लाभ उचलणे व नंतर ती जनावरे विकणे असेही प्रकार प्रत्यक्षात अनेक ठिकाणी घडतात व ही बाब निश्चितच गंभीर आहे. ज्यावेळी ३ वर्षे ही जनावरे ठेवण्याची तरतूद योजनेच्या मार्गदर्शक तत्वामध्ये स्पष्टपणे विहित करण्यात आलेली आहे तर त्याची अंमलबजावणी करणे व ही जनावरे ३ वर्षे त्या लाभार्थ्यांकडे आहे हे नियमितरित्या तपासण्याची जबाबदारी ही निश्चितच विभागाच्या अधिका-यांची आहे. परंतु, त्यांनी त्यांची जबाबदारी व प्रकरणांचा नियमित पाठपुरावा केला नाही हे स्पष्टपणे दिसून येते. विभागाचे अधिकारी झालेल्या गैरव्यवहाराप्रकरणी कारवाईची इतकी मवाळ भूमिका स्विकारत असतील तर योजनेचा भविष्यात अधिकच गैरवापर होण्याची शक्यता नाकारता**

**येत नाही व कारवाईचे भय कोणत्याही लाभार्थ्यांच्या मनात राहणार नाही. परिणामी ही बाब शासनाच्यावतीने जनमानसात चुकीचा संदेश देणारी ठरणारी आहे. नियमांच्याविरुद्ध जाऊन असे धाडस व उल्लंघन करण्याची कोणत्याही लाभार्थ्यांची हिंमत होणार नाही अशी व्यवस्था निर्माण करण्याची जबाबदारी ही विभागाची आहे. या कार्यपद्धतीमुळे पात्र लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळत नाही व त्यांचेवर निश्चितच अन्याय होतो. इतकेच नव्हेतर योजनेचा दुबार लाभ घेण्यापासून देखील लाभार्थ्यांना परावृत्त करण्यासाठी यंत्रणेचे नियंत्रण असणे आवश्यक आहे. महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदात आक्षेपित केल्याप्रमाणे विक्री झालेल्या जनावरांच्या रकमेची व्याजासहीत वसुली करणे अधिका-यांवर बंधनकारकच आहे. यासाठी जनावरांची तपासणी नियमितरित्या करण्यात यावी, पहिल्या वर्षी लाभार्थ्यांकडे जनावर आढळून आले नाही तर त्यांनी जनावर खरेदीच केले नाही अशा निष्कर्षाप्रत विभागाला येणे शक्य आहे. अनेकदा जनावरांना पाणी, चारा उपलब्ध करण्यासाठी देखील अडचणी येतात त्यामुळेदेखील ही विक्री होते. आता केंद्र शासनाने INAPH टॅगींग बंधनकारक केलेली आहे, ज्यामध्ये एक युनिक कोड असतो तो बदलणे कठीण आहे. त्यामुळे जनावरांच्या हालचालींवर तांत्रिक व अद्ययावत पद्धतीने नियंत्रण ठेवण्यास निश्चितच उपयोग होईल. मात्र यात देखील मोठ्या प्रमाणात गैरव्यवहार होतात. हे INAPH टॅगींग जनावरांच्या कानाला लावण्यात येते व अनेक ठिकाणी असे दिसून आले की, यात जनावरांवर अत्याचार देखील करण्यात येतात. त्यामुळे असे प्रकार टाळण्याच्यादृष्टीने यंत्रणा कार्यरत करण्यात यावी व भविष्यात अशा आक्षेपांची पुनरावृत्ती टाळण्यात यावीत व सदरहू प्रकरणी ज्या लाभार्थ्यांनी जनावरे ३ वर्षाच्या आत विकलेली आहेत त्यांचेकडून त्या रकमेची वसुली करण्यात यावी. ज्या लाभार्थ्यांनी १ वर्षाच्या आतच जनावरांची विक्री केलेली आहे अथवा मध्यस्थी वा दलालांनी पात्र लाभार्थ्यांच्या नावाचा गैरवापर करून जनावरांची विक्री केली असेल तर अशा परिस्थितीत प्रकरणांची शहानिशा करून तावडतोब FIR दाखल करण्यात यावा. जनावरांची पडताळणी (verification) दर ३ वर्षानंतर न करता दरवर्षी करण्यात यावी. तसेच अशा पद्धतीने गैरप्रकार करणा-या लाभार्थ्यांना पुढील ५ वर्षे या योजनेचे कोणतेही लाभ न देण्यासंदर्भातील पर्यायांचा अवलंब करणे शक्य असल्यास त्याचा देखील अभ्यास करून योग्य तो निर्णय शासनस्तरावरुन घेण्यात यावा. त्याअनुषंगाने मार्गदर्शक तत्वांमध्ये सुधारणा करण्याची आवश्यकता असल्यास त्यासंदर्भात देखील कार्यवाही करण्यात यावी तसेच नियमांचे उल्लंघन केल्यानंतर कारवाई करणेपेक्षा असे उल्लंघनच होऊ नये यासाठी व लाभार्थ्यांच्या मनात शासन यंत्रणेबाबत शिस्त व भय राहणेसाठी तसेच लाभार्थ्यांना उल्लंघन करण्यापासून परावृत्त करणेसाठी आवश्यक ती कडक यंत्रणा निर्माण करावी तसेच या प्रकरणी जबाबदारी अधिकारी/कर्मचा-यांवर कारवाई करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक २.१.२.६ “ दुभत्या जनावरांची नियमबाह्य खरेदी ”**

**अभिप्राय**

**३.११** योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जनावरांची खरेदी एका खरेदी समितीद्वारे ज्यात पशुधन विकास अधिकारी, पशुवैद्यकिय इस्पितळाचे प्रमुख, ग्राम दुग्ध सहकारी संस्था सदस्य, बँक प्रतिनिधी आणि लाभार्थी असावयास पाहिजे होती. परंतु, गडचिरोली पशुधन विकास कार्यालयामध्ये रु.११.२० लाख किंमतीची सर्व २४ जनावरे पशुधन विकास अधिका-याने २०१२-१५ दरम्यान खरेदी समिती गठीत न करता खरेदी केली असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

यासंदर्भात विभागाने स्पष्ट केले की, गडचिरोली जिल्हयात एकाही विमा कंपनीचे कार्यालय नसल्यामुळे व विम्याची प्रक्रीया नजिकच्या चंद्रपूर जिल्हयात जावून पुर्ण करावी लागत असल्यामुळे गडचिरोली जिल्हयात जनावरांची खरेदी करतेवेळी खरेदी समितीमधील विमा प्रतिनिधी उपलब्ध होत नाही. ही बाब विचारात घेऊन खरेदी समितीमधील पशुधन विकास अधिकारी (विस्तार), लाभार्थी ज्या पशुवैद्यकीय दवाखान्याच्या कार्यक्षेत्रात वास्तव्यास आहे त्या दवाखान्याचा संस्था प्रमुख व लाभार्थी या तिघांच्या उपस्थितीमध्ये जनावरांची खरेदी करण्यात आलेली असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितिले.

**शिफारस**

**३.१२ सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी नोंदविलेले आक्षेप हे दुभत्या जनावरांची नियमबाह्य खरेदी यासंदर्भात असून ही अत्यंत गंभीर बाब आहे. योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार जनावरांची खरेदी करण्यासाठी एक खरेदी समिती विहित करण्यात आलेली आहे. ज्यात अनेक लोकांचा समावेश असतो. मात्र गडचिरोली येथे जवळजवळ रु.११.२० लक्ष किंमतीची जनावरे खरेदी समिती गठीत न करता खरेदी करण्यात आली ही बाब निश्चितच गंभीर आहे. यासंदर्भात गडचिरोली जिल्ह्यात विमा कंपनीचे कार्यालय नसल्यामुळे ही प्रक्रिया चंद्रपूर जिल्ह्यात जाऊन पूर्ण करावी लागते. त्यामुळे विमा प्रतिनिधी उपलब्ध होत**

**नाही अशी कारणमिमांसा विभागाने सदरहू प्रकरणी दिली. यावर समितीने तीव्र आक्षेप नोंदवित खरेदी जिल्ह्याबाहेर करण्यासंदर्भात समितीचे कोणतेही आक्षेप नाहीत. परंतु ही खरेदी नियमानुसार व गुणवत्तेनुसार होण्यासाठी खरेदी समिती गठीत करून एकमताने हा निर्णय करणे अभिप्रेत व आवश्यक असताना त्याची अंमलबजावणी न झाल्यामुळे झालेल्या खरेदीची गुणवत्ता व पारदर्शकता निश्चितच शंकास्पद व नियमबाह्य ठरते. गडचिरोलीसारख्या आदिवासी बहुल व नक्षलग्रस्त भागामध्ये काम करताना अनेक अडचणींना सामोरे जावे लागते हे समितीला मान्यच आहे व योजनेचा लाभ पात्र लाभार्थ्यांना मिळण्याच्यादृष्टीने कार्यवाही व्हावी यात समितीचे दुमत नाही. मात्र यामुळे विहित कार्यपद्धतीचे उल्लंघन निश्चितच समर्थनीय ठरत नाही. सदरहू आक्षेप विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर मान्यच केले व संबंधित जिल्हा पशुसंवर्धन अधिका-यावर कारवाई करण्याचे निदेश देण्यात आल्याचे समितीस सांगितले. यावर समितीने आक्षेप नोंदवित सदरहू आक्षेप महालेखाकारांनी सन २०१५-१६ या वर्षी नोंदविलेले असताना महालेखाकारांच्या या गंभीर आक्षेपांची विभागाने कोणतीही दखल मुदतीत घेतली नाही. केवळ लोकलेखा समितीची साक्ष लागली म्हणून हे आक्षेप विभाग मान्य करीत आहे. वास्तविकतः विभागीय सचिवांनी संबंधितावर केलेल्या कारवाईसह साक्षीसाठी उपस्थित राहणे आवश्यक होते. परंतु तसे न करता आता कारवाईचे निदेश देणे ही बाब निश्चितच योग्य नाही. समिती याबाबत तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे व या प्रकरणी नियमबाह्य खरेदी व कारवाईस विलंब यासाठी जबाबदार असणा-या अधिकारी/ कर्मचा-यांवर विभागाने तात्काळ कारवाई करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक २.१.२.७ " जनावरांची महाराष्ट्र एनिमल आयडेंटिफिकेशन ॲण्ड रेकॉर्डिंग ऑथॉरिटी यांचेकडे नोंदणी न करणे "**

**अभिप्राय**

**३.१३** महाराष्ट्र पशुधन विकास बोर्ड यांनी जनावरांना टॅग्स लावणे (lmplant tags) आणि त्यांची नोंदणी करणे यासाठी महाराष्ट्र एनिमल आयडेंटिफिकेशन ॲण्ड रेकॉर्डिंग ऑथॉरिटी (MAIRA) ची स्थापना केली. जनावरांचे आणि त्यांच्या परिसराची ऑनलाईन नोंदणी दस्तावेज राखण्यासाठी सुद्धा MAIRA जबाबदार होते.

योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार जनावरांच्या स्थानांची माहिती मिळवणे आणि जनावरांचा ऑनलाईन डेटा योजनेअंतर्गत राखण्यासाठी सर्व जनावरांची MAIRA कडे नोंदणी करणे अनिवार्य होते. नमुना तपासणी केलेल्या १२ पशुधन विकास कार्यालयामध्ये योजनेंतर्गत २०११-१६ दरम्यान खरेदी करण्यात आलेल्या ६२७ जनावरांची MAIRA मध्ये नोंदणी झाली नव्हती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार दुधाळ जनावरांच्या स्थानांची माहिती मिळविणे आणि जनावरांचा ऑनलाईन डेटा योजनेंतर्गत राखण्यासाठी सर्व जनावरांची MAIRA कडे नोंदणी करणे अनिवार्य होते. परंतू त्याकालावधीत सदर प्रणाली नविन होती. त्यानंतर कालांतराने केंद्र शासनाने INAPH या संगणक प्रणालीमध्ये दुधाळ जनावरांची नोंदणी करणे बंधनकारक केले. त्यानुसार प्रत्येक जिल्हयात जनावरे नोंदणीचे काम सुरू केले असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर स्पष्ट केले.

**शिफारस**

**३.१४ सदरहू परिच्छेदात जनावरांची महाराष्ट्र एनिमल आयडेंटिफिकेशन ॲण्ड रेकॉर्डिंग ऑथॉरिटी यांचेकडे नोंदणी न करणे यासंदर्भात आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत. जनावरांना टॅग लावणे व त्यांची नोंदणी करणे यासाठी या ॲथॉरिटीची स्थापना करण्यात आलेली असताना व या माध्यमातून जनावरांची अद्ययावत माहिती व संख्या उपलब्ध होणे अपेक्षित असताना अनेक जनावरांची यामध्ये नोंदणीच करण्यात आली नव्हती. परिणामी आजतागायत जनावरांची अद्ययावत संख्या उपलब्ध नाही. इतकेच नव्हेतर विभागाच्या व इनाफच्या रेकॉर्डप्रमाणे जनावरांच्या संख्येतदेखील तफावत दिसून येते. जोपर्यंत सर्व जनावरांचे अद्ययावतपणे टॅगींग होत नाही तोपर्यंत त्यांच्या संख्येची निश्चिती करणे शक्य नाही. यासंदर्भात पाठपुरावा करून कालबद्ध पद्धतीने हे काम पुर्ण करण्यात यावे व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक २.१.२.८ " दुभत्या जनावरांचा विमा उतरविण्यातील विलंब "**

**अभिप्राय**

**३.१५** या योजनेखाली वाटप करण्यात आलेल्या दुभत्या जनावरांचा लाभार्थी व संबंधित जिल्ह्यातील पशुसंवर्धन अधिकारी यांच्या नावे ३ वर्षासाठी विमा उतरविण्यात आला पाहिजे होता. परंतु लाभार्थी आणि जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी ऐवजी लाभार्थी आणि संबंधित पशुधन विकास अधिका-यांच्या नावे विमा उतरविण्यात आला होता. तसेच जनावरांच्या खरेदीच्या वेळी पशुधन विकास अधिकारी विमा हप्त्यासाठी निधी काढू न शकल्यामुळे, ६२७ पैकी ६२० जनावरांचा विमा उतरविण्यात १२६ दिवसांपर्यंतचा विलंब झाला असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

**शिफारस**

**३.१६ सदरहू परिच्छेदात दुभत्या जनावरांचा विमा उतरविणे संदर्भात विलंब याबाबत गंभीर आक्षेप नोंदविण्यात आले असून दुधाळ जनावरांचा विमा, लाभार्थी आणि जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांचे नावे उतरविण्याबाबत निर्देश असतांना या प्रकरणी लाभार्थी आणि पशुधन विकास अधिकारी यांच्या नावे विमा उतरविणे ही बाब निश्चितच गंभीर आहे. विभागाच्या म्हणण्यानुसार क्षेत्रिय स्तरावरील गरज आणि विमा दावे मंजूर होण्याच्या प्रक्रियेतील लागणारा विलंब काही प्रमाणात टाळता येणेसाठी जरी या पद्धतीचा अवलंब विभागाने केला तरीही विमा उतरविण्यामध्ये चार महिन्यांपर्यंत कालावधीचा विलंब झाला, ही बाब निश्चितच समर्थनीय नाही. अतः या प्रकरणी संबंधितांवर कारवाई करण्यात यावी. तसेच यापुढे अशा स्वरुपाचा विलंब होणार नाही यांची दक्षता घेण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक २.१.२.९ " लाभार्थ्यांचे प्रशिक्षण "**

**अभिप्राय**

**३.१७** योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार प्रत्येक लाभार्थ्यास पशुपालन विषयक प्रशिक्षण देणे क्रमप्राप्त होते. परंतु पाच जिल्हा पशुसंवर्धन कार्यालयांमधील १४९२ लाभार्थ्यांपैकी २७३ (१८ टक्के) लाभार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले, तर गोंदिया जिल्ह्यामधील सर्व ८८० लाभार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले होते. पाच जिल्हा पशुसंवर्धन अधिका-यांनी नमूद केले (मार्च ते एप्रिल २०१६) की अर्थसंकल्पीय तरतूद नसल्यामुळे प्रशिक्षण देण्यात आले नाही. मात्र पाचही जिल्हा पशुसंवर्धन अधिका-यांनी लाभार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी आयुक्त यांचेकडे निधीची मागणी केली नव्हती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

योजनेच्या मार्गदर्शक सूचनानुसार प्रत्येक लाभार्थ्यास पशुपालन विषयक प्रशिक्षण देणे क्रमप्राप्त होते. परंतु गोंदीया जिल्हा वगळता इतर जिल्ह्यात प्रशिक्षणाकरिता निधी उपलब्ध नसल्याने प्रशिक्षण देण्यात आले नव्हते. मात्र जनावरांचे वाटप झाल्यानंतर संबंधित पशुपालकांना पशुवैद्यकीय संस्थेत तसेच तांत्रिक शिबिराच्या माध्यमातून प्रशिक्षित करण्यात आले होते. सन २०१६-१७ पासून संबंधित लाभार्थी यांना प्रशिक्षण देण्याबाबत प्रशिक्षणाचा नियमित कार्यक्रम राबविण्यात आलेला आहे. तसेच ASCAD योजनेंतर्गत तालुकास्तरावर तांत्रिक चर्चासत्राचे आयोजन करण्यात येते. त्या माध्यमातूनसुद्धा पशुपालकांना प्रशिक्षित करण्यात येते. ज्या जिल्ह्यांना जिल्हा वार्षिक योजनेंतर्गत विशेष घटक योजनेंतर्गत तरतूद उपलब्ध होती त्यांचे नियमित प्रशिक्षण घेण्यात आले आहे असे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर स्पष्ट केले.

**शिफारस**

**३.१८ सदरहू परिच्छेदात महालेखाकारांकडून लाभार्थ्यांचे प्रशिक्षण न झाल्याबाबतचे आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत. योजनेच्या मार्गदर्शक तत्वानुसार प्रत्येक लाभार्थ्यास पशुपालनविषयक प्रशिक्षण देणे क्रमप्राप्त असताना अनेक लाभार्थ्यांना प्रशिक्षण देण्यात आले नव्हते. यामागील कारण समितीने तपासले असता अर्थसंकल्पिय तरतूद नसल्यामुळे असे प्रशिक्षण देण्यात आले नसल्याचे समितीस सांगण्यात आले. समितीने अधिकची छाननी केली असता पशुसंवर्धन अधिका-यानी लाभार्थ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी अतिरिक्त निधीची मागणीदेखील केली नव्हती. ही बाब निश्चितच गंभीर असून योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीत निश्चितच अडथळा निर्माण करणारी आहे. तरतुदीप्रमाणे प्रशिक्षण होण्याच्यादृष्टीने विभागाकडे नियोजनच अस्तित्वात नव्हते. आता जे जिल्हे VMDDP प्रकल्पात आलेले आहेत तेथे प्रशिक्षणाबाबत मोठ्या प्रमाणात कार्यवाही सुरू आहे. परंतु अनेक ठिकाणी मात्र प्रशिक्षण कार्यक्रम राबविला जात नाही. भविष्यात यामध्ये सुधारणा करणे विभागाकडून अभिप्रेत असून महालेखाकारांनी नोंदविलेल्या आक्षेपाची दखल गांभीर्याने घेणे क्रमप्राप्त आहे. प्रशिक्षण देण्यासंदर्भात तरतूद असतानाही असे**

**प्रशिक्षण देण्यात आले नाही ही वस्तुस्थिती आहे. अतः यास जबाबदार असणा-या अधिकारी/कर्मचा-यांवर कारवाई करण्यात यावी. कोणतेही लाभार्थी प्रशिक्षणाशिवाय शिल्लक राहणार नाही याची सुनिश्चिती करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक २.१.२.१० " योजनेबद्दल जनजागृती करण्याचा अभाव "**

**अभिप्राय**

**३.१९** योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार योजनेंतर्गत लाभ मिळण्यासाठी योजनेची व्यापक प्रसिद्धी करून लाभार्थ्यांकडून अर्ज मागवावयास हवे होते. भंडारा वगळता, इतर जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी आणि BDO स्तरावर प्रसिद्धी देण्यात आली नव्हती. परिणामी, सहा जिल्ह्यांमध्ये प्राप्त झालेल्या एकूण ८६७३ अर्जापैकी ३३९३ अर्ज (३९ टक्के) एकट्या भंडारा जिल्ह्याचे होते. उर्वरित पाच जिल्हा पशुसंवर्धन अधिका-यांनी उत्तर दिले की प्रसिद्धीसाठी निधीची तरतूद नसल्यामुळे प्रसिद्धी देण्यात आली नाही. परंतु प्रसिद्धी ही या योजनेचा एक अविभाज्य भाग आहे आणि संबंधित प्राधिका-यांनी निधीची मागणी करतेवेळी याबाबत मागणी करावयास हवी होती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

योजनेचा शासन निर्णय तसेच मार्गदर्शक सूचनांमध्ये योजनेच्या प्रसिद्धीसाठी स्वतंत्र आर्थिक तरतूद दर्शविण्यात आलेली नाही. त्यामुळे ग्रामपंचायत स्तरावर असलेल्या सूचना फलकांवर जाहिरात करणे, पंचायत समिती आणि पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या स्तरावर योजनेची माहिती व अर्ज करण्याच्या कार्यपद्धतीची माहिती प्रदर्शित करणे, ग्रामसेवकांची बैठक घेऊन त्यांना ग्रामसभांमध्ये/ ग्रामस्तरांवर योजनेस प्रसिद्धी देणे अपेक्षित आहे. त्यानुसार कार्यवाही करण्यात येते असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

**शिफारस**

**३.२० सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी योजनेबद्दल जनजागृती करण्याचा अभाव यासंदर्भात आक्षेप नोंदविलेले असून या योजनेअंतर्गत जास्तीत जास्त लाभ मिळण्याच्यादृष्टीने या योजनेची व्यापक प्रसिद्धी करणे आवश्यक असताना त्यास पुरेशा प्रमाणात प्रसिद्धी देण्यात आली नव्हती. त्यामुळे पुरेशा प्रमाणात अर्ज प्राप्त होऊ शकले नाही. विभागीय प्रतिनिधींनी यामागे निधीची कमतरता हे दिलेले कारण निश्चितच समर्पक नाही. प्रसिद्धी हा या योजनेचा अविभाज्य भाग असल्यामुळे त्यासाठी निधीची तरतूद वा मागणी विभागाने करणे आवश्यक होते. अतः या प्रकरणी संबंधितांवर कारवाई करण्यात यावी तसेच भविष्यात अशा बाबींची पुनरावृत्ती टाळावी व योजनेस पुरेशी प्रसिद्धी देणेसंदर्भात आवश्यक ती उपाययोजना करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक २.१.३ " संनियंत्रण आणि मूल्यांकन "**

**परिच्छेद क्रमांक २.१.३.१ " अपर्याप्त संनियंत्रण "**

**अभिप्राय**

**३.२१** योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार योजनेंतर्गत खरेदी करण्यात आलेल्या सर्व जनावरांचे गावातील पशुवैद्यकीय इस्पितळांद्वारे (VHs) तिमाही प्रत्यक्ष पडताळणी करावी. पशुधन विकास अधिकारी आणि जिल्हा पशुसंवर्धन अधिका-यांनी खरेदी करण्यात आलेल्या जनावरांची अनुक्रमे वार्षिक २५ टक्के आणि १० टक्के पडताळणी करावी.पडताळणी संबंधात दस्तावेज ठेवावयास पाहिजे होते आणि वरिष्ठ प्राधिका-यांकडे, म्हणजेच VH ने पशुधन विकास अधिका-याकडे, पशुधन विकास अधिका-याने जिल्हा पशुसंवर्धन अधिका-याकडे आणि जिल्हा पशुसंवर्धन अधिका-याने RJC कडे सादर करावयास पाहिजे होते. VH ने जनावरांना आरोग्य विषयक आणि कृत्रिम रेतनाच्या सुविधा द्याव्या. VHs ने जनावरासंदर्भात स्वतंत्र नोंदवहीमध्ये माज दाखविल्याचा दिनांक, कृत्रिम रेतनाचा दिनांक, गर्भ तपासणीचा दिनांक व निष्कर्ष, गाय/म्हैस प्रसुती दिनांक, नर/मादी वासरु, जन्मतः वासराचे वजन, जनावरापासून मिळालेले वेतातील दूध उत्पादन, इत्यादीची नोंद ठेवावयास हवी होती.

परंतु १२ पशुधन विकास अधिका-यांतर्गत असलेल्या ११७ VHs पैकी फक्त पशुधन विकास अधिकारी, चंद्रपूर आणि नागभीडच्या २२ VHs नी प्रत्यक्ष पडताळणी केली आणि २०११-१६ या कालावधीचे अहवाल पशुधन विकास अधिका-यांकडे सादर केले. तसेच जनावरांच्या तपशीलाच्या नोंदी ठेवण्यासाठी स्वतंत्र नोंदवही ठेवली नव्हती. १२ पशुधन विकास अधिका-यांपैकी सहा पशुधन विकास अधिकारी, भंडारा, देसाईगंज, गडचिरोली, गोंदिया, लाखनी आणि तिरोडा यांनी २०११-१६ या कालावधीत जनावरांची प्रत्यक्ष पडताळणी केली नव्हती तर नागपूर आणि रामटेक मध्ये २०११-१३ या कालावधीत पडताळणी करण्यात आली नव्हती. सहा पैकी कोणत्याही जिल्हा पशुसंवर्धन अधिका-याने RJC ला प्रत्यक्ष पडताळणी अहवाल सादर केला नव्हता असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

**शिफारस**

**३.२२ सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी अपर्याप्त संनियंत्रण यासंदर्भात आक्षेप नोंदविलेले असून जनावर नोंदणीचे दस्तावेज ठेवण्यात न येणे, यासाठी स्वतंत्र नोंदवही ठेवण्यात न येणे तसेच यासंदर्भात अद्ययावत माहिती उपलब्ध न होणे ही बाब निश्चितच समर्थनीय नाही. विभागांतर्गत नियंत्रण कमकुवत असल्यामुळेच सदरहू परिच्छेदासंदर्भात अनेक प्रकारचे आक्षेप महालेखाकारांकडून नोंदविण्यात आलेले आहेत. योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार दर ३ महिन्यांनी योजनेंतर्गत खरेदी केलेल्या जनावरांचा पाठपुरावा करणे अपेक्षित होते. समितीने यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींना विचारणा केली असता यासंदर्भात आता पाठपुरावा करण्यात येत असून विविध योजनेंतर्गत वाटप केलेल्या जनावरांचे Asset Verification करण्यात आलेले आहे. तसेच संबंधित संस्थेच्या कार्यक्षेत्रात वाटप करण्यात आलेल्या जनावरांचा पाठपुरावा वा नोंदवही ठेवण्यात येत असून त्यात जनावरांच्या आरोग्याविषयी तसेच दुध उत्पादनाविषयी सुद्धा नोंदी घेण्यात येतात असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर केला. अतः या प्रकरणी अंतर्गत संनियंत्रण व पर्याप्त मुल्यांकन न करणा-या अधिका-यांवर कारवाई करण्यात यावी व भविष्यात अशा आक्षेपांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी विभागाचे अंतर्गत नियंत्रण व मुल्यांकन प्रभावी करण्यात यावे. त्याअन्वये विविध जनावरांसंदर्भातील माहिती अद्ययावतरित्या नोंद करून ठेवण्यात यावी. योजनेच्या अंमलबजावणीचा नियमित त्रैमासिक आढावा घेण्यात यावा व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**परिच्छेद क्रमांक २.१.३.२ “ योजनेचे मूल्यांकन न करणे ”**

**अभिप्राय**

**३.२३** लाभार्थ्यांना उत्पन्नाचे साधन उपलब्ध करून देणे हे या योजनेचे उद्दिष्ट होते. तथापि, विभागाजवळ या योजनेच्या माध्यमातून निर्माण झालेल्या उत्पन्नाचे मूल्यांकन करण्यासाठी कोणतेही कार्यतंत्र नव्हते. म्हणून लेखापरीक्षेस या योजनेतून प्राप्त झालेल्या लाभांचे निर्धारण करता आले नाही. याशिवाय आर्थिक वर्ष संपल्यानंतर दर सहा महिन्यांनी प्रत्येक विभागासाठी RJC, पशुसंवर्धन यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून या योजनेचे मूल्यांकन सदर समितीव्दारे करण्यासाठी आयुक्त जबाबदार होते आणि त्यांच्या अभिप्रायासह सदर योजनेचा मूल्यांकन अहवाल शासनास सादर करावयास हवा होता.

परंतु आयुक्तांनी योजनेचे मूल्यांकन करण्यासाठी नागपूर विभागामध्ये २०११-१६ या कालावधीत अशाप्रकारची कुठलीही समिती स्थापित केली नव्हती आणि म्हणूनच येथे योजनेचे मूल्यांकन झाले नव्हते असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, नागपूर यांनी संबंधित वर्षांमध्ये राबविलेल्या सदरच्या योजनेचे वर्ष संपल्यानंतर पुढील सहा महिन्यात मूल्यमापन केले नाही. याबाबत प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त, नागपूर यांनी कोणताही समाधानकारक खुलासा दिलेला नाही. तरी या त्रुटीसाठी संबधितास जबाबदार धरण्यात येत असून त्यांचेवर पुढील प्रशासकीय कारवाई करण्यात येईल असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

**शिफारशी**

**३.२४ (१) सदरहू परिच्छेदात महालेखाकारांनी योजनेचे मुल्यांकन न करणे यासंदर्भात आक्षेप नोंदविलेले असून लाभार्थ्यांना उत्पन्नाचे अतिरिक्त साधन उपलब्ध करून देणे हे या योजनेचे मूळ उद्दिष्ट असताना विभागाजवळ या योजनेच्या माध्यमातून निर्माण झालेल्या उत्पन्नाचे मुल्यांकन करण्यासाठी कोणतेही कार्यतंत्र नव्हते. त्यामुळे या योजनेतून प्राप्त झालेल्या लाभांचे निर्धारण करता आले नाही. यासाठी एक समिती नेमून योजनेचे मुल्यांकन करणे आवश्यक असताना त्याची देखील पुर्तता विभागाने केली नाही. यासंदर्भात समितीने विचारणा केली असता या प्रकरणी नागपूर येथील तत्कालिन सहआयुक्त हे यास जबाबदार असून त्यांचेकडून घेण्यात आलेला खुलासादेखील समाधानकारक नाही. ते २०१७ मध्ये सेवानिवृत्त झालेले आहेत. परंतु त्यांच्यावर ४ वर्षाच्या आत कारवाई करता येते. त्यामुळे १ महिन्यात त्यांचेवर कारवाई करण्यात येईल असे समितीस आश्वासित केले. त्याचप्रमाणे तात्काळ संबंधितांवर कारवाई करण्यात यावी, योजनेचे मुल्यांकन नियमितरित्या करण्यात यावे, त्यासाठी आवश्यक त्या समितीचे गठन करून त्याच्या बैठका नियमितरित्या घेण्यात याव्यात व अशा आक्षेपांची पुनरावृत्ती टाळावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**३.२५ (२) महाराष्ट्र शासनाच्या पशुसंवर्धन विभागाने विशेष घटक योजना (Special Component Plan-SCP) त्याचप्रमाणे आदिवासी क्षेत्र उपयोजना (Tribal Sub Plan-TSP) व आदिवासी क्षेत्राबाहेरील उपयोजने (OTSP) अंतर्गत ‘अनुसूचित जाती आणि जमातींच्या लाभार्थ्यांना स्वयंरोजगाराद्वारे उत्पन्नाचे साधन उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने**

दोन दुभत्या जनावरांचे गट (गाई/म्हशी) वाटप करणे या योजनेची सुरुवात केली (नोव्हेंबर, २०११). लाभार्थ्यांची निवड करण्याची पद्धत, निधीचे वाटप व वापर आणि लाभार्थ्यांव्दारे प्राप्त करण्यात आलेले लाभ यांचे मुल्यांकन करण्यासाठी लेखापरीक्षण करण्यात आले. लेखापरीक्षेस असे आढळले की निश्चित केलेल्या जास्तीत जास्त लाभार्थ्यांना योजनेत समाविष्ट करून घेण्यासाठी पर्याप्त निधीची मागणी करण्यात आली नव्हती, ज्यामुळे ७२ टक्के वैध अर्जदार योजनेच्या लाभापासून वंचित राहिले. जिल्हा प्राधिका-यांनी योजना राबविण्यासाठी निधीची मागणी न केल्यामुळे गडचिरोली आणि चंद्रपूर जिल्ह्यांत (आदिवासी बहुल) योजनेच्या व्याप्तीपासून आदिवासी लोकांना दूर ठेवण्यात आले. प्रशासकीय प्रक्रियेच्या कामात विलंब झाल्यामुळे जनावरांची खरेदी आणि वाटप यात ४ ते ११ महिन्यांचा विलंब झाला. जास्त वय झालेल्या जनावरांची खरेदी करण्यात आली आणि लाभार्थ्यांव्दारे जनावरांची विक्री केली तसेच विहित मुदतीत निर्धारीत लोकांच्या नावे विमा घेण्यात आला नसल्याच्या घटनाही निदर्शनास आल्या. सर्व स्तरावर संनियंत्रण अपर्याप्त होते. योजनेपासून पुरविण्यात येणा-या लाभांचे मूल्यांकन करण्यासाठी कोणतेही प्रयत्न करण्यात आले नाहीत. वरील उणीवांमुळे असे निदर्शित होते की योजनेची अंमलबजावणी प्रभावी नव्हती आणि म्हणूनच शासनाने योजनेच्या अंमलबजावणी आणि संनियंत्रण पद्धतीचे मूल्यांकन करण्याची आवश्यकता आहे. लेखापरिक्षणामध्ये नमूद केलेल्या आक्षेपांचा गांभिर्याने विचार करून यापुढे योजनेच्या अंमलबजावणीमध्ये अशा स्वरुपाच्या त्रुटी राहणार नाहीत याची दक्षता घेण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.२६ (३) याअनुषंगाने जनावरांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाच्या मुद्याकडे समिती लक्ष वेधू इच्छिते. राज्यात अनेक ग्रामीण भागात पशुवैद्यकीय अधिका-यांचा असलेला तुटवडा, रिक्त पदे, लसींचा तुटवडा इ. अनेक कारणास्तव जनावरांना वेळेत वैद्यकीय उपचार, औषधे व लसीकरण उपलब्ध होत नाही. ज्यामुळे जनावरे दगावण्याची संख्या मोठ्या प्रमाणात आहे. लसीची खरेदी प्रक्रिया विहित मुदतीत व नियमानुसार होण्याच्यादृष्टीने व त्यासाठी आवश्यक तो निधी तातडीने प्राप्त होण्यासाठी जिल्हा परिषद व राज्य शासन यांच्यामध्ये योग्य तो समन्वय साधून कालबद्ध पद्धतीने योग्य ती प्रक्रिया राबविण्यात यावी. जनावरांना लस व औषध पुरवठा विनाविलंब व नियमितरित्या करण्यात यावा, रिक्त पदे तातडीने भरण्यात यावीत व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

३.२७ (४) महालेखाकारांनी पशुसंवर्धन विभागाबाबत नोंदविलेल्या सर्व परिच्छेदांची समितीने सखोल छाननी केली असता अनेक परिच्छेदांमध्ये लाभार्थ्यांनी भरावयाची २५ टक्के हिश्श्याची रक्कम न भरल्यामुळे योजनेची प्रभावी अंमलबजावणी होऊ शकली नाही असे दिसून आले. वास्तविक सदरहू योजना ही अनुसूचित जाती, जमातीतील व दारिद्र्यरेषेखालील लोकांसाठी राबविण्यात आली आहे. शासनस्तरावरुन ज्या अनेक योजना राबविण्यात येतात, त्यामध्ये मात्र मागासवर्गीय लाभार्थ्यांकडून २५ टक्के हिश्श्याची रक्कम घेण्यात येत नाही. तर खुल्या संवर्गातील लोकांकडून ती घेण्यात येते. अनेक ठिकाणी ही २५ टक्के हिश्श्याची रक्कमदेखील भरण्याची आर्थिक परिस्थिती या लाभार्थ्यांची नसल्यामुळे निकषानुसार पात्र ठरत असताना केवळ हिश्श्याची २५ टक्के रक्कम भरण्यास असमर्थ ठरल्यामुळे योजनेच्या प्रस्तावित लाभांपासून हे लाभार्थी वंचित राहतात. लाभार्थ्यांमध्ये अनेक व्यक्ती रोजंदारीवर वा शेतमजूर म्हणूनदेखील काम करीत असतात. तसेच काही लाभार्थी भूमिहीन देखील असतात. त्यांना मिळणारे उत्पन्नच अत्यंत अल्प असताना २५ टक्के रक्कम भरण्याची त्यांची आर्थिक कुवत नसते. शासनाच्या ब-याच योजनांमध्ये ५ ते १० टक्के हिश्श्याची रक्कम घेण्यात येते. अशा परिस्थितीत दारिद्र्यरेषेखालील मागासवर्गीय लोकांकडून त्यातही ते भूमिहीन असताना त्यांचेकडून २५ टक्के हिश्श्याची रक्कम घेणे ही फार जास्त ठरते. शासनाकडून मागासवर्गीयांसाठी राबविण्यात येणा-या अनेक कल्याणकारी योजनांचा लाभ जास्तीत जास्त पात्र लाभार्थ्यांना मिळण्यासाठी योजनेची कार्यपद्धती व नियम विभागाने अत्यंत कडक करावेत. मात्र योजनेचे निकष हे सर्वसमावेशक व वाजवी असणे आवश्यक आहे. अशाप्रकारे २५ टक्के हिश्श्याची रक्कम कमी करून ती १० टक्के करण्यात यावी, जेणेकरून जास्तीत जास्त पात्र लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळण्याबाबत संधी मिळेल, विभागाने ह्याप्रमाणे कार्यवाही करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

## ग्रामविकास व जलसंधारण (ग्रामविकास) विभाग

**४.१** भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१५-१६ या वर्षाच्या स्थानिक संस्था अहवालातील परिच्छेद क्र. २.२ "कायमस्वरुपी विक्रीकेंद्राच्या बांधकामावर निष्फळ खर्च" यासंदर्भात महालेखाकारांनी खालील अभिप्राय व्यक्त केले :-

| अ. क्र. | परिच्छेद | सविस्तर स्पष्टीकरण | महालेखाकार कार्यालय, मुंबई यांचे अभिप्राय | महालेखाकार कार्यालय, मुंबई यांचे अभिप्रायावर विभागाचे स्पष्टीकरण |
|---|---|---|---|---|
| १. | **ग्रामिण कारागीराव्दारे उत्पादित वस्तुंच्या पणनासाठी तालुका स्तरावर कायमस्वरुपी विक्री केंद्रांच्या बांधकाम योजनेत निकृष्ट नियोजन आणि अंमलबजावणी यामुळे रु.१४.५८ कोटींचा खर्च निष्फळ ठरला आणि रु.३३.६५ कोटीचा निधी तीन ते सात वर्ष अडकून पडला होता.**<br>पर्याप्त क्षमता, पणन बुध्दिमत्ता आणि वाटाघाटी कौशल्याच्या अभावामुळे ग्रामीण कारागीरांना बाजारपेठेची सुविधा उपभोगण्यासाठी साधन उपलब्ध नाहीत. ग्रामीण उत्पादित वस्तूंच्या पणनास प्रोत्साहन देण्यासाठी आणि ग्रामीण गरीबांचा सामाजिक-आर्थिक विकास वर्धन करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने स्वयंसहाय्यता गटाला (SHGs) बाजारपेठेची सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी कायमस्वरुपी विक्री केंद्रांचे (PSCs) बांधकाम करण्याची योजना आखली (फेब्रुवारी २००९) या योजनेनुसार, राज्यात एकूण रु.४५/- कोटी खर्चून (रु.२५ लाख प्रति PSC), तीन वर्षाच्या कालावधीत (फेब्रुवारी २०१२) तालुका स्तरावर १८० PSCs बांधावयाचे होते. हया योजनेची अंमलबजावणी जिल्हा ग्रामीण विकास अभिकरणांव्दारे (DRDAs) करावयाची होती.<br>ग्राम विकास विभागातील (विभाग) योजनेच्या दस्तावेजांची तपासणी केली (फेब्रुवारी २०१६) असता खालील आढळून आल्या .<br>• जमीन उपलब्ध नसल्यामुळे फेब्रुवारी २०१७ | स्वयंसहाय्यतागट स्वरोजगारी यांनी तयार केलेल्या वस्तूंना हक्काची बाजारपेठ मिळण्याकरीता राज्य शासनाने तालुकास्तरीय विक्री केंद्र बांधणे ही योजना सन २००९ पासून सुरू करण्यात आली. तालुका विक्री केंद्र बांधण्याकरीता प्रति तालुका विक्री केंद्र रू. २५.०० लक्ष असा मंजूर करण्यात आला. परंतु तालुका विक्री केंद्र बांधण्याकरीता जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडे जागा उपलब्ध होत नसल्याने प्रस्तावित तालुका विक्री केंद्राची काही कामे विहित कालावधीत सुरू झाली नाही.<br>दरम्यान बांधकामाचे दर वाढल्याने रू. २५.०० लक्ष इतक्या मर्यादित निधीत मंजूर आराखडयाप्रमाणे बांधकाम करणे शक्य झाले नाही. ही बाब विचारात घेता शासन निर्णय दिनांक २४.११.२०१० अन्वये स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना पायाभूत सुविधा अंतर्गत रू. २५.०० लक्ष इतका अतिरिक्त निधी तालुका विक्री केंद्र बांधकामाकरीता उपलब्ध करून देण्यात आला. त्यामुळे तालुका विक्री केंद्र बांधकामाकरीता रू. ५०.०० लक्ष इतका निधी प्राप्त झाला. त्यानुसार राज्यात आतापर्यंत ३९ तालुका विक्री केंद्राचे प्रत्यक्ष बांधकाम पूर्ण झालेले आहे. तसेच ४० ठिकाणी तालुका केंद्राचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. परंतु सातत्याने बांधकामाच्या खर्चात वाढ होत असल्याने मंजूर असलेल्या उर्वरित ठिकाणी बांधकाम करणे शक्य | Following information may be furnished in the reply to PAC.<br>1. Whether the necessary facilities have been provided to the 30 completed PSCs?<br>2. Status of the 40 on-going works.<br>3. Construction of 101 PSCs were not commenced due to non-availability of land. What efforts were made by the Department to obtain land in these cases?<br>4. Proposal to allot Sales cenres on rental basis is not clear and be explained. | **मुद्दा क्रमांक १** :- मंजुर करण्यात आलेल्या १८० तालुका विक्री केंद्रापैकी बांधकाम पूर्ण झालेल्या तालुका विक्री केंद्राची संख्या ३९ वरून ५५ इतकी झाली आहे. तथापि सदर तालुका विक्री केंद्रामध्ये फर्निचर व इतर आवश्यक सोयीसुविधा नसल्याने दुकान गाळयांचे वाटप बचत गटांना करण्यात आलेले नाही. सदर तालुका विक्री केंद्राना वितरीत करण्यात आलेला निधी खर्च झालेला असल्यामुळे फर्निचर व इतर आवश्यक सोयी सुविधेसाठी अतिरिक्त निधीची आवश्यकता आहे. याकरीता आवश्यक निधीबाबतचा प्रस्ताव नियोजन व वित्त विभागास पाठविण्यात आला आहे.<br>**मुद्दा क्रमांक-२** :- बांधकाम अपूर्ण असणा-या तालुका विक्री केंद्राची संख्या ४० इतकी होती. त्यापैकी १६ तालुका विक्री केंद्राचे बांधकाम पूर्ण झालेले असून सद्यस्थितीत २४ तालुका विक्री केंद्राचे बांधकाम अपूर्ण आहे. सदर तालुका विक्री केंद्राना जागा उपलब्ध होण्यासाठी झालेला विलंब त्यामुळे दरम्यानच्या काळात वाढलेला इमारत बांधकाम DSR यामुळे सदर तालुका विक्री केंद्राचे |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | पर्यंत १८० PSCs पैकी १०१ PSCs च्या बांधकामाला सुरुवात झाली नव्हती. तसेच फेब्रुवारी २०१७ पर्यंत उर्वरीत ७९ PSCs पैकी फक्त ३९ PSCs चे बांधकाम पूर्ण झाले होते आणि ४० PSCs चे बांधकाम पूर्ण व्हावयाचे होते. पूर्ण झालेल्या ३९ PSCs पैकी फक्त ९ PSCs चे वाटप करण्यात आले होते आणि उर्वरीत ३० PSCs चे वाटप संरक्षक भिंतीचे बांधकाम, विद्युत पुरवठयाची आणि पाण्याची जोडणी इत्यादी न झाल्यामुळे करता येऊ शकले नव्हते (फेब्रुवारी २०१७).<br>• वाटप करण्यात आलेल्या नऊ PSCs पैकी, चार PSCs चे लेखापरीक्षेने विभागीय कर्मचा-यांसोबत संयुक्त तपासणी केली असता असे आढळून आले की, त्यापैकी तीन SHGs ना वाटप केले नव्हते. त्या PSCs कार्यालय, बँक आणि बैठक सभागृहे म्हणून वापरण्यात येत होत्या. फक्त एकाचा वापर SHG व्दारे करण्यात येत होता.<br>• विभागाने १८० तालुका स्तरीय PSCs च्या बांधकामासाठी ऑगस्ट २००९ ते फेब्रुवारी २०१४ दरम्यान DRDAs ना रु.६४.१२ कोटीचा निधी वितरीत करण्यात आला. ३९ PSCs पूर्ण करण्यासाठी DRDAs नी रु.६४.१२ कोटीपैकी रु.१६.७४ कोटी खर्च केले आणि ४० PSCs च्या प्रगतीपथावरील कामासाठी रु.१३.७३ कोटी खर्च केले. १०१ कामासंबंधीत (ज्याची सुरुवात झाली नव्हती) उर्वरीत रु.३३.६५ कोटी, फेब्रुवारी २०१७ पर्यंत तीन वर्ष ते सात वर्षाच्या कालावधीसाठी DRDAs कडे पडून होते.<br>राज्य शासनाने वस्तुस्थिती मान्य करत असे सांगितले कि (जानेवारी २०१७), आवश्यक सुविधा पुरविल्यानंतर पूर्ण झालेले ३० PSCs लवकरच वापरण्यात येतील आणि १०१ कामांसाठी उपलब्ध | होत नाही. तसेच बांधकाम प्रगतीपथावर असलेले विक्री केंद्रांच्या बांधकामावर सुद्धा वाढीव खर्चाचा परिणाम होत आहे.<br>यासंदर्भात दिनांक १८.०५.२०१६ व दिनांक ०६.०६.२०१६ रोजी तत्कालीन मा. राज्यमंत्री, ग्रामविकास यांचे अध्यक्षतेखाली प्रगतीपथावर असलेली तालुका विक्री केंद्र पूर्ण होण्याच्या अनुषंगाने बैठक आयोजित करण्यात आलेली होती. तदनंतर या विषया संदर्भात मा. मंत्री महोदय, ग्रामविकास यांचे अध्यक्षतेखाली दिनांक २४ ऑगस्ट, २०१६ रोजी विभागातील कामकाजाबाबत आयोजित केलेल्या आढावा बैठकीमध्ये सध्या जी तालुका विक्री केंद्रे अद्याप सुरू झालेली नाहीत ती रद्द करण्यात यावीत व त्यांच्यासाठी असलेला निधी प्रगतीपथावर असलेल्या तालुका केंद्रासाठी वापरण्यात यावा. तसेच सदर विक्री केंद्रे लवकरात लवकर सुरू होण्याच्या दृष्टीने मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या स्तरावर आढावा घेण्याबाबत निर्णय झालेला आहे.<br>मा. मंत्री, ग्रामविकास यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ११.०९.२०१७ रोजी कायमस्वरूपी तालुका विक्री संदर्भात बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत तालुका विक्री केंद्र संदर्भात झालेल्या चर्चेनुसार धोरणात्मक निर्णय घेण्यात आला.<br>त्यानुसार विभागामध्ये जागेअभावी व इतर कारणास्तव बांधकाम करणे शक्य नसलेल्या तालुका विक्री केंद्राकरीता असलेला उपलब्ध निधी व त्यावरील व्याज अपूर्ण बांधकाम असलेल्या तालुका विक्री केंद्र व जागा उपलब्ध असल्यास नव्याने बांधकाम करावयाच्या तालुका विक्री केंद्राच्या बांधकामासाठी वापरण्याबाबतचा प्रस्ताव तयार करावा. सदर प्रस्तावामध्ये | | बांधकाम शासनाने वितरीत केलेल्या निधीमध्ये पूर्ण होवू शकले नाही. या तालुका विक्री केंद्राना वितरीत करण्यात आलेला निधी खर्च झालेला आहे. त्यामुळे सदर तालुका विक्री केंद्रांच्या इमारतीचे अपूर्ण बांधकाम पूर्ण करण्यासाठी अतिरिक्त निधीची आवश्यकता आहे. याकरीता आवश्यक निधीबाबत प्रस्ताव नियोजन व वित्त विभागास पाठविण्यात आला आहे.<br>**मुद्दा क्रमांक-३ :-** सदयस्थितीत २१ तालुका विक्री केंद्राचे बांधकामाकरीता जागा उपलब्ध आहे. व सदर तालुका विक्री केंद्रांचे शासनाकडून निश्चित करण्यात आलेल्या टाईप प्लान प्रमाणे बांधकाम करावयाचे झाल्यास याकरीता प्रती तालुका विक्री केंद्राकरीता साधारणत: रू. ९० ते ९५.०० लक्ष इतका खर्च अपेक्षित आहे. त्यामुळे सदर तालुका विक्री केंद्राच्या अंदाजपत्रकांना सार्वजनिक बांधकाम विभागाची तांत्रिक मान्यता घेवून अतिरिक्त निधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे.<br>उर्वरित ८० ठिकाणी विविध कारणास्तव तालुका विक्री केंद्राचे बांधकाम सुरू करण्यात आलेले नाही. सदर तालुका विक्री केंद्राकरीता उपलब्ध असलेला निधी प्रगतीपथावरील अथवा जागा उपलब्ध असलेल्या व बांधकाम करावयाच्या तालुका विक्री केंद्राना वापरण्याबाबत प्रस्तावित आहे. याकरीता आवश्यक |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | असलेला निधी, ४० प्रगतीपथावरील कामांसाठी वापरला जाईल.<br>अशाप्रकारे, तालुका स्तरावर कायमस्वरुपी विक्री केंद्रांच्या बांधकाम योजनेचे निकृष्ट नियोजन आणि अंमलबजावणीमुळे ३३ पूर्ण झालेल्या PSCs वर झालेला रु.१४.५८ कोटींचा खर्च निष्फळ ठरला आणि रु.३३.६५ कोटीचा निधी तीन ते सात वर्ष अडकून पडला ज्यामुळे स्वंय- सहाय्यता गटाला उपलब्ध करुन देण्याचा उद्येशसुध्दा विफल झाला. | आवश्यक असणारा निधी शिल्लक निधीपेक्षा जास्त असल्यास अतिरिक्त निधीची मागणी करावी.<br>तसेच महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत (MSRLM) बचत गटांचे सक्षमीकरण करण्यात येत असून त्यांना तालुका व जिल्हास्तरावर प्रशिक्षण दिले जाते. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांनी सदर तालुका विक्री केंद्राचा जागा विना वापर पडून रहात असल्याने कार्यालयासाठी, बचत गटांच्या प्रशिक्षणासाठी व बचत गटाच्या उत्पादित मालाच्या विक्री व्यवस्थेसाठी भाडेतत्वावर उपलब्ध करून देण्याबाबत विनंती केली.<br>याअनुषंगाने चर्चा होऊन सद्यस्थितीत पूर्ण बांधकाम झालेले व आवश्यक सुविधा (विदयुतीकरण, पाणी पुरवठा, स्वच्छतागृह, संरक्षण भिंत इ.) तालुका विक्री केंद्र महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM) यांना भाडेतत्वावर उपलबध करून देण्याबाबत बैठकीमध्ये निर्णय घेण्यात आला.<br>त्याअनुषंगाने राज्यातील सर्व तालुका विक्री केंद्राची माहिती एकत्रित करण्यात येत असून सदर माहिती प्राप्त झाल्यानंतर प्रस्ताव एकत्रित करून मान्यतेसाठी नियोजन व वित्त विभागास सादर करण्यात येईल. | | निधीबाबत प्रस्ताव नियोजन व वित्त विभागास पाठविण्यात आला आहे.<br>**मुद्दा क्रमांक-४ :-** सद्यस्थितीत पूर्ण बांधकाम झालेले व आवश्यक सुविधा (विदयुतीकरण, पाणी पुरवठा, स्वच्छतागृह, संरक्षण भिंत इ.) तालुका विक्री केंद्र महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM) यांना भाडेतत्वावर उपलब्ध करून देण्याबाबत मा. मंत्री, ग्रामविकास यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ११.०९.२०१७ रोजी झालेल्या बैठकीमध्ये निर्णय घेण्यात आला.<br>तथापि बांधकाम पूर्ण झालेल्या तालुका विक्री केंद्रामध्ये आवश्यक सोयी सुविधा प्रथम करून देणे आवश्यक असल्याने याबाबत निधीची मागणी नियोजन व वित्त विभागास करण्यात आलेली आहे. सदर तालुका विक्री केंद्रामध्ये आवश्यक सोयी सुविधा उपलबध झाल्यानंतर शासन निर्णय दिनांक २७.०२.२००९ अन्वये महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंच्या विक्रीसाठी रोटेशन पद्धतीने जास्तीत जास्त २ आठवडे कालावधी पर्यंत तालुका विक्री केंद्रातील गाळे उपलब्ध करून देण्यात येतील. |

**साक्ष :—**

**५.१** भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१५-१६ च्या स्थानिक संस्था अहवालातील **परिच्छेद क्रमांक २.२ " कायमस्वरूपी विक्री केंद्राच्या बांधकामावर निष्फळ खर्च "** या परिच्छेदासंदर्भात अधिक माहिती जाणून घेण्यासाठी ग्रामविकास व जलसंधारण (ग्रामविकास) विभागाचे प्रधान सचिव तसेच विभागीय प्रतिनिधींची दिनांक १० जून, २०१९ रोजी समितीने साक्ष घेतली.

**परिच्छेद क्रमांक २.२ : कायमस्वरुपी विक्री केंद्राच्या बांधकामावर निष्फळ खर्च**

साक्षीच्या वेळी उक्त परिच्छेदाच्या अनुषंगाने माहिती द्यावी, असे समितीने सूचित केले असता, हा ग्रामविकास विभागाचा तालुका विक्री केंद्राचा विषय आहे. एकूण १८० तालुका विक्री केंद्र बांधण्याचे ठरविले होते. त्यांची जवळपास २५ लक्ष किंमत होती. त्यापैकी ५५ पूर्ण झाली. २४ चे बांधकाम प्रगतीवर आहे. बांधकाम सुरू न झालेली १०१ आहेत, असे विभागीय सचिवांनी विदित केले.

२४ व ५० मिळून ७४ होतात, असे समितीने निदर्शनास आणले असता, २१ चे तालुका केंद्रांचे काम जागा नाही किंवा अन्य कारणांमुळे आतापर्यंत सुरू झालेले नाही. परंतु, तेथे तालुका विक्री केंद्र बांधण्यात यावे, अशी लोकप्रतिनिधींची मागणी आहे. अशा १०० तालुका विक्री केंद्रांची मागणी आहे. १८० पैकी ८० तालुका विक्री केंद्र विभाग बांधणारच नाही. ही फारच जुनी योजना आहे. त्यावेळेस २५ लाखांमध्ये तालुका विक्री केंद्राचे बांधकाम होत होते आता ते होत नाही त्यामुळे विभागाने नियोजन विभागाकडे एक प्रस्ताव सादर केला होता की, जी ८० तालुका विक्री केंद्रे विभाग बांधणार नाही त्यांचे पैसे विभागाकडे आहेत. ती ८० विक्री केंद्रे विभागाला रद्द करण्याची परवानगी द्यावी. त्यांचे पैसे डायव्हर्ट करून इतर तालुका विक्री केंद्रे पूर्ण करण्याचा विभागाचा मानस आहे, असे विभागीय सचिवांनी विदित केले.

तालुका विक्री केंद्राच्या बांधकामाची किंमत पूर्वी २५ लाख रुपये होती. ती ५० लाख झालेली आहे. चांदुर रेल्वे येथे ५० लाख रुपयांचे तालुका विक्री केंद्र बांधलेले आहे, ही बाब समितीने निदर्शनास आणली असता, त्याची किंमत २५ लक्ष होती, याबाबत पडताळणी करण्यात येईल, असे विभागीय सचिवांनी विदीत केले.

५० लाख रुपयांचे तालुका विक्री केंद्र बांधलेले आहे. तालुका विक्री केंद्राचे बांधकाम ५० लाख रुपयांतच होत होते ना? सुरुवातीला ही योजना २५ लाखांची होती. विभागाने १८० तालुका विक्री केंद्रासाठी ४५ कोटी रुपये नियोजित केले होते. त्यानंतर याची किंमत वाढली तर २५ लाख रुपये इतर योजनेंतर्गत मिळून गेले व ५० लाखांचे बांधकाम सुरू केले. २५ लाखांमध्ये किती तालुका विक्री केंद्र बांधली, ५० लाखांमध्ये किती तालुका विक्री केंद्र बांधली? विभाग सांगत आहे की, उर्वरित नवीन तालुका विक्री केंद्रांकरिता ९५ लाख रुपये लागतील. त्यामुळे या निधीचे पूर्ण नियोजन कसे होणार आहे ? तसेच, विभागाने हे देखील सांगितले आहे की, ८० तालुका विक्री केंद्र बांधणार नाही. १०० तालुका विक्री केंद्र बांधणार आहे. त्यामध्ये २५ लाखांची किती, ५० लाखांची किती व बाकीचे नियोजन कसे केले जाणार आहे, याबाबतची थोडी सविस्तर माहिती दिली तर योग्य होईल, असे समितीने सूचित केले असता, सुरुवातीला जी ३९ तालुका विक्री केंद्र पूर्ण झाली ती, २५ लाखाच्या दरम्यान पूर्ण झाली. या आकडेवारीमध्ये १-२ पुढे-मागे असतील तर ती माहिती लेखी देऊ. त्यानंतर पैसे वाढवून दिले व ५५ लाखांपर्यंत पूर्ण केली. आज २४ तालुका विक्री केंद्रांचे काम प्रगतीपथावर आहे, असे विभागीय सचिवांनी विदीत केले.

ती किती रुपयांमध्ये पूर्ण होणार आहेत ? ५० लाख रुपयांची मर्यादा आहे, ही बाब समितीने निदर्शनास आणली असता, त्याकरिता आणखी पैसे लागणार आहेत, त्यासाठी व ज्या २१ तालुका विक्री केंद्रांची मागणी आतापर्यंत कायम आहे ती करावयाची आहेत. ८० तालुका विक्री केंद्र रद्द केली त्यासाठी जे पैसे मंजूर केले होते, ते पैसे पूर्णपणे रद्द करून त्या पैशातून जी ४५ तालुका विक्री केंद्रे करावयाची राहिलेली आहेत ती पूर्ण होऊ शकतील. ज्यावेळेस हे विभागाच्या लक्षात आले त्यावेळेस जवळपास १ वर्षापूर्वी विभागाने याबाबतचा प्रस्ताव नियोजन विभागाकडे सादर केलेला आहे. नियोजन विभागाने तो नामंजूर करून पाठविला आहे. त्यांनी काढलेला आक्षेप विभागाने पूर्ण केलेला आहे. त्यांचे सर्वसाधारणपणे मत असे दिसते की, विभागाने हे सर्व पैसे सरेंडर करावेत व विभागाने नव्याने बजेट करून नव्याने पैसे घेऊन हे पूर्ण करावे, असे विभागीय सचिवांनी विदीत केले.

तालुका विक्री केंद्रामध्ये महिला बचत गटांनी बनविलेली उत्पादने आणली पाहिजेत हा उद्देश होता. रस्त्यावर किंवा पंचायत समितीच्या आवारात विक्रीकरिता जावे न लागता त्यांना एक पक्की बाजारपेठ मिळाली पाहिजे त्याकरिता एक पक्की इमारत व्हावी हा या विक्री केंद्र उभारण्या मागचा उद्देश होता. समितीने सुरुवात केली त्यावेळेस त्याकरिता २५ लाखांची तरतूद होती. ते झाले नाही. जागा उपलब्ध झाली नाही. ३ तालुक्यांपैकी २ ठिकाणी समितीने इमारती बांधल्या. १ इमारत मोक्याच्या जागेवर झाली तर तेथे इलेक्ट्रिफिकेशनकरिताचे पैसे नव्हते त्यामुळे ते २ वर्षे लांबले. मग अडीच लाख रुपयांची तरतूद जिल्हा निधीतून केली. इलेक्ट्रिफिकेशन केले. पाणी पुरवठा दिला. बचत गटाच्या महिला तेथे उत्पादन विक्री करू लागल्या परंतु, एवढ्या मोक्याच्या जागेवर असतानाही त्यांना तालुकास्तरावर ग्राहक मिळत नव्हते. धामणगाव तालुक्यामध्ये एका ठिकाणी बांधले मात्र तेथील पंचायत समिती किंवा तहसिल किंवा तेथे असलेल्या सरकारी कार्यालयामध्ये जागा न मिळाल्याने एका ले-

आऊटच्या ओपन स्पेसमध्ये ते बांधण्यात आले. तेथे तर कुणीच येत नाही. तेथे कुलप लागलेले आहे. तालुका विक्री केंद्राची संकल्पना अतिशय चांगली आहे. आता विभाग त्याकरिता ९५ ते ९९ लाख रुपयांचा खर्च करेल. परंतु, त्याकरिता मार्केट मधील मोक्याची जागा किंवा पंचायत समिती, तहसीलच्या आवारातील जागा मिळाली नाही तर, तेथे कोणीही ग्राहक येत नाही. It will be used as a godown. विभागाने जे काम आतापर्यंत सुरू केले नाही त्याबाबत समितीची अशी भावना आहे की, जवळ असलेल्या बाजारपेठे मध्ये जागा उपलब्ध असेल तर तेथे तालुका विक्री केंद्र बांधावे नाही तर सर्व गोदामे बांधून घ्या. शॉपिंग कॉम्प्लेक्स बांधू नका, असे समितीने सूचित केले असता, १०१ तालुका विक्री केंद्राचे काम अजिबात सुरूच झालेले नाही. त्या १०१ पैकी स्थानिक लोकप्रतिनिधींची २१ ची मागणी आहे, असे विभागीय सचिवांनी विदित केले.

The site selection should be proper. एकदा टेंडर दिले तर त्याची किंमत आणखी वाढेल असे होता कामा नये. पूर्ण नियोजन करूनच करावे. १८० विक्री केंद्राकरिता विभागाने जेवढ्या निधीची तरतूद केली, त्यातून १०० तालुका विक्री केंद्रेही पूर्ण होणार नाहीत. इतर योजनेतून विभागाला पैसे घ्यावे लागतील, असे मत समितीने व्यक्त केले असता, काही लक्ष रुपये विभागाला एस.जी.एस.वाय. (स्वर्णजयंती ग्राम स्वयंरोजगार योजना) मधून मिळत होते. जेव्हा कंपनी सुरू झाल्या तेव्हा विभागाने स्टेट बजेट मधून पैसे देण्यास सुरुवात केली, असे विभागीय सचिवांनी विदित केले.

विभागाचे नियोजन २५ लाखांचे होते, ते ५० लाख झाले, ५० लाखांचे ९५ लाख झाले विभागाने त्याला आणखी वाढवून नाही दिले तर हे वेस्टेज आहे. मोक्याच्या जागेवर बांधून दिले तरी बाजारपेठ मिळत नाही. यामध्ये किती रुपये खर्च झाले, कोणत्या टप्प्यावर आता बांधकाम आहे, ७५, ४० व ३९ तालुका विक्री केंद्रांबाबत माहिती देण्यास समितीने सूचित केले असता, ५५ तालुका विक्री केंद्र पूर्ण झाली आहेत, २४ प्रलंबित आहेत. २१ ची मागणी प्रलंबित आहे, असे विभागीय सचिवांनी विदित केले. □

ज्या २१ तालुका विक्री केंद्रांची मागणी प्रलंबित आहे, त्या २१ तालुका विक्री केंद्रांबाबत समितीची सूचना अशी आहे की, विभागाने साईट सिलेक्शन बाजारपेठेमध्ये करावे. नाही तर हे सर्व गोदाम किंवा कोणत्या तरी ऑफिसकरिता विभागाला वापरावे लागेल. याला शॉपिंग कॉम्प्लेक्स वापरण्यात येऊ नये समितीला ही देखील माहिती द्यावी की, जे ७९ तालुका विक्री केंद्र विभाग पूर्ण करणार होता त्यामध्ये फंडिंग पॅटर्न कशी होती, किती रुपये विभागाला दुस-या योजनेखाली मिळाले, विभागाच्या योजनेतून विभागाला किती रुपये द्यावे लागले व २५ लाखांमध्ये किती विक्री केंद्र झाली ? विभागाने दिलेल्या माहितीमध्ये असे नमूद केले आहे की, पूर्ण बांधकाम झालेले व आवश्यक सुविधा तालुका विक्री केंद्र महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान यांना भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देण्याबाबत माननीय ग्रामविकास मंत्री यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ११.०९.२०१७ रोजी झालेल्या बैठकीमध्ये निर्णय घेण्यात आला. तथापि, बांधकाम पूर्ण झालेल्या तालुका विक्री केंद्रामध्ये आवश्यक सोयी सुविधा प्रथम करून देणे आवश्यक असल्याने याबाबत निधीची मागणी नियोजन व वित्त विभागास करण्यात आलेली आहे. सदर तालुका विक्री केंद्रामध्ये आवश्यक सोयी सुविधा उपलब्ध झाल्यानंतर शासन निर्णय दिनांक २७.०२.२००९ अन्वये महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या वस्तूंच्या विक्रीसाठी रोटेशन पद्धतीने जास्तीत जास्त २ आठवडे कालावधी पर्यंत तालुका विक्री केंद्रातील गाळे उपलब्ध करून देण्यात येतील." हे सर्व काम कधी होणार आहे ? अशी पृच्छा समितीने केली असता, इमारतीचे सिव्हिल वर्क पूर्ण झाले आहे. तथापि, संपूर्ण जागेवर इलेक्ट्रिक आणि इतर थोडे काम शिल्लक राहिलेले आहे, असे विभागीय सचिवांनी विदीत केले.

प्रलंबित राहिलेले काम लवकरात लवकर पूर्ण करण्यात यावे, अशी समितीने सूचना केली असता, सद्य :स्थितीमध्ये पूर्ण झालेले बांधकाम व आवश्यक सुविधा एमएसआरएलएमकडे (महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान) हस्तांतरित करावयाचे आहे, अशा प्रकारचा प्रस्ताव विभागाकडून तयार करण्यात येत आहे. कारण एमएसआरएलएमकडे (महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान) महिला बचतगटाचे नियोजन आहे. त्यांच्याकडे एविशेटीव्ह फंड आहे. नवी मुंबईमध्ये ग्रामविकास भवन आहे. त्याठिकाणी तालुका विक्री केंद्र सुरू करण्यात आलेले आहे. ते केंद्र १५ दिवसांच्या रोटेशनने एसएसजींना ॲलॉट करण्यात येते. परंतु ही योजना पूर्णपणे यशस्वी नाही. कारण ती जागा लांब अंतरावर आहे. त्याठिकाणी केवळ खाद्यपदार्थांची विक्री केली जाते. परंतु इतर उत्पादनांसाठी मागणी नाही. त्यामुळे सध्या जे बांधकाम आहे त्या अवस्थेमध्ये एमएसआरएलएमकडे हस्तांतरीत करावे आणि त्यांच्याकडे असलेल्या निधीमधून ती इमारत वापरण्यायोग्य करावी व त्या ठिकाणी दर १५ दिवसांनी रोटेशननुसार दुकाने द्यावीत. दुसरे असे की, विभागाने अस्मिता प्रकल्प सुरू केलेला आहे. महिला बचत गटाच्या उत्पादानाची ऑनलाईन विक्री सुरू करण्यात आलेली आहे. त्यासाठी सेंट्रल पद्धतीने गोडाऊनची आवश्यकता लागणार आहे. त्या ठिकाणाहून माल वितरीत केला जातो. त्यामुळे त्या इमारतीचा वापर जरी विक्रीसाठी होऊ शकला नाही तरी बचत गटाच्या मालाच्या गोडाऊनसाठी होईल. तसेच ऑनलाईन विक्रीसाठी चांगला प्रतिसाद मिळत आहे. यानंतर शेवटचा पर्याय असा आहे की, या इमारतीचा लिलाव करणे आणि त्यामधून जे काही उत्पन्न मिळेल ते उत्पन्न महिला बचत गटाच्या योजनेसाठी वापरणे. असे पर्याय विभागाकडे उपलब्ध आहेत. जर गोडाऊनचा वापर झाला नाही आणि

पंधरा दिवसांचे रोटेशन करुन देखील जर उपयोग झाला नाही तर हा शेवटचा पर्याय अंमलात आणावा लागेल, असे विभागीय सचिवांनी विदित केले.

ही अतिशय गंभीर बाब आहे. ४५ कोटी रुपयांची वास्तू बांधांवायची आणि त्या वास्तुचा उद्देश सफल झाला नाही तर ती वास्तू विकावयाची, असे मत समितीने व्यक्त केले असता, वास्तू विकावयाची नाही. ग्रामपंचायत ज्याप्रमाणे एखादे कॉम्प्लेक्स बांधते आणि भाडेतत्वावर ते देते त्याप्रमाणेच ही कार्यवाही करावी लागेल. कारण आता त्या वास्तुचा वापर करावा लागेल, असे विभागीय सचिवांनी विदीत केले.

विभागाने याबाबत जी संकल्पना मांडली होती त्या संकल्पनेचा व्यावहारिक दृष्टीने विचार केलेला नाही, असे मत समितीने नाराजीने व्यक्त केले असता, संकल्पनेमध्ये दोष नव्हता, असे विभागीय सचिवांनी विदीत केले.

परंतु इमारत बांधण्यासाठी निवडण्यात आलेली जागा अयोग्य होती. त्यामुळेच ही संकल्पना अयशस्वी ठरलेली आहे. जर ते सरकारी कार्यालय असते आणि ते कोणत्याही जागी बांधले असते तर कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण झाली नसती. परंतु जर एखादी वस्तू विकण्यासाठी इमारत बांधावयाची असेल तर जिथे त्या वस्तुला मागणी आहे त्याठिकाणी ती विकली पाहिजे, समितीची सूचना अशी आहे की, काही लोकप्रतिनिधींची २१ जागेसाठी मागणी आहे. त्यामुळे लोकप्रतिनिधींच्या त्या मागणीवेळी या वस्तुस्थितीचा विचार करण्यात यावा. अन्यथा पुन्हा अशा प्रकारच्या इमारती बांधून त्यांचा लिलाव करणे योग्य होणार नाही. त्यामुळे सदरहू २१ जागेवर बांधण्यात येणा-या इमारतींसाठी लोकप्रतिनिधींना ही सर्व वस्तुस्थिती समजावून सांगितली पाहिजे तसेच सदरहू योजनेचे पुनर्विलोकन करण्यात यावे. या योजनेचा योग्य वापर होत नाही. त्याचप्रमाणे एमएसआरएलएमसोबत टायअप करून उर्वरित बांधकाम करून घेण्यात यावे आणि त्या इमारतीचा वापर करावा, तसेच पुढील काळात बांधण्यात येणा-या २१ इमारतीदेखील बांधू नयेत, अशी समितीने सूचित केले असता, विभागीय सचिवांनी त्यास सहमती दर्शविली.

**अभिप्राय व शिफारशी :—**

**परिच्छेद क्रमांक २.२ " कायमस्वरुपी विक्री केंद्राच्या बांधकामावर निष्फळ खर्च "**

**अभिप्राय**

**६.१** पर्याप्त क्षमता, पणन बुद्धिमत्ता आणि वाटाघाटी कौशल्याच्या अभावामुळे ग्रामीण कारागीरांना बाजारपेठेची सुविधा उपभोगण्यासाठी साधन उपलब्ध नाहीत. ग्रामीण उत्पादित वस्तूंच्या पणनास प्रोत्साहन देण्यासाठी आणि ग्रामीण गरीबांचा सामाजिक-आर्थिक विकास वर्धन करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने स्वयंसहाय्यता गटाला (SHGs) बाजारपेठेची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी कायमस्वरुपी विक्री केंद्रांचे (PSCs) बांधकाम करण्याची योजना आखली (फेब्रुवारी, २००९) या योजनेनुसार, राज्यात एकूण रु.४५/- कोटी खर्चून (रु.२५ लाख प्रति PSC), तीन वर्षाच्या कालावधीत (फेब्रुवारी २०१२) तालुका स्तरावर १८० PSCs बांधावयाचे होते. ह्या योजनेची अंमलबजावणी जिल्हा ग्रामीण विकास अभिकरणांव्दारे (DRDAs) करावयाची होती.

मात्र जमीन उपलब्ध नसल्यामुळे फेब्रुवारी, २०१७ पर्यंत १८० PSCs पैकी १०१ PSCs च्या बांधकामाला सुरुवात झाली नव्हती. तसेच फेब्रुवारी, २०१७ पर्यंत उर्वरीत ७९ PSCs पैकी फक्त ३९ PSCs चे बांधकाम पूर्ण झाले होते आणि ४० PSCs चे बांधकाम पूर्ण व्हावयाचे होते. पूर्ण झालेल्या ३९ PSCs पैकी फक्त ९ PSCs चे वाटप करण्यात आले होते आणि उर्वरीत ३० PSCs चे वाटप संरक्षक भिंतीचे बांधकाम, विद्युत पुरवठ्याची आणि पाण्याची जोडणी इत्यादी न झाल्यामुळे करता येऊ शकले नव्हते. तसेच वाटप करण्यात आलेल्या नऊ PSCs पैकी तीन SHGs ना वाटप केले नव्हते. त्या PSCs कार्यालय, बँक आणि बैठक सभागृहे म्हणून वापरण्यात येत होत्या. फक्त एकाचा वापर SHG व्दारे करण्यात येत होता. त्याचप्रमाणे विभागाने १८० तालुका स्तरीय PSCs च्या बांधकामासाठी ऑगस्ट २००९ ते फेब्रुवारी २०१४ दरम्यान DRDAs ना रु.६४.१२ कोटीचा निधी वितरीत करण्यात आला. ३९ PSCs पूर्ण करण्यासाठी DRDAs नी रु.६.१२ कोटीपैकी रु.१६.७४ कोटी खर्च केले आणि ४० PSCs च्या प्रगतीपथावरील कामासाठी रु.१३.७३ कोटी खर्च केले. १०१ कामासंबंधीत (ज्याची सुरुवात झाली नव्हती) उर्वरीत रु.३३.६५ कोटी, फेब्रुवारी २०१७ पर्यंत तीन वर्ष ते सात वर्षाच्या कालावधीसाठी DRDAs कडे पडून होते असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

परिणामी तालुका स्तरावर कायमस्वरुपी विक्री केद्रांच्या बांधकाम योजनेचे निकृष्ट नियोजन आणि अंमलबजावणीमुळे ३३ पूर्ण झालेल्या PSCs वर झालेला रु.१४.५८ कोटींचा खर्च निष्फळ ठरला आणि रु.३३.६५ कोटीचा निधी तीन ते सात वर्ष अडकून पडला ज्यामुळे स्वयं-सहाय्यता गटाला उपलब्ध करून देण्याचा उद्देशसुद्धा विफल झाला. सदरहू अभिक्षणे विभागीय प्रतिनिधींनी मान्य केली व याचा वापर विहित प्रयोजनासाठी करण्याचेही मान्य केले.

स्वयं सहाय्यता गट स्वरोजगारी यांनी तयार केलेल्या वस्तूंना हक्काची बाजारपेठ मिळण्याकरिता राज्य शासनाने तालुकास्तरीय विक्री केंद्र बांधण्याकरिता प्रति तालुका विक्री केंद्र रु.२५ लक्ष असा निधी मंजूर करण्यात आला. त्यासाठी जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेकडे जागा उपलब्ध होत नसल्याने काही कामे विहित कालावधीत सुरू झाली नाहीत. दरम्यान बांधकामाचे दर वाढल्याने रु. २५ लक्ष इतक्या मर्यादित निधीत मंजूर आराखड्याप्रमाणे बांधकाम करणे शक्य झाले नाही. ही बाब विचारात घेता स्वर्ण जयंती ग्राम स्वरोजगार योजना पायाभूत सुविधा अंतर्गत रु. २५ लक्ष इतका अतिरिक्त निधी असा एकूण रु. ५० लक्ष इतका निधी तालुका विक्री केंद्र बांधकामाकरिता उपलब्ध करून देण्यात आला. त्यानुसार राज्यात आतापर्यंत ५५ तालुका विक्री केंद्राचे प्रत्यक्ष बांधकाम पूर्ण झालेले आहे. तसेच २४ ठिकाणी तालुका केंद्राचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. जागा नाही किंवा अन्य कारणास्तव सुरू होऊ न शकलेली २१ ठिकाणे अशा एकूण १०० केंद्रांची सद्य:स्थिती आहे व ८० तालुका केंद्रे रद्द करण्यात आली आहेत. सातत्याने बांधकामाच्या खर्चात वाढ होत असल्याने मंजूर असलेल्या उर्वरित ठिकाणी बांधकाम करणे शक्य होत नाही. तसेच बांधकाम प्रगतीपथावर असलेले विक्री केंद्रांच्या बांधकामावरसुद्धा वाढीव खर्चाचा परिणाम होत आहे.

यासंदर्भात मा. ग्रामविकास मंत्रीमहोदयांच्या स्तरावर सन २०१७ मध्ये धोरणात्मक निर्णय घेण्यात आला. त्यानुसार विभागामध्ये जागेअभावी व इतर कारणास्तव बांधकाम करणे शक्य नसलेल्या तालुका विक्री केंद्राकरिता असलेला उपलब्ध निधी व त्यावरील व्याज अपूर्ण बांधकाम असलेल्या तालुका विक्री केंद्र व जागा उपलब्ध असल्यास नव्याने बांधकाम करावयाच्या तालुका विक्री केंद्राच्या बांधकामासाठी वापरण्यात यावा. सदर प्रस्तावामध्ये आवश्यक असणारा निधी शिल्लक निधीपेक्षा जास्त असल्यास अतिरिक्त निधीची मागणी करावी. तसेच महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान अंतर्गत बचत गटाच्या सक्षमीकरणासाठी प्रशिक्षण देण्यात येत असून सदर विनावापर पडून असलेले तालुका विक्री केंद्रे बचत गटांच्या प्रशिक्षणासाठी व बचत गटाच्या उत्पादीत मालाच्या विक्री व्यवस्थेसाठी भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देण्यात यावीत असा निर्णय घेण्यात आल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

पहिले रु.२५ लाखांमध्ये त्यानंतर रु.५० लाखांमध्ये केंद्रे बांधली, परंतु आता मात्र त्यास जवळजवळ रु.९५ लाख निधी लागणार आहे. अशा परिस्थितीत निधीचे नियोजन विभाग कसे करणार याबाबत समितीने विचारणा केली असता रद्द केंद्राच्या निधीमधून ही कामे पुर्ण करणार

असल्याचे समितीस सांगण्यात आले. परंतु यास वित्त विभागाने परवानगी नाकारली असून त्यांच्या म्हणण्यानुसार हा सर्व निधी विभागाने प्रथम समर्पित करावा व नव्याने तरतूद करून निधी प्राप्त करून घ्यावा असेही विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

**शिफारस**

**६.२ महालेखाकारांनी सदरहू परिच्छेदात कायमस्वरुपी विक्री केंद्राच्या बांधकामावर निष्फळ खर्च यासंदर्भात आक्षेप नोंदविलेले असून ग्रामीण कारागीराव्दारे उत्पादित वस्तुंच्या पणनासाठी तालुका स्तरावर कायमस्वरुपी विक्री केंद्रांच्या बांधकाम योजनेत निकृष्ट नियोजन आणि अंमलबजावणी यामुळे रु.१४.५८ कोटींचा खर्च निष्फळ ठरला आणि रु.३३.६५ कोटीचा निधी तीन ते सात वर्ष अडकून पडला होता. तालुका विक्री केंद्रामध्ये महिला बचत गटांनी बनविलेली उत्पादने आणली व विकली गेली पाहिजेत. त्याचप्रमाणे त्यांना रस्त्यावर किंवा पंचायत समितीच्या आवारात विक्रीकरिता जावे न लागता त्यांच्या मालाला एक पक्की बाजारपेठ मिळावी व त्यासाठी पक्की इमारत उपलब्ध व्हावी या उद्देशाने ही तालुका विक्री केंद्रे उभारण्यामागील मुळ उद्देश होता. अशाप्रकारे एकूण १८० तालुका केंद्रे बांधण्याचे निश्चित झाले. परंतु त्यातील ८० केंद्रे रद्द करण्यात आली. ही बांधकामे करण्यास जागेची अनुपलब्धता तसेच अन्य कारणास्तव निधीची तरतूद असतानाही ही कामे वेळेत पुर्ण होवू शकली नाहीत. इतकेच नव्हेतर बांधकामास लागलेल्या विलंबामुळे बांधकाम खर्चात देखील वेळोवेळी मोठ्या प्रमाणात वाढ झाली. त्यामुळे मोठ्या संख्येने ही बांधकामे अपुर्ण राहिली. कित्येक विक्री केंद्रांमध्ये अपुर्ण कामांमुळे ते सुरू होवू शकले नाही.वास्तविक ह्या विक्री केंद्रांसाठी जागेची निश्चिती करणे हा सर्वात महत्त्वाचा मुद्दा असून ज्या तालुक्याच्या ठिकाणी लोकांची वर्दळ असते अथवा बाजारपेठेच्या ठिकाणी जेथे मालाची विक्री निश्चित स्वरुपाने होवू शकते अशा ठिकाणी ही केंद्रे बांधणे आवश्यक असताना जागेची निवड अचूकरित्या न केल्यामुळे या विक्री केंद्रातून मालाची विक्री होवू शकत नाही. कित्येक ठिकाणी तर आता ही विक्री केंद्रे बंद झालेली असून त्याचा उपयोग गोडाऊन म्हणून केला जातो. परिणामी ज्या मुळ उद्देशासाठी ही योजना सुरू करण्यात आली त्याचा मुळ उद्देशच बाजुला सारला गेला. विभागाला जर येथे गोडाऊनच सुरू करावयाचे आहे तर इतका निधी या विक्री केंद्रांमध्ये खर्च करण्याची कोणतीही आवश्यकता नव्हती. सद्य:स्थितीत महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोती अभियान यांना भाडेतत्त्वावर ही जागा उपलब्ध करून देणेसंदर्भात निर्णय घेण्यात आला. परंतु त्यासाठी बांधकाम पूर्ण झालेल्या तालुका विक्री केंद्रामध्ये आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. या योजनेच्या संपूर्ण अंमलबजावणीचा समितीने पूर्ण आढावा घेतला असता अनेक कारणास्तव व त्रुटींमुळे ही योजना आजही पूर्णपणे यशस्वी ठरली नाही. त्याला अनेक कारणे कारणीभूत आहेत. इतक्या मोठ्या प्रमाणात या योजनेसाठी निधी देवूनही त्याचा वापर पूर्णपणे झाला नाही. तसेच त्याची फलनिष्पत्ती हवी तशी झाली नाही व हा खर्च मोठ्या प्रमाणात निष्फळ ठरला. विभागाने आता अस्मिता प्रकल्प सुरू केलेला असून महिला बचत गटाच्या उत्पादनांची ऑनलाईन विक्री सुरू करण्यात आलेली आहे. त्यासाठी सेंट्रल पद्धतीने गोडाऊनची आवश्यकता लागणार आहे. त्यासाठी या केंद्रांचा वापर होवू शकेल अन्यथा या केंद्रांचा लिलाव करून त्यामधून जे काही उत्पन्न मिळेल ते महिला बचत गटाच्या योजनेसाठी वापरणे अथवा ही केंद्रे भाडेतत्त्वावर देणे असे अनेक पर्याय विभागाकडे सद्य:स्थितीत उपलब्ध असल्याचे समितीस सांगण्यात आले. यासंदर्भात समितीने नापसंती व्यक्त करीत स्वयंसहायता गटांना बाजारपेठेची सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी विक्री केंद्राची निर्मिती करणे इतका योजनेचा उद्देश उत्कृष्ट असताना त्याची अंमलबजावणी मात्र निष्फळ ठरली असे समितीचे स्पष्ट मत आहे. कोट्यावधी रुपये खर्च करून या इमारती बांधायच्या व त्याचा नंतर गोडाऊन म्हणून वापर करायचा याबाबत या योजनेचा व्यवहारीकदृष्टीने विचारच केलेला नाही. योजनेत वा संकल्पनेमध्ये दोष नव्हेतर नियोजन व अंमलबजावणीमध्ये दोष असल्याचे समितीचे स्पष्ट मत आहे. विभागाने या संपूर्ण योजनेचे पुनर्विलोकन करावे. जी केंद्रे बांधून पुर्ण झालेली आहेत त्याचा पुर्ण उपयोग करण्याच्यादृष्टीने योग्य ते नियोजन करावे. ज्या केंद्रांचे बांधकाम अपूर्ण आहे त्या प्रकरणी महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (MSRLM) सोबत टायअप करून बांधकाम पुर्ण करण्यात यावे. तसेच या कामांसंदर्भात आलेल्या अडचणींबाबत जिल्हा परिषद, ग्रामपंचायत व नगरपरिषद यांचेशी योग्य समन्वय व चर्चा करून येणा-या अडचणींवर मार्ग काढण्याचा प्रयत्न करण्यात यावा व त्याचा वापर व्यावसायिकदृष्टीने नियोजनबद्ध पद्धतीने पूर्ण खात्री व शहानिशा करून करण्यात यावा. तसेच भविष्यात अशाप्रकारच्या इमारती बांधू नये याबाबत धोरणात्मक निर्णय विभागाने घ्यावा. तसेच २१ पैकी जी केंद्रे अजूनही सुरू झाली नाहीत ती पण रद्द करावी. कारण ज्या उद्देशाने स्वयंसहायता बचत गटाला बाजारपेठ उपलब्ध करणे तसेच बाजारपेठेत ही केंद्रे उभारणेचा मूळ उद्देशच यापुढे विफल होणार नाही. अत: जिथे बांधकाम पूर्ण झाले आहे त्याचा योग्य वापर लवकरात लवकर सुरू व्हावा यादृष्टीने विभागाने कार्यवाही करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

# परिशिष्ट–अ

## सोमवार, दिनांक १० जून, २०१९

### लोकलेखा समिती

समितीची बैठक सोमवार, दिनांक १० जून, २०१९ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी २.३० वाजता सुरु होऊन सायंकाळी ५.१५ वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**सदस्य :**

(२) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(३) ॲड. पराग अळवणी, वि.स.स.

(४) श्री. संजय केळकर, वि.स.स.

(५) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(६) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(७) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

**विशेष निमंत्रित**

(८) श्री. प्रसाद लाड, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. अ. चां. कोल्हे, उ.स.तथा नि.अ.

(२) श्री. सो. न. सानप, अवर सचिव.

**निमंत्रित :—**

**महालेखाकार कार्यालय :**

श्री. यशवंत ठाकरे, प्रधान महालेखाकार, मुंबई.

**वित्त विभाग :—**

श्री. नितीन गद्रे, प्रधान सचिव, वित्त (ले. व को.) विभाग

**विभागीय प्रतिनिधी :—**

**कृषी व पदुम (पशुसंवर्धन) विभाग :—**

श्री. अनुप कुमार, प्रधान सचिव, कृषी व पदुम (पशुसंवर्धन) विभाग

**ग्रामविकास व जलसंधारण (ग्रामविकास) विभाग :—**

श्री.असिम गुप्ता, प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण (ग्रामविकास) विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१५-२०१६ या वर्षाच्या स्थानिक संस्था अहवालातील परिच्छेद क्रमांक २.१ यासंदर्भात प्रधान सचिव, कृषी व पदुम (पशुसंवर्धन) विभाग तसेच परिच्छेद क्रमांक २.२ यासंदर्भात प्रधान सचिव, ग्रामविकास व जलसंधारण (ग्रामविकास) विभाग आणि इतर विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली.

## मंगळवार, दिनांक २३ जुलै, २०१९

### लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक २३ जुलै, २०१९ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी ३.०० वाजता सुरु होऊन सायंकाळी ५.०० वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**सदस्य :**

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(४) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(५) श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स.

(६) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(७) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(८) श्री. रविंद्र फाटक, वि.प.स.

(९) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(१०) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. सो. न. सानप, अवर सचिव

(३) श्री. विनोद राठोड, कक्ष अधिकारी

(४) श्री. रवींद्र. म. मेस्त्री, कक्ष अधिकारी

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१५-२०१६ या वर्षाच्या स्थानिक संस्था अहवालातील ग्रामविकास व जलसंधारण (ग्रामविकास) विभागासंदर्भात (परिच्छेद क्रमांक २.२) समितीने तयार केलेला प्रारुप अहवाल विचारात घेऊन संमत करण्यात आला.

## मंगळवार, दिनांक ६ ऑगस्ट, २०१९

### लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक ६ ऑगस्ट, २०१९ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी ३.०० वाजता सुरु होऊन सायंकाळी ४.३० वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख**

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**सदस्य :**

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. संजय केळकर, वि.स.स.

(४) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(५) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(६) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव

(२) श्री. सो. न. सानप, अवर सचिव

(३) श्री. विनोद राठोड, कक्ष अधिकारी

(४) श्री. रवींद्र. म. मेस्त्री, कक्ष अधिकारी

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१५-२०१६ या वर्षाच्या स्थानिक संस्था अहवालातील कृषी व पदुम (पशुसंवर्धन) विभागासंदर्भात (परिच्छेद क्रमांक २.१) समितीने तयार केलेला प्रारुप अहवाल विचारात घेऊन संमत करण्यात आला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई